**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५८२/२००७**

**१) श्री डॅा.वसंत रुषी मसराम,**
**गांधी वार्ड, बल्लारपूर, ता. बल्लारपूर**
**जिल्हा चंद्रपूर. ..अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य कार्यपालन अधिकारी(सा.प्र.वि.),**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी म्हणून श्री एस.जी. डेकाटे, अधीक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग (प्राथमिक) हजर आहेत. तसेच ते प्रथम अपीलय अधिकारी यांचे वतीनेही हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्पीड पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन:** (१) "जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत केंद्र प्रमुखांची एकुण पदे अद्यावत किती आहेत. (२) केंद्र प्रमुखांची पदे केव्हा केव्हा व कशाप्रकारे भरण्यात आली.

(३) अनुसूचित जमातीचे केंद्र प्रमुखांची पदे केव्हा केव्हा व किती पदे कशा प्रकारे भरण्यात आली त्याबाबत तारखा सहित व आदेश पत्र क्रमांकासहित माहितीचे अधिकार २००५ अन्वये माहिती देण्यात यावी."

**३.** सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांना, केंद्रप्रमुखांची मुळ नस्ती प्रशासकिय कामाकरीता मा.विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे पाठविल्याने सद्यस्थितीत माहिती पुरविता येणे शक्य नाही. त्यामुळे दोन महिन्याची मुदत देण्यात यावी. नस्ती प्राप्त होताच आपणास माहिती पुरविण्यात येईल, असे मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी कळविलेले दिसून येते. परंतु, माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.९.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी, उप मुख्य कार्यपालन अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाच्या सुनावणीस त्यांना बोलाविण्यात आलेले नव्हते. मात्र, अपीलकर्ता यांना दिनांक ४.६.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, असा खुलासा करण्यात आलेला आहे. परंतु, अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध झाली नाही, असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. दिनांक ४.६.२००८ रोजीच्या पत्राप्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, ते सदरचे पत्र हे दिनांक ९.६.२००८ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते व जावक पंजिमध्ये त्याबाबतचा खर्च दाखविलेला दिसून येतो. तसेच पोस्टाची पावती सुध्दा आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती ही त्यांच्या प्रथम अपीलाच्या पुर्वीच देण्यात आल्याचे दिसून येते. मात्र, अपीलकर्ता यांना सदरची माहिती जर उपलब्ध झालेली नसेल तर त्यांना आता माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. सदरच्या माहितीचे अपीलकर्ता यांनी

आयोगासमोर अवलोकन केले व त्याबाबत ते समाधानी नाही. परंतु, उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना योग्य त्या सक्षम अधिका-यांकडे तक्रार करता येईल व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २८.२.२००७ च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही, हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५८६/२००७**
**अपील क्रमांक २५८७/२००७**
**अपील क्रमांक २५८८/२००७**
**अपील क्रमांक २५८९/२००७**

**अपील क्रमांक २५८६/२००७**

**१) श्री मोहम्मद सलीम मोहम्मद बिलाल,**
**शिपाई, सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,**
**प्रशासकिय भवन, चंद्रपूर. ..अपीलकर्ता**

**अपील क्रमांक २५८७/२००७**

**२) श्री रामदास आत्माराम भोगे, शिपाई**
**सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,**
**प्रशासकिय भवन, बस स्टँड समोर, चंद्रपूर. ..अपीलकर्ता**

**अपील क्रमांक २५८८/२००७**

**३) श्री समीउल्ला झियाउल्ला खॅान, लिपिक**
**सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,**
**प्रशासकिय भवन,चंद्रपूर ..अपीलकर्ता**

**अपील क्रमांक २५८९/२००७**

**४) श्री नरसिंहराव राजाराम पसुला, दुकाने निरीक्षक**
**सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,**
**प्रशासकिय भवन, चंद्रपूर. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**५) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त,**
**नगरपालिका प्रशासन, नागपूर. ..उत्तरवादी**

**६) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, बल्लारपूर, ता.बल्लारपूर, जि. चंद्रपूर. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.२.२००९)**

**नि र्ण य**

वरीलप्रमाणे अपीलकर्ता क्रं.१ ते क्रं.४ यांनी दिनांक ७.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.२.२००९ रोजी ठेवण्यात आली. उत्तरवादी हजर आहेत. चारही अपीलकर्ते गैरहजर आहेत.

**२.** अपीलकर्ता श्री नरसिंहराव पसुला यांचा मृत्यू झाल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती दिली नाही असे, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास लेखी दिलेले आहेत. व उर्वरित तीनही अपीलकर्ते यांनी त्यांचे स्वाक्षरीनिशी संयुक्त लेखी निवेदन दिनांक २१.१.२००९ (दाखल दिनांक २.२.२००९) अन्वये, त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त झाल्याबाबत व तक्रार झाल्यास माहिती अधिकारी जबाबदार राहतील असे आयोगास लेखी निवेदन दिलेले असल्यामुळे सदरचे चारही अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक अनुक्रमे अपील क्रमांक २५८६/२००७,अपील क्रमांक २५८७/२००७, अपील क्रमांक २५८८/२००७ व अपील क्रमांक २५८९/२००७ हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५९५/२००७**

**१) श्री फजितराव तुळशिराम डडमल**
**तर्फे जगदीश फजितराव डडमल,**
**रा.पो.बोर्डा(सराखा), ता.रामटेक, जि.नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**लघु सिंचाई उपविभाग, रामटेक, ता.रामटेक,**
**जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,**
**लघु सिंचाई उपविभाग, रामटेक, ता.रामटेक,**
**जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे त्यांचा मुलगा श्री जगदीश डडमल हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.६.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुसिंचाई यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल:** "अर्जदाराने दि.७.६.९९ व १६.११.०६ ला दिलेल्या तक्रार अर्जासंबंधी. (१) अर्जदाराने दिलेल्या अर्जावर आपण किंवा आपल्या कार्यालया तर्फे केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण अहवालाची झेरॉक्स प्रत ९९ ते २००६ पर्यंत." विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक १६.१०.२००७ रोजी उपस्थित राहावे असे कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांना सदरचे पत्र दिनांक २४.१०.२००७ रोजी

मिळाल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नाही असे त्यांनी कार्यकारी अभियंता यांना कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ३१.१०.२००७ ला पुन्हा सुनावणी ठेवण्यात आलेली दिसून येते. सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दिनांक ४.११.२००७ रोजी मिळाल्याचे नमूद केलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता सुनावणीस हजर न झाल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय झाला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी पत्र पाठविल्याचे सांगितले व त्यांच्या कामाच्या बध्दल त्यांनी तोंडी युक्तिवाद केला. परंतु, माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक ३१.१०.२००६ रोजी अपीलकर्ता यांना त्यांच्या संपूर्ण कामाच्या संदर्भामध्ये वस्तुस्थिती कळविण्यात आलेली आहे. परंतु, त्यानंतर त्यांनी पुढील काम करण्याच्या ऐवजी दिनांक १६.११.२००६ रोजी त्यांनी अधिकची पुन्हा अनुदानाची मागणी केलेली असल्यामुळे व शासनानेच काम करुन द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केलेली असल्याने ती शासन निर्णयाच्या निधीच्या व मुदतीच्या मर्यादेच्या आंत नसल्यामुळे व त्या मुदतीमध्येच काम करावयाचे असल्यामुळे सदरचे प्रकरण बंद करण्यात आले आहे. दिनांक ३१.१०.२००६ रोजी अपीलकर्ता यांना मार्च, २००७ पर्यंतची शेवटची संधी दिलेली आहे, असे कळविण्यात आले होते. व त्यामुळे त्यानंतर काम पुर्ण झाले आहे अशा प्रकारचे आदेश होऊन प्रकरण बंद करण्यात आलेले आहे, असे सांगितल्यामुळे यापुढे सदरच्या प्रकरणात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येणार नाही. व म्हणून अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.११.२००६ च्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या प्रकरणात कोणत्या प्रकारची पुढील कार्यवाही करण्याचे संदर्भामध्ये दिनांक ३१.१०.२००६ रोजी कळविण्यात आलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५९४/२००७**

**१) श्री सुरेश रामकिसन कनोजीयाँ,**
**रेल आवास क्रं.RBI ४०३-J,**
**अजनी, नागपूर** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**इंदिरा गांधी मेडीकल कॅालेज (मेयो जनरल हॅास्पीटल)**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**इंदिरा गांधी मेडीकल कॅालेज (मेयो जनरल हॅास्पीटल)**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक  रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.१२.२००७ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००७ रोजी माहिती अधिकारी, इंदिरा गांधी मेडीकल कॅालेज यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : "पूर्व नेत्र शल्य चिकत्सक सामान्य रुग्णालय गडचिरोली, पूर्व नेत्र शल्य चिकत्सक महात्मे नेत्र पेढी व नेत्र रुग्णा.नागपूर अनुसार-

(१) एक ऑख प्लेन है। (२) दुसरी आँख Dist SPH CYL AXIS VA
-१.५ -१.५ ८० ६/९

इस तरहके पेशन्ट को अपंग प्रमाणपत्र कितने प्रतीशत का दिया जाता है. इंदिरा गांधी मेडीकल कॅालेज जनरल हॅास्पीटल द्वारा इसकी प्रमाणित जानकारी देने की कृपा करे"

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जामध्ये जे विवरण दिलेले आहे त्यावरुन कोणत्याही प्रकारचा बोध झालेला नसल्यामुळे सदरचे अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा प्रथम अपील हे प्रपत्रात नसल्यामुळे निर्णय दिलेला नाही. मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी सदरच्या परिपत्रकाची छायांकित प्रत ही दाखल करण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांना परिपत्रकाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसे अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केले आहे. त्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २४.९.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत माहिती, विना मुल्य, व्यक्तीशः उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५९९/२००७**

**१) श्री अशोक नत्थुजी गायकवाड**
**वार्ड नं.१, चिचपुरा सावनेर,**
**मु.पो.ता.सावनेर, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**सावनेर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**सावनेर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.७.२००७ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००७ रोजी माहितीचा अर्ज दाखल केला होता. त्या अर्जाच्या संदर्भात दिनांक २०.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते व प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भात दिनांक १९.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

**३.** अपीलकर्ता यांच्या अपील क्रमांक ५७२/२००७ मध्ये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. त्या अपीलाची सुनावणी ही दिनांक ३०.१०.२००७ रोजी झालेली असून निर्णय सुध्दा झालेला आहे व सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी पुन्हा आयोगाचे नागपूर येथील कार्यालयात वरीलप्रमाणे अपील दाखल केले होते व त्या अपीलाची सुनावणी पुन्हा करणे व त्यावर निर्णय देणे हे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**४.** मागील सुनावणी अपीलकर्ता हजर असून सुध्दा मागील सुनावणीस हजर नव्हतो व पुन्हा हे अपील दूसरे आहे. त्याची सुनावणी घेण्यात यावी असा वाद आयोगाशी घालतात. परंतु, एकवेळ निर्णय झालेला असल्यावर पुन्हा निर्णय देणे वर नमूद प्रमाणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ३.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२३३/२००७**

**१) सौ.जया रमेश चरखे,**
**जोगीनगर, घारपूरी नाक्याजवळ, खामगांव,**
**मु.पो.ता. खामगांव, जिल्हा बुलढाणा. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**समाज कल्याण अधिकारी (गट-अ),**
**जिल्हा परिषद, बुलढाणा. ..उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**निवासी मुक बधीर विद्यालय, खामगांव,**
**दशहरा मैदान, खामगांव-४४४३०३,**
**जिल्हा बुलढाणा. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००७ रोजी डॉ.सुरेश जोशी, मुख्य राज्य माहिती आयुक्त या नांवाने द्वितीय अपील दाखल केले होते व तेच अपील पुन्हा राज्य माहिती आयुक्त, विलास पाटील या नांवाने नागपूर येथे दिनांक १२.६.२००७ रोजीच दाखल केले होते. त्यामुळे अपील क्रमांक १९२५/२००७ चा निर्णय हा दिनांक २९.८.२००८ रोजी देण्यात आला आहे व त्यामुळे पुन्हा त्याच अपीलाच्या संदर्भात निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ३.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६०५/२००७**

**१) श्री राजेश इमानुएल कुजुर,**
**प्लॉट नं.२८२, कस्तुरबानगर,**
**जरीपटका, नागपूर-४४००१४. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.आयुक्त-१,**
**नागपूर महानगर पालिका, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा विकासयंत्री,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "दिनांक १.७.२००६ से अभी तक प्लॉट नं.२८१, २८३ कस्तुरबानगर जरीपटका नागपूर-१४ एवं प्लॉट नं.८९० बुंध्दनगर नागपूर-१७ में. अवैध अनधिकृत पक्का निर्माण कार्य किया गया है. इस संबंध में. मैने पिछाले एक साल में कई बार अशीनगर क्षेत्रिय कार्यालय एवं लोकशाही दिन में अपनी शिकायत दर्ज करवायी है. परंतु अभी तक कोई भी ठोस कार्यवाही नही की गयी. मुझे निम्नलिखित जानकारी एवं कार्यवाही की प्रती प्रदान की जाये:-

(a) प्लॉट नं. २८१, २८३ कस्तुरबानगर एवं प्लॉट नं.८९० बध्दनगर में किये गये निर्मार्ण कार्य के नकाशे की प्रती.

(b) इस तीनों प्लॉटों के अवैध, अनधिकृत निर्माण कार्य के खिलाफा म.न.पा.द्वारा क्या कार्यवाही की जा रही है.

(c) प्लॉट नं. २८१ कस्तुरबानगर पर श्री चंद्रमणी चव्हाण ने जबरदस्ती अवैध कब्जा किया हुआ है. एस संबंध में म.न.पा. क्या कार्यवाही कर रही है.

(d) उपरोक्त विषय b & c के संबंध मे अगर कार्यवाही की गयी है तो इसके संबंधित कामकाजों की प्रती मुझे बहाल की जाये.

(e) इन तीनों प्लॉटो के अनधिकृत निर्माण कार्य के खिलाफ कार्यवाही करने में इतनी देरी क्यों की जा रही है. इसका कारण मुझे बताया जाये.

(f) कानुनी तौर पर म.न.पा.द्वारा घर का नकाशा कितने दिन में पास किया जाता है?"

सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. परंतु, सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.९.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दिनांक २४.६.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच विकासयंत्री तथा माहिती अधिकारी, महानगरपालिका, नागपूर यांना अनाधिकृत बांधकामाबाबत संबंधीतांना नियमानुसार नोटीस देण्याचे निर्देश देण्यात येवून अपील निकाली काढण्यात येते, असे आदेश दिलेले दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी माहिती अपूर्ण व चुकीची दिलेली आहे या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता हे आज सुनावणीस गैरहजर आहे. उपलब्ध झालेली माहिती ही कशा प्रकारे अपूर्ण किंवा चुकीची आहे याबध्दलचा खुलासा अपीलकर्ता यांनी केलेला नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

उपलब्ध करुन दिलेली माहिती : "राज्य शासन आदेश दि.२७.२.२००२ अन्वये नागपूर महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे. त्यापुर्वी नागपूर सुधार प्रन्यास नियोजन प्राधिकरण होते. भूखंड क्रं.२८१, २८३ व ८९० वरील बांधकाम फार जुने असल्याने याबाबतचे इमारत बांधकामाचे नकाशे नागपूर महानगरपालिकेकडे उपलब्ध नाहीत.

भुखंडा क्रं.२८३ वरील अनधिकृत बांधकामाबाबत मालकी हक्काची कागदपत्रे मागविण्याकरीता कार्यवाही सुरु आहे.

भुखंड क्रं.२८३ वरील अनधिकृत बांधकामावर MRTP Act ५३(i) अंतर्गत कार्यवाही करुन प्रकरण प्रवर्तन विभागाकडे दिनांक २८.१०.२००६ ला पाठविण्यात आलेले होते.

दरम्यान भुखंड नं.२८३ वरील बांधकाम नियमित करण्याकरीता बांधकामाचा नकाशा पार्टीने सादर केलाला होता. सदर बांधकामावर MRTP Act ५०(i) अंतर्गत कार्यवाही करण्यात आलेली असल्यामुळे अनधिकृत बांधकाम नियमित करता येईल किंवा नाही याबाबत नगर रचना विभागाकडे विचारणा करण्यात आलेली होती. नगर रचना विभागाच्या निर्देशानुसार प्रथम अतिरिक्त बांधकाम पार्टीने तोडून दिल्यास बांधकाम नियमित करता येईल अशा प्रकारे निर्देश दिले. बांधकाम नियमित करण्याकरीता १ महिन्याच्या आंत अतिरिक्त बांधकाम तोडण्याकरीता पार्टीने हमीपत्र सादर केलेले असून नकाशा मंजूर करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

भुखंड नं. २८१ वर केलेले बांधकाम अधिकृत आहे किंवा नाही याची पडताळणी करण्याकरीता पार्टीला कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविले होते. परंतु आजपर्यंत पार्टीने कागदपत्रे सादर केलेले नाही. कर आकारणी विभागाच्या रेकार्डनुसार सदर भुखंडावर श्री जार्ज लकडा यांचे नांवाने कर आकारणी करण्यात आलेली आहे. सदर जागा ना.सु.प्र.च्या मालकीची असल्यामुळै अवैद्य कब्जा करण्या-यावर कार्यवाही करणे ना.सु.प्र.च्या अधिकारात आहे.

श्री चंदमणी चव्हाण, प्लॅाट नं.२८१ वर केलेले बांधकाम अधिकृत आहे किंवा नाही याची पडताळणी करण्याकरीता पार्टीला कागदपष्त्रे सादर करण्याबाबत कळविले होते. परंतु आजपर्यंत पार्टीने कागदपत्रे सादर केलेली नाही. कर आकारणी विभागाच्या रेकार्डनुसार सदर भुखंडावर श्री जार्ज लकडा यांचे नांवाने कर आकारणी करण्यात आलेली आहे. सदर जागा ना.सु.प्र.च्या मालकीची असल्यामुळे अवैद्य कब्जा करणा-यावर कार्यवाही करणे ना.सु.प्र.च्या अधिकारात आहे.

भुखंड क्रं.८९० वरील मालकी हक्काची कागपत्रे तपासल्यानंतरच उचित कार्यवाही करणे योग्य होईल. घर मालकाने आद्यापपावेतो मालकी हक्काची कागपत्रे सादर केलेली नाहीत.

भुखंड क्रं.२८२ वरील बांधकामाच्या नकाशास अजूनपर्यंत मंजूरी देण्यात आलेली नाही.

भुखंड क्रं.२८१ बाबत मुद्या क्रं.(C) मध्ये सविस्तर खुलासा केलेला आहे.

भुखंड क्रं.८९० वर असलेले घर नेहमी कुलूपबंद राहत असल्याने व मालकी हक्काची कागपत्रे सादर करण्याबाबत दोन पत्रे दिल्यानंतर ही अद्यापपावेतो कागदपत्रे सादर न केल्याने तसेच घराचे बांधकाम फार जूने असल्याने कागदपत्रे तपासूनच योग्य कार्यवाही करण्यात येईल.

भुखंड क्रं.२८३ वरील अतिरिक्त बांधकाम एक महिन्याचे आंत तोडून टाकण्याबाबत पार्टीने हमीपत्र सादर केलेले आहे. परंतु त्यांनी अतिरिक्त बांधकाम तोडलेले नसल्यामुळे नकाशा मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

भुखंड क्रं.२८१ वर श्री जार्ज लकड यांचे नावाने कर आकारणी करण्यात आल्याचे कर विभागाच्या रेकॉर्डमध्ये नमुद आहे. श्री चंद्रमणी चव्हाण यांचा उल्लेख रेकॉर्डमध्ये आढळला नाही. त्यामुळे अर्जदाराने केलेली तक्रार निराधार वाटते. सदर जागा ना.सु.प्र.च्या मालकीची असल्यामुळे श्री चंद्रमणी चव्हाण यांनी अवैध कब्जा केला असल्यास त्यावर ना.सु.प्र. तर्फे कार्यवाही होणे आवश्यक आहे. याबाबत अर्जदारास अवगत करणे उचित होईल.

अर्जदाराने नकाशा विहीत नमून्यात सादर केल्यानंतर कमाल ६० दिवसांचे आंत नकाशा मंजूर किंवा नामंजूर करण्यात येतो. परंतू हा कालावधी बांधकाम नियमित करण्याच्या प्रस्तावाकरीता लागू होत नाही. यापेक्षा जास्त कालावधी सुध्दा लागु शकतो."

वरीलप्रमाणे उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना अतिक्रमणाच्या संदर्भात कारवाईची अपेक्षा दिसून येते. व सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६०८/२००७**
**अपील क्रमांक २६०९/२००७**

**१) श्री हिशोद पत्रुजी तुरे, सहा.शिक्षक**
**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, मारडा(मोठा)**
**ता.जि. चंद्रपूर. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी ,**
**(प्राथमिक शिक्षण विभाग),**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. **अपील क्रमांक २६०८/२००७** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १२.७.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : (१) "वरील विषयाप्रमाणे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे आदेश क्रमांक शिक्षण/प्रा.स्था.३/४३६/२००६, दिनांक १८.४.२००६ प्रमाणे ज्या पदविधर प्राथमिक शिक्षकांना पदविधर प्राथमिक शिक्षक या पदावरुन पदावन्नत करण्यात आले त्या सर्व शिक्षकांची प्रमाणित केलेली यादीची नक्कल प्रत मिळण्याबाबत.

(२) वरील क्रमांक (१) प्रमाणे ज्या पदविधर प्राथमिक शिक्षकांना पदविधर प्राथमिक शिक्षक या पदावरुन पदावन्नत करण्यात आले. तेव्हा त्यांना कोणत्या शासन निर्णयाने किंवा शासन

परिपत्रकांप्रमाणे किंवा कोणत्या शासन आदेशाने पदावन्नत करण्यात आले. त्या संपूर्ण शासन निर्णय, परिपत्रक व आदेशाची प्रमाणित केलेली नक्कल प्रत मिळणेबाबत.

(३) वरील क्रमांक(१) प्रमाणे ज्या पदविधर प्राथमिक शिक्षकांना पदविधर प्राथमिक शिक्षक या पदावरुन पदावन्नत करण्यात आले, त्याबाबत आपण कोणता आदेश काढले व असे किती आदेश काढले त्याची प्रमाणित केलेली नक्कल प्रत मिळणेबाबत. तसेच याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. चंद्रपूर यांनी वरील पदविधर प्राथमिक शिक्षकांना या पदावरुन पदावन्नत करण्यासाठी कोणते व किती आदेश काढलेत त्याची प्रमाणित केलेली नक्कल प्रत मिळणेबाबत.

(४) सन्मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर रिट याचिका क्रं.४७७२/२००४, ५१९३/२०४ आणि ५२२९/२००४ मधील दिनांक २१.१०.२००५ निर्णयाची व आपल्या जवळ असलेली निर्णयाची प्रमाणित केलेली नक्कल प्रत मिळणेबाबतज.

(५) वरील क्रं.१ च्या पदावन्नत करण्यात आलेल्या पदविधर प्राथमिक शिक्षकांना सन २००३ ला प्राथमिक शिक्षक या पदावरुन पदविधर प्राथमिक शिक्षक म्हणून ज्या आदेशाने व कारणाने त्यांची पदस्थापना करण्यात आले त्याची प्रमाणित केलेली नक्कल प्रत मिळण्याबाबत.

(६) वरील विषयाचा आदेश क्रमांक टाकून ज्या ज्या पंचायत समितीने आदेश काढून पदविधर प्राथमिक शिंक्षकांना या पदावरुन पदावन्नत करण्यात आले त्या सर्व आदेशाची पंचायत समिती निहाय आदेशाची प्रमाणित केलेली नक्कल प्रत मिळणेबाबत." विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक२१.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे व अपीलाचे संदर्भात दिनांक १३.९.२००७ रोजी माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडून अपीलकर्ता यांना आपण उक्त संदर्भाकिंत पत्रान्वये मागितलेली माहिती आपणास उपलब्ध करुन देण्यासाठी या कार्यालयास एक महिन्याचा अवधी देण्यात यावा, असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**३.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही असे दिसून येते. व विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असेच आयोगास सांगितले. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी

आढळून येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचा अर्ज त्यांचेकडे उपलब्ध झालेला नाही. परंतु, दिनांक १३.९.२००७ च्या पत्रावरुन असे दिसून येते की, अर्ज त्यांचेकडे उपलब्ध आहे व प्रथम अपील सुध्दा उपलब्ध आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक राहील. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक राहील व तसेच जे अधिकारी/कर्मचारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार आहेत, त्यांच्या विरुध्द सुध्दा शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक राहील व तशी ती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी करणे संयुक्तिक राहल. तसेच अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती सुध्दा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

४. **अपील क्रमांक २६०९/२००७** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिलः "वरील विषयातील शासन परिपत्रकाप्रमाणे जिल्ह परिषद चंद्रपूरने पंचायत समिती चंद्रपूर येथे जे.स.शि. विनंती ने अर्ज केल्याने त्यांच्या विनंती अर्जाची जि.प.चंद्रपूर दखल घेवून अशा विनंती अर्जावरुन बाहेरच्या पंचायत ससिमती मधून पंचायत समिती चंद्रपूर येथे ज्या प्राथमिक शिक्षकांची बदली झाली त्याबबत.

(१) चंद्रपूर पंचायत समिती मध्ये विनंती अर्जाने किती प्राथमिक शिक्षक बदलीने आले.

(२) त्यांच्या विनंती बदलीला सबळ कारणे आहेत काय? त्याची झेरुाक्स प्रत मिळण्याबाबत.

(३) चंद्रपूर पंचायत समितीमध्ये विनंती अर्जाने बदलीने आलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या विनंती अर्जाची झेरॅाक्स प्रत मिळणेबाबत.

(४) माहिती विषयांच्या म्हणजे महारर्ष्ट्रि शासन ग्राम वि.वि.जल सं.वि.शासन परिपत्रक क्रं. जि.प. व ३०७/प्र.क्र.१८/आस्था १४, मंत्रालय, मुंबई-३२ दिांक ४ मे, २००७ नुसार महाराष्ट्र

शासन परिपत्रक क्रं.८ सर्वसाधारण सूचना क्रमांक ६ प्रमाणे श्री हिशोद तुरे, जि.सरचिटणीस यांनी दिनांक २३.५.२००७ ला कागदपत्रासह दिलेला अर्ज व जि.न. उपाध्यक्ष यांच्या शानिर्णयाप्रमाणे बदली करण्यात यावी, असे लेखी सांगण्यावरुन ही, तसेच दिनांक १७.५.२००७ ला संघटनेचे पदाधिकारी यांना ८ कि.मी.च्या आंत मुख्यालयीच्या शाळेवर देण्याबाबत ठराव झाला असतानाही माझा दिनांक २३.५.२००७ चा मुख्यालयीच्या शाळेत बदलीबाबतचा अर्ज का डावलण्यात आला, सबळ माहिती देण्याबाबत."

**५.** सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ७.७.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली नसल्यामुळे व निर्णय दिलेला नसल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे. व त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक राहील. अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २६०८/२००७ हे मंजूर करण्यात येत असून त्यांनी दिनांक १२.७.२००७ रोजी केलेल्या अर्जात मागितलेली माहिती ही, हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. रजिस्टर पोस्टेजचा व विना मुल्या माहिती उपलब्ध करुन देण्याचा खर्च हा संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी करावयाचा असून त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

२) अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द तसेच सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील ते अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

सदरची कार्यवाही ही मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी करावयाची आहे.

३) अपील क्रमांक २६०९/२००७ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.६.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टोन विना मुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. माहितीचा खर्च तसेच रजिस्टर पोस्टाचा र्खच हा संबंधीत कर्मचारी/अधिकारी यांनी करावयाचा असून त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जबाबदारी निश्चित करुन सदरचा खर्च त्यांचेकडून वसुला करावा.

४) अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.६.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच संबंधीत अधिकारी/कर्मचारी, ज्यांची माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदारी आहे, त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी करावयाची आहे.

५) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे पाठविण्यात यावी.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६१२/२००७**

**१) श्री गोविंदा झोंगाजी तेलंग,**
**मु.पो. वायगांव (निपाणी), ता.जि.वर्धा** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, वर्धा** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत वायगांव (निपाणी) ता.जि. वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००७(६.१२.२००७) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "१ एप्रिल ते ३०.११.२००६ पर्यत (१) कॅापींग सेंटर बांधकामाची इस्टीमेट कॉपी (झेरॅाक्स प्रत द्यावी) (२) गाळेधारकांना विज मिटर १ ते १६ ला केव्हा द्यावयाचे ठरविले त्या ठराव. (३) विज मिटरसाठी डिमांड कधी कधी भरला त्याची झेरॅाक्स प्रत. (४) १ ते ४, ५ ते ८,९ ते १२, १३ ते १६ गाळे धारकांना विज पुरवठा कधी सुरु करुन दिला त्याचा पुरावा. (५) सर्व गाळे धारकांसाठी आलेले विज मंडळाकडे भरलेले विजेचे पहिले बिलाची झेरॅाक्स प्रत (६) दि. २२.१०.२००६ ला भरावयाचे विज बिलाची मागील पुढील बाजुची झेरॅाक्स (७) विजेचे बिल ग्राम पंचायतीचे नांवे येत असल्यास माहे एप्रिल ०६, जुलै, ०६७ आक्टोबरला देय असलेले कोणकोणत्या गाळे धारकांनी ग्राम पंचायत मध्ये जमा केली त्याची पावती क्रमांक, दिनांक व रक्कम." सदरची माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.१०.२००७ रोजी माहिती व्यापक स्वरुपात असल्यामुळे आपण माहिती देण्याकरीता २ महिन्याचा कालावधी लागतो. तत्पूर्वी आपण

मागितलेल्या शॅापिंग कॅाम्प्लेक्स बाबत माहितीचे आपण सदर शॅापिंग कॅाम्प्लेक्सचे गाळेधारक आहात. आपणाकडे १ एप्रिल, ०६ ते सप्टेंबर, ०७ पर्यंत १८ महिन्याचा किराया बाकी आहे. (६०० X १८= १०८००/- रुपये) इतका किराया बाकी आहे. करीता आपण प्रथम किरायाचा भरणा करावा व त्यानंतर आपणास मागितलेली माहिती पुरविण्यात येईल, असे कळविण्यात आलेले दिसून येते. मात्र, उपलब्ध झालेल्या उत्तरामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.११.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक २,३,४,५,६,७ व ८ च्या संदर्भातील माहिती एकुण १२ पृष्ठांच्या छायांकित प्रती पुरविण्यात आलेल्या असल्यामुळे व सदर प्रकरणी मुद्या क्रं.१ ते ८ ची माहिती पुरविली असल्याची खात्री झ ााली असल्यामुळे सदर प्रकरण या स्तरावरुन नस्तीबध्द करण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. व माहिती उपलब्ध झाली असली तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

**३.** अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना जरी दिनांक २५.१०.२००७ चे पत्र पाठविले असले तरी, त्यांना माहिती उपलब्ध आहे, पैशाचा भरणा करावा व माहिती घेवून जावे असे दिनांक १४.११.२००७ रोजी कळविण्याचे पत्र आपणास पाठविले होते. परंतु, अपीलकर्ता यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन घेतली नाही व प्रथम अपील केले असल्यामुळे, वरिष्ठ अधिका-यांकडून माहिती घेईल, असा शेरा ग्राम पंचायत कर्मचारी यांनी दिलेला दिसून येतो. व त्यानंतर दिनांक १७.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेली आहे, असे आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्याप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांना संपुर्ण माहिती मिळाली आहे, हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. अपीलकर्ता यांच्या माहिती मागण्याच्या प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना या संपुर्ण प्रकरणाची माहिती आहे व गाळेधारकाच्या प्रत्येक सभेच्या वेळेस

झालेल्या ठरावामध्ये ते सहभागी सुध्दा आहे व त्यामुळे पुन्हा पुन्हा ती माहिती मागणे यातून ते काय साध्य करु इच्छितात हे कळून येत नाही व त्यामुळे हा अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर आहे. तरी अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली असल्यामुळे  सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक२६१६/२००७**

**१) श्री राजु मोहाडीया,**
**परिवर्तन बहुउद्येशिय संस्था,**
**मोहाडीया कॅालनी, सिमेंट रोड, प्रतापनगर,**
**नागपूर. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. ..उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियता,**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. जी. एस.लोहोटे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००७ रोजी (कार्यालयात प्राप्त दिनांक १०.८.२००७) जन माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे २ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : a) "Furnished information approximately in how many cases the N.I.T. has not got renewed the lease of N.I.T. land and without renewal of lease accepting the ground rent and allowing the loss to exchequer by way of registration and other charges.

b) Give information whether the N.I.T. is having any resolution, bye laws, circular contemplating the registration of lease deed in respect of N.I.T. land."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १८.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १०.१२.२००७ ला देण्यात आला असून कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास यांनी उपरोक्त मुद्यांवर त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संयुक्तिक माहिती दिनांक १५.१२.२००७ पर्यंत अपीलार्थी यांना उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**३.** अपीलार्थीचे तर्फे ॲड. जी.एस. लोहोटे यांनी युक्तीवाद केला. युक्तिवाद करताना त्यांनी असे सांगितले की, त्यांना मुद्या क्रं.१ व २ ची माहिती ही अद्यापही उपलब्ध झालेली नाही. व त्यामुळे माहितीच्या अर्जानंतर माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५०/- प्रति दिवस शास्ती लादण्यात यावी, असे त्यांचे म्हणणे आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जात विचारलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी सुध्दा मुद्या क्रमांक १ मध्ये अंदाजे माहिती मागितलेली आहे. व त्यामुळे त्याबाबतची जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. मात्र मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये जमीनीच्या भाडेपटया संबंधाने नागपूर सुधार प्रन्यासचे निर्णय, बायलाज, परिपत्रके असल्यास ते उपलब्ध करुन द्यावे मात्र या मुद्याच्या संदर्भात मात्र त्यांना अजूनपर्यंत कोणत्याच प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. अर्थात, ही प्रशासकिय अकार्यक्षमता दिसून येते. या माहितीकरीता टाळाटाळ करण्याचा कोणताही प्रयत्न आहे, असे दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक २ प्रमाणे जमीनीच्या भाडेपटया संबंधाने नागपूर सुधार प्रन्यासचे ठराव किंवा बायलाज किंवा परिपत्रके उपलब्ध असल्यास त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता

सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आंत त्यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक २ प्रमाणे जमीनीच्या भाडेपटटयाच्या संदर्भात नागपूर सुधार प्रन्यासचे ठराव, बायलाज, परिपत्रके इ.च्या छायांकित प्रती उपलब्ध असल्यास विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६१८/२००७**

**१) श्री लक्ष्मण के. काटोले, सांख्यिकीय अधिकारी ग्रेड-१,**
**द्वारा- एम.एम.एस.डिव्हीजन, ५ वा माळा,**
**भारतीय खान ब्युरो, इंदिरा भवन, सिव्हील लाईन,**
**नागपूर-४४०००१.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**तहसिलदार तथा निवडणुक अधिकारी,**
**तहसिल कार्यालय, कामठी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**तहसिलदार तथा निवडणुक अधिकारी,**
**तहसिल कार्यालय, कामठी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. कागदपत्रे दाखल केली आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१०.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा तहसिलदार तथा निवडणुक अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"आपले निदर्शनास आणून देण्यात येते की, मी भारतीय खान ब्युरो नागपूर येथे सांश्चिकीय अधिकारी वर्ग-१ या पदावर कार्यरत आहो. मा निवडुक अधिकारी, कामठी यांनी माझी नियुक्ती ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान केंद्राध्यक्ष म्हणून राखीव पथक क्रं. १२ साठी केलेली होती. त्यानुसार मी कामठी येथे दिनांक २७.९.२००७ ला प्रशिक्षणासाठी कृष्णा सुदामा टॉकीजमध्ये हजर होतो. त्यानंतर श्री झोरे यांनी राखीव पथक क्रं.१२ मधून काढून पथक क्रं.३४ वर नियमित नियुक्ती दिली. (कृपया हजेरी रजिस्टर बघावे). त्यानंतर दिनांक ३.१०.२००७ ला प्रशिक्षणासाठी व त्यानंतर दिनांक ६.१० व ७.१०.२००७ ला मतदान कार्यासाठी हजर होतो.

दिनांक ७.१०.२००७ ला मी मौजा खसाळा केंद्र क्रमांक २७/२ जि.प.उच्च प्राथमिक शाळा, खसाळा येथे मतदान केंद्राध्यक्ष म्हणून कार्य केलेले आहे. या कार्यासाठी मला खसाळा केंद्रावर दिनांक ७.१०.२००७ ला रुपये ४००/- (रुपये चारशे फक्त) नगदी भत्ता देण्यात आला. नागपूर कार्यालयापासून ज्यांनी ज्यांनी मतदान केंद्राध्यक्ष म्हणून कार्य केले त्या सर्वांना ४८०/- एवढी रक्कम भत्ता म्हणून देण्यात आली. परंतु मी केंद्राध्यक्ष म्हणून कार्य करुन सुध्दा मला इतरांच्या तुलनेत रुपये ८०/- वरील पत्यावर त्वरीत पाठवावी आणि मला ती मिळणार नसेल तर ती कोणत्या नियमाखाली व कां मिळणार नाही याची सविस्तर माहिती राज्य माहितीचा अधिकार सन २००५ नियम (नियम ६-१) कायद्याखाली कृपया पुरविण्यात यावी. माहिती वरील पत्यावर पोस्टाने पाठवावी. " सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १९.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा कोणत्याही प्रकारे निर्णय झालेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

**३.** अपीलकर्ता यांचा दिनांक ११.१०.२००७ चा अर्ज हा जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांचे म्हणण्याप्रमाणे कार्यालयात प्राप्त झालेला नाही. आवक नोंदवहीमध्ये कोणत्याही प्रकारे सदरच्या अर्जाची नोंद नाही. तसेच श्री देवगिरीकर, आवक लिपिक यांचे त्यांनी बयाण सुध्दा दाखल केले आहे. तसेच प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा यु.पी.सी.चे प्रमाणपत्र दाखल केले आहे. मात्र, प्रथम अपीलाचा कोणत्याही प्रकारे निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्या बाबतचा खुलासा पण केलेला नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**४.** जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करताना असे सांगितले की, त्यांनी निवडणुक मतदान केंद्राध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती केली होती. त्यांना दिलेल्या भत्याची नोंदवही आणलेली आहे व त्यामध्ये ४००/- रुपये भत्ता सर्वांना दिलेला आहे. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या कनिष्ठास सुध्दा रुपये ४००/- दिलेले आहे. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या नियुक्तिच्या संदर्भात तपासणी करुन त्यांना योग्य तो

भत्ता मिळेल असे पाहाणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना दिनांक १०.११.२००७ च्या अर्जाप्रमाणे तपासणी करुन योग्य ती माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी

**नागपूर**
**दिनांक ५.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६२१/२००७**

**१) श्री पंकज रामदासजी अडकने,**
**मु.निंबा, पो. दहेगांव (जोशी)**
**ता.पारशिवणी, जिल्हा नागपूर. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, पारशिवणी, जिल्हा नागपूर. ..उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
**ग्राम पंचायत निंबा, पो. दहेगांव (जोशी)**
**ता. पारशिवणी, जिल्हा नागपूर. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक१८.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १५.८.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून ग्रामसेवक, निंबा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : "ग्राम पंचायत निंबा अंतर्गत सन २००६-०७ या आर्थिक वर्षात आलेल्या संपूर्ण शासकिय निधीची योजनेवार संपूर्ण माहिती. (२) आलेल्या निधीच्या खर्च करण्यात आलेला संपूर्ण तपशिल. घेण्यांत आलेल्या कामाबाबद ग्रा.पं. आमसभा आणि विशेष सभा यांची संपूर्ण माहिती पंधरा (१५) दिवसात देण्यांत यावी, ही विनंती. (३) पंधरा टक्के दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत कुठे खर्च करण्यात आले याची सविस्तर माहिती देण्यात यावी.(४) अकराव्या वित्त आयोगाप्रमाणे ग्राम पंचायतला किती फंड उपलब्ध झाला व कुठे वापरण्यात आला. (५) २०,००० कामाचे नियमाप्रमाणे फलक लावण्यात आले आहेत का?"

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१०.२००७ रोजी प्रथम अपील खंड विकास अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलामध्ये कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही, असे कारण दिलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २७.११.२००७ रोजी नोट शिट वर देण्यात आलेला असून तो अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेला दिसून येत नाही. पार्टी नं.२ ने पार्टी नं.१ ला ३ दिवसांचे आंत माहिती देण्यास होकार दिलेला आहे. सबब पार्टी नंबर दोनने दिनांक २७.११.२००७ ला स्वाक्षरी केली आहे. व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ५.१२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक १८.१२.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

**३.** अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिले हे मान्य केले. परंतु, अपीलकर्ता यांनी ती माहिती घेतली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे ती निश्चितच विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असून अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाची मात्र दखल घेतली नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेताना माहिती उपलब्ध होईल अशा प्रकारची दक्षता घेतलेली दिसून येत नाही व तशा प्रकारचा निर्णय सुध्दा दिलेला नाही. व त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे असे दिसून येते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना व्यक्तीशः विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येते अशी आयोगाची खात्री झालेली आहे. व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची कार्यवाही ही मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी करावयाची असून त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत पाठविण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६२७/२००७**

**१) श्री शोएब अहमद कन्नौजी,**
**साप्ताहिक रोशन वतन, हेड पोस्ट ऑफिस रोड,**
**इतवारा चौक, वर्धा, ता.जि. वर्धा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**वर्धा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**वर्धा, जिल्हा वर्धा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.२.२००९)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी त्यांचे पत्र दिनांक ६.२.२००९ अन्वये "मुद्दे क्रं.१ से १८ तक की माहिती, माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार वर्धा ने मुझे दिनांक २०.१२.२००७ को दे दी है। कृपया मेरा अपील अर्ज खारीज किये जाने की नम्र विनंती है।" असे आयोगास लेखी सादर केलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अर्जदारास माहिती प्राप्त झाल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ६.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

Februuary,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६२८/२००७**

**१) श्री सचिन एन. मानवटकर**
**कार्यालय-महादुला(मानवटकर ले आऊट)**
**पो. कोराडी कॅालनी, ता.कामठी, जि. नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य महाव्यवस्थापक(नि.सं.व सुं.)**
**कोराडी औष्णीक विद्युत केंद्र, कोराडी(म.रा.वि.वि.कं.लि.)**
**जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता(नि.सं.व सुं.)**
**जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००७(२२.८.२००७) रोजी मुख्य व्यवस्थापक यांचेकडे खालीलप्रमो माहिती मागितलेली दिसून येते.

**माहितीचे वर्णन** : "सन २००५-२००६ वर्षात प्रत्येक महिन्यात वरील कंपनीच्या कामाकरीता असलेल्या कामगारांची नांवे. त्यांचे स्थायी अस्थायी पत्ते, त्यांना प्रत्येक महिन्यात देण्यात आलेला पगार स्लीप, प्रत्येकाच्या नांवाने कापलेल्या पी.एफ.ची स्लीप, कापलेली रक्कम, त्यांच्या नावे बँकेत जमा केलेला चेक द्वारे पगार व चेक नंबर, अकाऊंट नंबर सहित २००५-०६ वर्षात देण्यात आलेला घरभाडे भत्ता, सुटटयांचे पैसे, बोनस चेक नंबर, रक्क्म बँक अकाऊंट नंबर सहित, प्रत्येक महिन्याच्या पगार वापटपाच्या वेळ‍ॅ हजर असलेल्या अधिका-यांची नावे पदे, त्यांचे नियमानुसार पगार केल्याचे प्रमाणपत्र, प्रत्येक महिन्याचा रिकार्ड केलेल्या मोजमाप वहीची एम.बी. छायांकित प्रत रिकार्ड करणा-या अधिका-याचे नांव.

वर्णन- या आधारे वरील कंपनीस प्रत्येक महिन्यास देण्यात आलेली रक्कम बिल, चेक नंबर, अकाऊंट नंबर, बिल देणा-या जबाबदार अधिका-यांची नांवे वरील संदर्भाकिंत परिपत्रकाचे काटेकोर पालन संबंधीत कंपनीने न केल्यास आपणाकडून कंपरीवर कोणती दंडात्मक कार्यवाही करण्यांत आलेली आहे, त्याची साक्षांकित प्रत. केली नसल्यास का करण्यात आलेली नाही."

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी, सदर माहिती कार्यकारी अभियंता (नि.सं.व सुं.) या विभागाचे कल्याण अधिकारी, औष्णिक विद्युत केंद्र, कोराडी विभागाशी संबंधीत आहे. त्याकरीता माहिती ही दिनांक ५.९.२००७ प्रमाणे सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्याच्या सूचना देण्यात याव्यात, अशा प्रकारची टिपणी दिसून येते. व त्यामुळे सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना विहित मुदतीत उपलब्ध झालेली दिसून येत नाही. प्रत्येक विभागाची माहिती जर त्या विभागात असेल तर त्याच विभागाचे माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी असल्यास माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सोईचे होईल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यानंतर माहिती त्यांच्याकडे संबंधीत विभागाकडून आली आहे. याचा अर्थ माहिती विलंबाने माहिती अधिकारी यांचेकडे आलेली आहे. सदरची माहिती ही अपीलकर्ता यांचे अवलोकना करीता दिली. परंतु अपीलकर्ता यांचे सदरच्या माहितीमुळे समाधान झाले नाही व त्यांनी मागितल्याप्रमाणे ती माहिती नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्याकरीता व्यापक प्रमाणात माहिती असल्यामुळे अपीलकर्ता यांनी स्वत: सबंधीत शाखेकडे हजर राहून त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीच्या दस्तऐवजांचे निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेणे हे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे

अपील हे अंशता मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांचेकडे कार्यालयात, कार्यालयीन वेळेत तारीख व वेळ कळवून संबंधीत अभिलेख्यांची पाहाणी करुन आवश्यक ती कागदपत्रांच्या छायांकित प्रती विना मुल्या उपलब्ध करुन घेण्यात याव्यात. त्याकरीता अपीलकर्ता यांनी कार्यालयीन वेळेतील तारीख व वेळ कळविल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भात असलेल्या नस्ती जबाबदार कर्मचा-यांच्या उपस्थितीत निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात व त्यांना आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात व पोच घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६३५/२००७**

**१) श्री फैजान अख्तर व.अब्दुल खालीक**
**हन्डी ओली, गुजरी बाजार, कामठी,**
**ता.कामठी, जिल्हा नागपूर. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष**
**राष्ट्रीय उर्दु प्राथमिक शाळा, कामठी,**
**शिवपंचायत नगर, कामठी, ता.कामठी, जि.नागपूर. ..उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**
**राष्ट्रीय उर्दु प्राथमिक शाळा, कामठी**
**शिवपंचायत नगर, कामठी, ता.कामठी, जि.नागपूर. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.८.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापिका यांना खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : (१) "राष्ट्रीय उर्दु उच्च प्राथमिक शाळा कामठी की २००० से २००८ तक की सिनिआरिटी लिस्ट (२) जिल्हा परिषद द्वारा की गई इन्स्पेक्शन रिपोर्ट (implementation) २००० से २००८ ततक की (३) यहा कार्यरत शिक्षकों की डी.एड. व बी.एड.की सर्टिफिकेट की सर्टिफाई कॅापी. (४) शासन द्वारा प्रदान २००० से २००८ तक कां सेक्शन व स्टॅाफ अप्रुव्हल, पहली से सातवी तक का (५) वर्ष २००१ -०८ में पहली से सातवीं तक वर्गवार तुकडीवार विद्यार्थी व मान्य शिक्षक कितने है, नाम व सिनियरिटी लिस्ट की सर्टिफाई " सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

**३.** सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती तयार आहे. तरी नियमाप्रमाणे शुल्क भरुन माहिती घेवून जाण्याची कृपा करावी असे कळविलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २३.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांना संस्थेचे अध्यक्ष यांनी आपण हेतुपुरस्पररित्या फक्त ब्लॅाकमेल करण्याच्या उद्येशाने पत्रव्यवहार करुन पैसे आणि वेळ नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहात. आपल्याला सूचित करण्यात येते की, आपण मागितलेली माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका व माहिती अधिकारी यांचेकडे तयार आहे. ती माहिती आपल्याला उपलब्ध करुन देण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत. तरी आपण शासकिय नियमाप्रमाणे फी भरुन माहिती घेवून जावी, असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**४.** द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा: "सेवा में निवेदेन है की मैने मा. शिक्षणाधिकारी नागपूर से उपरोक्त माहिती चाहि थी. उन्हो ने यह संबंधीत स्कुल में हमारी यह अर्जी प्रेषित कर दि जिस मे मैंने माहिती टपाल द्वारा मांगी थी. और इन्हों ने यह माहिती हेतु कितना शुल्क भरना है यह नही बताया. और हमें यह माहिती भी नही दि. इस हेतु मैंने ुल कितना शुल्क भरना है यह जानने हेतु दि.१४.०९.०७, ४.१०.०७, २२.१०.०७, १३.१२.०७ को चार बार पत्राचार किया. एक बार मा.शिक्षणाधिकारी साहब नागपूर ने भी दि. १६.१०.२००७ को माहिती अधिकारी तथा अपीलीय अधिकारी को R.T.I. की धारा १७ (३) (a) व अपील की सुनवाई कर निकाल हेतु पत्र भी दिया परंतु माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी साहाब ने हमारी सुनवाई आजतक नही कि और न ही हमें आज तक इस का कुल कितना शुल्क हुआ यह बताया है. हमनें माहिती हेतु इन्हे ९०/- रुपये का मनीऑर्डर भी किया. परंतु माहिती अधिकारी ने उसे भी refused कर हमें माहिती नही दि. और यह केवल पत्र देकर ऐसा दर्शा रहे है जैसे यह हमें माहिती देंगे यह हमें न शुल्क

बताते है. न माहिती दिये है. और हमारे द्वारा भेजे मनी ऑर्डर को refused कर दिये है. हमने टपाल द्वारा माहिती मांगी है वह भी नही दिये है.

अत: आपसे अनुरोध है की आप इन पर R.T.I. की धाराओं के अनुसार कडी से कडी कार्यवाही कर दंडित करें व हमें माहिती मिले व भविष्य में यह लोग माहिती अधिकार से खिलवाड न कर सके ऐसा सुनिश्चित करे."

**५.** उत्तरवादी यांनी सुध्दा खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा: "सेवेशी सविनय विनंती आहे की, आपले वरील सुनावणीचा नोटीस दि. २०.१.२००९ ला प्राप्त झाली असून त्याचा खुलासा खालील प्रमाणे आहे.

१) श्री फैजान अख्तर अब्दुल खालिक रा. कामठी अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी (मुख्याध्यापिका) यांना दि. १४.८.२००७ ला आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांना दि. २७.१०.२००७ चे अपील प्रमाणे मागितलेली माहिती घेवून जाण्यासंबंधी पत्र वेळोवेळी पाठविण्यात आले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

पत्र क्रं.१ दि. १०.९.२००७ पत्र क्रं.२ दि.२५.९.२००७ पत्र क्रं.३ दिनांक २३.११.२००७ आणि दि. १०.१२.२००७ ला पाठवून नियमाप्रमाणे योग्य फी (दोन रुपये प्रती प्रमाणे) भरुन घेवून जाण्याबाबत कळविण्यात आले होते. श्री फैजान अख्तर यांनी दिनांक १३.१२.२००७ च्या पत्रात रुपये ९०/- (रुपये नव्वद) मनिऑर्डर पाठविण्याचे कळविले होते. परंतु आज तारखेपर्यंत त्यांचा मनिऑर्डर प्राप्त झाला नाही. तसेच अपीलकर्ता माहिती घेण्यासाठी शाळेच्या कार्यालयात उपस्थित झाले नाही. तसेच या अपील मध्ये नमूद करण्यात आलेल्या पाच माहिती मधून तीन माहिती क्रं. १ क्रं.४ क्रं.५ बाबतची माहिती दिनांक २६.१२.२००८ ला मा.राज्य माहिती आयुक्त नागपूर क्षेत्र यांच्या निर्देशानुसार विनामुल्य पाठविण्यात आली आहे. माहिती क्रं.२ जि.प.कडून केली गेलेली तपासणी रिपोर्ट आतापर्यंत अशी तपासणी (इन्सफेक्शन) करण्यात आले नसून शाळेच्या कार्यालयात अशी कोणतीही माहिती उपलब्ध नाही. माहिती क्रं.३ शाळेत कार्यरत शिक्षक डी.एड, बी.एड बाबतची माहिती संबंधी शिक्षकाशी संबंधीत असून ती माहिती परस्पर त्यांच्या कडून मागावी.

महोदय,

श्री फैजान अख्तर अब्दुल खालिक माहिती घेण्यासाठी शाळेच्या कार्यालयात धीही उपस्थित झालेली नाही. आणि आपल्या समोर अपील करुन विनामुल्य माहिती घेण्याची त्यांना सवय लागलेली आहे. आणि यावरुन असे प्रमाणित होते की, अपीलकर्ता योग्य ती फी भरुन माहिती घेण्यास उत्सुक नाही. त्यांचे उद्यीष्टये फक्त कार्यालयीन कर्मचारी, मुख्याध्यापिका व संस्थाचालक यांच्यावर दबाव आणणे त्रास देणे असे आहे. सबब हे प्रकरण खारीज करण्याची कृपा करावी, ही विनंती."

**६.** वरील दोनही खुलाशा वरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्यातील काही माहिती त्यांना पुर्वी सुध्दा उपलब्ध झालेल आहे. व यावरुन ते एकच माहिती अनेक अर्जातून मागत आहे असे दिसून येते. मुद्या क्रं.२ ची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही. ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मुद्या क्रं.३ ची माहिती ही शिक्षकांची वैयक्तिक माहिती असल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येणार नाही. मुद्या क्रं.४ व ५ ची माहिती पुर्वी उपलब्ध करुन दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १४.८.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रं.२ ची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टोन उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६३७/२००७**

**१) श्री हरिश्चंद्र परसराम बिरनवार,**
**१४८, शिवआनंद अपार्टमेंट, पांडे ले आऊट,**
**खामला, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख, गोंदिया उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
**भूमी अभिलेख, गोंदिया, ता.जि. गोंदिया. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२००७ रोजी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

माहितीचा तपशिल : "सौ.मंगलाबाई हरिश्चंद्र बिरनवार यांचे छोटा गोंदिया येथील गट नं.२७४/१ या जमिनीचे कोर्टाच्या आदेशानुसार तात्काळ मेजणीकरीता रुपये ३०००/- पावती क्रं.१७५८६७९ दिनांक १३.४.२००५ रोजी भरल्यानंतरही आजपर्यंत मोजणी झाली नाही. तरी मोजणी न करण्याचे कारण व अर्जदारानी अर्ज दिल्यानंतर किती लोकांनी अर्ज केले व किती इतर अर्जदारांचे मोजणी केली." सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२००७ रोजी अधीक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १५.६.२००७ रोजी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले व त्यानंतर दिनांक ३०.६.२००७ रोजी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख गोंदिया यांनी माहिती अधीक्षक, भूमी

अभिलेख यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना पाठविल्याचे दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

**३.** राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपील करण्याचे कारण सौ.मंगलाबाई हरिश्चंद्र बिरनवार यांचे नांवा छोटा गोंदिया येथील गट नं.२७४/१ छ या जमीनीचे कोर्टाच्या आदेशानुसार तात्काळ मोजणी करीता रुपये ३०००/- पावती क्रं.१७५८३७९ दिनांक १३.४.२००५ रोजी भरल्यानंतरही अजपावेतो मोजणी कां केली नाही. तरी मोजणी न करण्याचे कारण व दिनांक १३.४.२००५ नंतर किती मोजणीकरीता अर्ज आले व किती मोजणी केली, अशी माहिती उपलब्ध झाली नाही असे कारण दिलेले आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख गोंदिया यांनी निश्चितपणे अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे अपीलकर्ता यांच्या दिनांक २२.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात व अधिनियमाच्या कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी वेळीच घेतली असती तर अपीलकर्ता यांना द्वितीय अपील दाखल करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु, प्रथम अपीलाची सुनावणी न घेता कागदी आदेश पाठविल्यामुळे दिनांक ३०.६.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अर्जात मागितलेल्या माहितीप्रमाणे नाही असे दिसून येते व त्याही बाबत तत्कालीन तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख हे दोषी आढळून येतात व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २२.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(२) प्रमाणे

त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही उप संचालक, भूमि अभिलेख, नागपूर यांनी करावयाची आहे.

३) उपसंचालक, भूमि अभिलेख, नागपूर यांचेकडे सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६३६/२००७**

**१) श्री सुनिलकुमार गयाप्रसाद मिश्रा,**
**सेंट्रल इंडिया इंन्स्टिटयूट ऑफ मास कम्युनिकेशन,**
**व्ही.आय.पी.रोड, धरमपेठ, नागपूर-४४००१०. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.आयुक्त,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा स्थावर अधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२००७ रोजी (कार्यालयास प्राप्त दिनांक २३.२.२००७) रोजी माहिती अधिकारी तथा स्थावर अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

माहितीचा तपशिल : "नागपूर महानगरपालिकेने दिलेल्या संस्थंच्या जागेबाबत. नागपूर महानगर पालिकेने सन १९८० ते २००६ पर्यंत मनपाची जागा कोणकोणत्या खाजगी संस्थांना वापरासाठी दिलेली आहे. कोणत्या दराने व या पैकी किती संस्थाकडे मनपाची रक्कम थकबाकी आहे याची माहिती द्यावी. तसेच संस्थाकडे असलेली थकीत रक्कम वसुली करीता मनपाने संबंधीत संस्था विरुध्द कोणती कार्यवाही केली आहे."

**३.** सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.३.२००७ रोजी नागपूर मनपाने सन १९८० ते २००६ पर्यंत मनपाची जागा खाजगी संस्थांना वापरास दिल्याबाबतची माहिती संकलीत करणे सुरु आहे. याबाबतची माहिती एकत्रित झाल्यानंतर आपल्याला कळविण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २०.४.२००७ रोजी अपर आयुक्त तथा अपीलीय अधिकारी, महानगरपालिका, नागपूर यांनी दिनांक २१.४.२००७ रोजी सुनावणीस उपस्थित राहावे असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय मात्र दिलेला दिसून येत नाही. मात्र नोटशीटवर माहिती २७.४.२००७ पर्यंत उपलब्ध करुन द्यावी व अपीलार्थीला कळवावे असे नमूद केलेले दिसते. व त्यावरुनही अपीलाचा निर्णय हा दिलेला नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो. दरम्यान अपीलकर्ता यांना दिनांक २७.४.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक १४.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे व दिनांक २२.३.२००७ च्या उत्तराप्रमाणे माहितीचा अर्ज दिलेला दिसून येतो. त्यानंतर पुन्हा दिनांक ६.६.२००७ रोजी माहिती मागण्याचा अर्ज केलेला दिसून येतो. सन १९९० पासून मनपाच्या स्थायी समितीद्वारे किती संस्थांना/व्यक्तींना खुली जागा किंवा इमारत लिज वर देण्यात आली आहे याची कोणत्या संस्थेला/व्यक्तीला किती जागा कोणत्या दराने किती वर्षाकरीता देण्यात आली आहे याची माहिती द्यावी असे नमूद केलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००७ च्या अर्जावर उपरोक्त माहितीची सद्या आवश्यकता नसल्यामुळे कृपया अर्ज मागे घेण्यात येतो असे दिनांक १३.७.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा स्थावर अधिकारी यांचेकडे लेखी दिलेले दिसून येते. व तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपीलामध्ये अर्ज आश्वासनाने मागे घेतला आहे परंतु माहिती दिली नाही अशी तक्रार केलेली आहे व उपलब्ध करुन दिलेली माहिती ही अपूर्ण व खोटी माहिती दिलेली आहे, अशा प्रकारचे द्वितीय अपीलात कारण दिलेले आहे. परंतु आज अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे व दिलेल्या कारणाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे अधिक स्पष्टीकरण केलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा

निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २२.२.२००७ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे व सदरची कार्यवाही ही विहित मुदतीत केलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६३८/२००७**

**१) श्री संदीप प्र.देशपांडे (पत्रकार)**
**दैनिक लहुतरंग, कामठी, ता.कामठी**
**जिल्हा नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**कामठी विभाग, कामठी, ता.कामठी, जि.नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,**
**पोलीस स्टेशन कामठी, ता.कामठी, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामीण पोलीस कार्यालयामध्ये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "दैनिक लहूतरंग शहीद स्मारक दुर्गा चौक कामठी, जिल्हा नागपूर पो.ठाणे कामठी येथील वर्ष २००२ एफ.आय.आर. ता.९.१२.२००२ फायनल नं.६५/०३ ता. ३०.६.०३ मामल्याच्या अंतिम निर्णयाची माहिती त्वरीत पाहिजे."

**३.** सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ४.८.२००७ रोजीच सदरचा अर्ज हा संबंधीत माहिती अधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी म्हणजेच पोलीस निरीक्षक तथा माहिती अधिकारी, पोलीस स्टेशन, कामठी यांचेकडे पाठविलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहितीचे पत्र देण्यात आले व त्यामध्ये अर्जदाराचे विरुध्द अपराध क्रमांक ३५२/०२ कलम ३८४,५०१ भा.द.वि.च्या गुन्हयात फायनल क्रमांक ६५/०३ दिनांक ३०.१०.२००३ चे कागदपत्र तपाशी अंमलदार पोलीस हवालदार श्री शशीकांत

तिवारी यांनी आजपावेतो पोलीस स्टेशनला दाखल केले नाही. पोलीस हवालदार श्री तिवारी यांना लेखी आदेश, दुरध्वनी, बिनतारी संदेशाद्वारे कागदपत्रे दाखल करण्यास कळविण्यात आले होते. परंतु कागदपत्रे दाखल न केल्याने पोलीस हवालदार श्री तिवारी यांचा वरिष्ठांना कसूरी रिपोर्ट पाठविण्यात आलेला आहे. अपीलकर्ता अर्जदार यांनी मागितलेली माहिती उपलब्ध नाही, करीता माहिती पुरविण्यास असमर्थ आहोत, असे अपीलकर्ता अर्जदारास दिनांक ४.९.२००७ रोजी लेखी कळविण्यात आले होते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तपाशी अंमलदार श्री शशिकांत तिवारी यांना लेखी सूचना देवून दिनांक २६.१०.२००७ रोजी अपील अर्जाचे सुनावणी करीता एस.डी.पी.ओ. कार्यालय, कामठी येथे बोलाविण्यात आले होते. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर होते. तपाशी अंमलदार पोलीस हवालदार श्री शशीकांत तिवारी गैरहजर होते. तपाशी अंमलदार श्री तिवारी यांनी गुन्हयातील व फायनलचे कागदपत्रे पोलीस स्टेशनला दाखल न केल्यामुळे अर्जदाराला माहिती पुरविणे शक्य झाले नाही. वरिष्ठांना कसूरी अहवाल सादर करण्यात आला आहे असे सांगितल्यावर सदर हेड कॅान्स्टेबल यांचेवर कायदेशिर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले असे दिसून येते. परंतु,त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**४.** जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना पोलीस हवालदार श्री शशीकांत तिवारी सध्या नेमणुक पोलीस स्टेशन खापरखेडा यांनी दिनांक ५.११.२००७ रोजी अपील क्रमांक ३५२/०२ कलम ३८४, ५०१ भा.द.वी. गुन्हयाचे कागदपत्रे पोलीस स्टेशन कामठी येथे आणून सादर केले नाही. त्यावरुन पोलीस स्टेशन डायरी साना क्रमांक ५६/०७ दिनांक ५.११.२००७ चे २१.४५ वाजता नोंद घेवून त्याबाबतचा अहवाल पोलीस अधीक्षक, नागपूर यांचेकडे दिनांक २९.११.२००७ रोजी पाठविण्यात आला. सदर प्रकरणात क फायनल क्रमांक ६५/०३ दिनांक ३०.६.२००३ अन्वये पोलीस हवालदार श्री शशीकांत तिवारी यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, कामठी यांचे मार्फतीने मा. जेएमएफसी कोर्ट, कामठी यांचे न्यायालयात पोलीस

स्टेशन जावक क्रमांक १८६१/०८ दिनांक २३.५.०८ अन्वये मंजूरीस पाठविण्यात आले होते. त्यावरुन मा. जेएमएफसी कोर्ट कामठी यांनी सदरचे क फायनल दिनांक ३.२.२००९ रोजी मंजूर केलेले आहे. यावरुन मात्र, माहितीच्या अधिकारातील अर्जाच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत कार्यवाही केलेली आहे व अपीलकर्ता यांना सुध्दा कळविण्यात आलेले आहे, हा निष्कर्ष काढावा लागतो. मात्र क फायनल मंजूरीच्या संदर्भात अपीलकर्ता यांना कळविलेले नसल्यास ते कळविणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.८.२००७ च्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत कार्यवाही करण्यात आलेली असली तरी अंतिम निर्णयाची माहिती ही त्यांना उपलब्ध झालेली नव्हती. ती कार्यवाही नंतर झालेली असल्यामुळे हा निर्णय उपलब्ध झाल्यानंतर १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलकर्ता यांनी हा निर्णय उपलब्ध झाल्यानंतर १० दिवसांचे आंत व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५७१/२००७**

**१) श्री उमेश दयाशंकर चौबे,**
**सरोज भवन, गुजर वाडी के सामने,**
**इमामवाडा रोड, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी , तहसिल कार्यालय, नागपूर(ग्रामिण)**
**नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. खंडाळकर यांनी वकीलपत्र दाखल केले आहे. परंतु सुनावणीस ते दुपारी १२.५० वाजपर्यंत हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, नागपूर तहसिल कार्यालय(ग्रामीण) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

माहितीचा तपशिल :"नागपूर तालुका अंतर्गत येणा-या बुटीबोरी जवळील भुसारी गावचे रहिवासी लहू रामाजी भूसारी यांचे शेतीचे बादाबाबत दि.१.३.२००२ ते दि.२.३.२००२ (१) उपरोक्त संदर्भात लहू भुरींची शेतीचा वाद दि. २.३.२००२ ला तहसिलदारासमक्ष केस होती काय. (२) दोघा भावासंबंधात शेतीचा वगैरे वाद तहसिलदारासमक्ष सुरु आहे काय. (३) दि. २.३.२००२ ला तहसिल कार्यालय अर्धा दिवस होते की पूर्ण दिवस तसेच त्या दिवशी तहसिलदार कामावर हजर होते काय. (४)तहसिल कार्यालयाचे चपराशी २.३.०२ ला डयुटीवर होते की सुटीवर होते. त्यांची डयुटी कोठे होती. दि.२६.३.२००२ ला तो पंढरी गाढवे डयुटीवर होते काय."

सदरची माहिती टपालाने घेणार अशी खुण केलेली आहे.

**३.** सदरच्या अर्जाच्या अनुषांगाने दिनांक २७.९.२००७ रोजी आला अर्ज दिनांक ३१.८.२००७ रोजी प्राप्त झाला. अर्जात मागितलेली माहिती संभ्रम निर्माण करणारी असल्याने ती माहिती देण्यास विलंब लागण्याची शक्यता आहे, असे कळविण्यात आलेले दिसते. त्यानंतर दिनांक २७.९.२००७ रोजी तहसिलदार तथा सहाय्यक माहिती अधिकारी यांनी प्रस्तुतकार-१, तहसिल कार्यालय, नागपूर(ग्रामिण) यांचेकडे अर्जातील माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अर्ज पाठविलेला दिसून येतो. त्यावर प्रस्तुतकार यांनी दिनांक २२.१०.२००७ रोजी अंकुश रामाजी भूसारी व इतर तीन जण यांचे नांवाने प्रकरण दर्ज आहे व दिनांक ३१.३. २००३ रोजी फेटाळून प्रकरण नस्ती करण्यात आल्याचे कळविलेले दिसून येते. तसेच तहसिलदार तथा जन माहिी अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक २३.१२.२००८ रोजी खालीलप्रमाणे मुद्येनिहाय उत्तर दिलेले दिसून येते.

"(१) रा.मा.क्रं.८/आर.टी.एस-६४/२००१-०२ हा मामला दिनांक ३१.३.२००३ रोजी निकाली काढण्यात आला. त्यात अर्जदाराचा अर्ज फेटाळून प्रकरण नस्ती करण्यात आले असे रा.मा.नोंदवहीमध्ये नोंद आहे. सदर केस नस्ती केल्यावर कार्यालयातील सर्व राजस्व अभिलेख कार्यालयाचा मागील भागात खोलीमध्ये ठेवण्यात येतो. परंतु सन २००५ मध्ये आलेल्या अतिवृष्टीमुळे तहसिल कार्यालयाच्या मागिल भागात जवळपास १० ते १२ फुट पाणी साचलेले होते व ते पाणी खोलीमध्ये घुसल्याने खोलीत ठेवलेला रेकॉर्ड पाण्यामध्ये भिजल्याने आजपर्यंत संबंधीत मामल्याचा शोध घेता आला नाही. (२) प्रकरण उपलब्ध नसल्याने याबाबत माहिती देता येत नाही. (३) याबाबत निश्चित सांगता येत नाही. (४) याबाबत निश्चित सांगता येत नाही."

तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. व प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २९.११.२००७ रोजी अर्जामध्ये नमूद केलेल्या प्रकरणाची तपासणी केली असता प्रकरण दिनांक ३१.३.०३ रोजी फेटाळून नस्ती करण्यात आल्याचे प्रस्तुतकार यांनी कळविले आहे. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**४.** अपीलकर्ता आज गैरहजर असल्यामुळे व "संतोषजनक उत्तर नही मिला" एवढेच कारण दिलेले असल्यामुळे व पुढील कोणतेही स्पष्टीकरण नसल्यामुळे व जन माहिती अधिकारी व

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत -**

**किरकोळ अर्ज क्रं ०४/२००७**

**१) ॲड. श्री शरद नथमल गांधी,**
**द्वारा- गांधी एस.टी.डी., पी.सी.ओ.सेंटर,**
**मनपा चौक, गांधी रोड, अकोला. .. अर्जदार**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपआयुक्त(प्र.), महानगरपालिका, अकोला. .. गैरअर्जदार**
**३) जन माहिती अधिकारी तथा**
**अधीक्षक, महानगरपालिका, अकोला. .. गैरअर्जदार**

**(आदेश पारित दिनांक ९.२.२००९)**

**नि र्ण य**

अर्जदार श्री शरद नथमल गांधी यांनी दिनांक ५.८.२००८ (प्राप्त दि.८.८.२००८ रोजी) राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक १३८९/०७ मधील किरकोळ अर्ज क्रमांक १/२००८, दिनांक १६.६.२००८ रोजी पारित आदेशाचे पुनर्विलोकन करण्याकरीता दाखल केला आहे. सदरच्या अर्जाची सुनावणी आज दिनांक ९.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर असून त्यांचे म्हणणे ऐकुण घेतले. तसेच अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी आयोगाकडे लेखी युक्तिवाद दाखल केला आहे. अपीलकर्ता यांचे पुनर्विलोकन अर्जामध्ये खालीलप्रमाणे वस्तुस्थिती दिसून येते.

"मा.राज्य माहिती आयोग विदर्भ क्षेत्र नागपूर यांचे समोरील अपील क्रं.१३८९/२००७ मधील किरकोळ अर्ज क्रं.१/२००८ मध्ये दिनांक १६.६.२००८ रोजी पारित आदेशांची प्रत दिनांक ३.७.२००८ रोजी प्रेषित करण्यात आली. सदर प्रत दि. ८.७.२००८ रोजी अपीलकर्त्याला प्राप्त झाली. सदर आदेशांचे अवलोकन व अध्ययन केले असता आदेशातून अपीलकर्ता अर्जदाराविरुध्द उत्तरवादी गैरअर्जदारांनी केलेल्या खोटया आणि बदनामीकारक आक्षेपाहर्य विधानांची कोणतीही दखल घेण्यात आलेली नसल्याचे तसेच उत्तरवादी गैरअर्जदारांने मा. राज्य माहिती आयोगासमक्ष खेटी आणि दिशाभूल करणारी माहिती सादर केलेली असताना देखील

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) मधील तरतुदीनुसार शास्ती आकारणी पासून बचाव आणि अधिनियमात कोणतीही तरतूद नसलेल्या ताकीद चे आदेश पारित करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यामुळे प्रस्तुतचा पुनर्विलोकन अर्ज सादर करण्याची अनुमती प्रदान करण्याची विनंती करण्यात येत आहे."

**२.** सदरच्या पुनर्विलोकन अर्जाच्या संदर्भामध्ये तत्कालीन आयुक्त, महानगरपालिका, अकोला यांनी खालीलप्रमाणे खुलासा दिनांक २९.११.२००८ रोजी दिलेला दिसून येतो.

खुलासा :"दि. २४.१०.२००८ चे संदर्भित पत्र मला नागपूर येथे दि. २१.१२.२००८ रोजी समक्ष कार्यालयात प्राप्त झाले. कारण यापूर्वी आयोगाने पाठविलेले पत्र पूर्वीच्या पत्यावर गेल्यामुळे सदरचे पत्र आयोगास पोस्टाने परत पाठविले होते.

(२) माझ्या माहितीनुसार मी यापूर्वी आयोगास जे निवेदन/स्पष्टीकरण सादर केले, त्यामध्ये कोणतीही खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती नाही. श्री शरद गांाी हयांची काही माहितीबाबतची प्रकरणे अद्यापि मुख्य राज्य माहिती आयोग, मुंबई यांच्याकडे प्रलंबित आहेत. तसेच या प्रकरणात स्पष्टीकरण/खुलासा देण्याबाबत कोणतीही दिनंगाई झालेली नाही, जी काही दिनंगाई झालेली आहे ती पत्रव्यवहार उशिरा मिळाल्यामुळे झालेली आहे. कारण या प्रकरणात माझ्यातर्फे काहीही लपविण्याचा उद्येश/हेतू नव्हता.

(३) मी सादर केलेल्या खुलाशाचा योग्य विचार करुन त्यानंतर दोन्ही पक्षाचे आमनेसामने म्हणणे ऐकल्यावर माहिती आयुक्तांनी योग्य व सर्वंकष विचार करुन दंडाची नोटीस रद्य केली व फक्त या प्रकरणात ताकीद देण्यात आली आहे. वास्तविक या प्रकरणात माझ्याकडून कोणतीही चूक झाली नसतानासुध्दा मा. राज्य माहिती आयुक्त यांनी जी ताकीद दिलेली आहे ती सुध्दा या प्रकरणाचा बारकाईने विचार केला असता योग्य नाही असे वाटते.

(४) माहितीच्या कायद्यामधील गोष्टीबध्दल कलम २१ नुसार सदभावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रत असलेल्या कोणत्याही गोष्टीबध्दल, कोणत्याही व्यक्तींविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशिर कारवाई दाखल करण्यांत येणार नाही, असे नमूद केलेले आहे. त्यामुळे जोपर्यंत आयोगाचे असे स्पष्ट मत होत नाही की जी माहिती अर्जदारास नाकारलेली होती/आहे, ती माहिती दुष्ट हेतूने नाकारलेली आहे किंवा जाणूरबुजून चुकीची, अपुरी किंवा दिशाभुल

करणारी माहिती दिलेली आहे, किंवा मागितलेली माहिती नष्ट केलेली आहे, किंवा मी सदर माहिती प्रकरणात कोणत्याही प्रकारे अडथळा आणला आहे, तोपर्यंत सदर संबंधित अधिका-यांविरुध्द माहिती आयुक्त कलम (२०) अंतर्गत कारवाई अपेक्षित नाही.

श्री शरद गांधी यांच्या प्रकरणामध्ये त्यांनी मागितलेली माहिती नाकारण्यामध्ये कोणताही वाईट हेतू नव्हता. सदरची माहिती नाकारण्याचे कारण असे होते की, त्यांनी मागितलेली माहिती खाजगी व वैयक्तिक स्वरुपाची आहे व त्यामुळे ती देऊ नये असे माझे मत झाले होते. कदाचित सदरचा निर्णय चुकीचा किंवा अयोग्य असेले, परंतु त्यामागे कोणताही वाईट हेतू (malafide) नव्हता.

एखाद्या अधिका-याने खरोखरच निष्काळजीपणा केलेला नाही, त्यामुळे किंवा जी माहिती नाकारण्यात आलेली आहे ती माहिती सदहेतूने नाकारण्यात आलेली आहे, अशी जर वस्तुस्थिती असेल तर माहिती आयुक्त आपले अधिकार वापरताना नैसर्गिक न्यायाचे तत्व काटेकोरपणे वापरतील अशी अपेक्षा आहे. सदभावनेने केलेल्या कृतीबाबत (action taken in good faith) कायद्याने संरक्षण दिलेले आहे.

श्री शरद गांधी यांनी त्यांच्या दि. ५.८.२००८ च्या (७ पानाच्या) याचिकेमध्ये जे इतर गैरलागू मुद्दे मांडलेले आहेत, त्याबाबत भाष्य करण्याची आवश्यकता वाटत नाही. श्री शरद गांधी याबाबत निष्कारण दुराग्रह करीत आहेत व त्यांचा स्वभावच तसा आहे.

मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांना नम्र विनंती आहे की, अपीलकाराचा पुनर्विलोकन अर्ज नामंजूर करुन फेटाळण्यात यावा."

**३.** वरील खुलाशाचे अवलोकन केले असता तत्कालीन आयुक्त श्री चंद्रशेखर रोकडे यांनी पुन्हा श्री शरद नथमल गांधी यांच्या प्रकरणामध्ये त्यांनी मागितलेली माहिती नाकारण्यामध्ये कोणताही हेतू नव्हता. त्यांनी मागितलेली माहिती खाजगी व वैयक्तिक स्वरुपाची आहे, त्यामुळे ती देऊ नये असे माझे मत झाले होते. कदाचित सदरचा निर्णय चुकीचा किंवा अयोग्य असेल, परंतु त्यामागे कोणताही वाईट हेतू (malafide) नव्हता. सदभावनेने केलेल्या कृतीबाबत कायद्याने संरक्षण दिले आहे, असा खुलासा केलेला असल्यामुळे व मागितलेल्या माहितीच्या

स्वरुपावरुन व त्याबाबतची वस्तुस्थिती ही अर्जदारास नंतर अवगत सुध्दा झालेली असल्याने सदरचा खुलासा हा मान्य करुन पुनर्विलोकन अर्ज हा नामंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अर्जदार यांचा सदरचा पुर्नविलोकन अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदार व गैरअर्जदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६४५/२००७**

**१) श्री रामसागर पुंडलीक पिलेवान,**
**८३, हिंदुस्थान कॅालोनी, वर्धा रोड**
**नागपूर-४४००१५.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**पोलीस अधीक्षक, जिल्हा पोलीस मुख्यालय,**
**भंडारा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**पवनी, ता. पवनी, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे त्यांनी केलेल्या पुर्वीच्या अर्जाच्या संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

"(१) मौजा पवनी येथील नं.भू.क्रं.२३८२ क्षेत्र २८५.१ चौ.मि प्रकरणी गैरअर्जदार भाऊराव देवाजी गजभिये श्री दिनेश भाऊराव गजभिये श्री दिपकभाई भाईलाल भाई पटेल त्यांच्या विरोधात अर्जदाराचे दि. २५.१०.२०००, २४.४.२००२, २९.६.२००३, १.०२.०४, २६.०९.०४, ९.१०.०४, ३०.७.०५ रोजी पोलीसात केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने अर्जदाराच्या विरोधात खोटी सही करुन पोलीसात खोटी तक्रार देणे, जीवे मारण्याची धमकी देणे, अर्जदाराच्या अनुपस्थितीत बळजबरीने जागा बळकावून त्यावर अवैध बांधकाम करणे, घर फोडी करुन व सामानाची अफरातफार करुन व बनावट दस्तावेज सादर करुन त्यावर अवैध बांधकाम करुन पोलीसात

खोटे बयाण देणे, मा. तहसिलदार व दंडाधिकारी पवनी हयांची पोसीसामार्फत खोटे दस्तावेज सादर करुन कोर्टाची फसवणुक करणे मा. उपविभागीय दंडाधिकारी भंडारा हयांना सुध्दा बनावट दस्तावेज सादर करुन कोर्टाची सुध्दा फसवणुक करणे खोटे दस्तावेज सादर करुन नगर परिषद पवनी हयांच्या कडून अवैध बांधकामाची मंजूरी मिळवणे इत्यादी अर्जदाराचे सादर तक्रारीवर आपण घेतलेल्या निर्णयासहित केली असलेली कार्यवाहीची साक्षांकित प्रत पुरविण्यात यावी. (२) दि. ६.११.२००६ चे लोकशाही दिनी टोकन क्रं.३६ व विभागीय लोकशाही दिनी टोकन क्रं.१०३३ केलेल्या अर्जदाराचे सादर तक्रारीवर आपण घेतलेल्या निर्णयासहित केलेल्या कार्यवाहीची साक्षांकित प्रत पूरवावी."

**३.** अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २४.९.२००७ रोजी आपणास आमच्या कार्यालयातील पत्र क्रमांक पोउपअधी/माअ/१५२/०७, कार्यालय पोलीस अधीक्षक, भंडारा दिनांक १९.९.२००७ अन्वये आपणास पोस्टाने माहिती पाठविण्यात आलेली आहे असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु, प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २४.९.२००७ चेच उत्तर दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**४.** अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामुळे त्यांचे समाधान झालेले नाही त्यावर त्यांनी असे सांगितले की, त्यांनी वेळोवेळी तक्रारी केलेल्या आहेत परंतु त्यावर पोलीस उपविभागीय अधिकारी यांनी कार्यवाही केलेली नाही. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी आयोगापूढे जो खुलासा दिलेला आहे तो खालीलप्रमाणे आहे.

खुलासा"सविनय सादर आहे की, दि.२२.८.०७ ला शासकिय माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी श्री अ.रा. राजुरकर हे कार्यारत होते. ते दि. ११.९.०७ ला सेवानिवृत्त झालेले आहे. त्यानंतर श्री अनंत थोरात शासकिय माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली हे काम पाहत होते.

सदर अर्जदार यांनी मा. पोलीस अधीक्षक भंडारा यांना केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्यास दि. ९.८.२००७ ला अर्ज सादर केला. त्या अर्जाची माहिती मिळण्यांस त्यांचे पत्र क्रं.पोउपअधि/मा.अधि.२१२७२०७ भंडारा दि.१६.८.२००७ अन्वये

माहिती पाठविण्यांस ते अर्ज या कार्यालयात प्राप्त झाले तसेच पुन्हा अर्जदार यांनी दि. २२.८.२००८ ला या कार्यालयात माहिती मिळण्यांस अर्ज सादर केला. त्यामध्ये त्यांनी अर्जदाराच्या विरोधात खोटी सही करुन पोलीसात खोटी तक्रार देणे, जिवे मारण्याची धमकी देणे, अर्जदाराच्या अनुपस्थितीत बळजबरीने जागा बळकावुन त्यावर अवैध बांधकाम करणे घर फोडी करु व सामानाची अफरातफर करुन व बनावट दसताऐवज सादर करुन त्यावर अवैध बांधकाम करुन पोलीसात खोटे बयाण देणे मा. तहसिलदार व दंडाधिकारी पवनी हयांची पोलीसामार्फत खोटे दस्ताऐवज सादर करुन कोर्टाची फसवणुक करणे मा. उपविभागीय दंडाधिकारी भंडारा हयांना सुध्दा बनावट दस्ताऐवज सादर करुन कोर्टाची सुध्दा फसवणुक करणे खोटे दस्तऐवज सादर करुन नगर परिषद पवनी हयांच्या कडून अवैध बांधकामाची मंजूरी मिळणे इत्यादी अर्जदाराचे सादर तक्रारीवर आपला घेतलेला निर्णयासहित केली असलेली कार्यवाहीची साक्षांकित प्रत व दि. ६.११.२००६ चे लोकशाही दिनी टोकण क्रं.३६ व विभागीय लोकशाही दिनी टोकन क्रं. १०३३ केलेलै्या अर्जदाराचे तक्रारीवर घेतलेल्या निर्णयासहीत केलेल्या कार्यवाहीची साक्षांकित प्रत मिळण्यास अर्ज सादर केलेला आहे.

वरील दोन्ही अर्जाची माहिती जन माहिती अधिकारी पो.स्टे.पवनी कडून व अर्जदार हा वारंवार वरिष्ठांकडे अर्ज व केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्यास अर्ज करीत असल्याने सदर दोन्ही अर्जाची माहिती एक सारखी असल्याने या कार्यालयाचे पत्र जा.क्रं.१६६५/०७, दि. १५.९.२००७ अन्वये मा. पोलीस अधीक्षक भंडारा यांना सादर करण्यांत आली. त्यावरुन पोलीस अधीक्षक भंडारा यांनी त्यांचे पत्र क्रं.पोउपअधि/मा.अ./१५२/०७ कार्यालय पोलीस अधीक्षक भंडारा दि. १९.९.२००७ अन्वये अर्जदाराला पोस्टाने पाठविण्यांत आलेली आहे. व ती माहिती अर्जदाराला ३० दिवसांच्या आंत पुरविण्यात आलेली आहे. त्यावेळी अर्जदाराने त्यांचे अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती तत्कालीन शासकिय माहिती अधिकारी पवनी यांनी पत्र क्रं.उपविपोअप/चौ.अ./१७०७/०७ कार्यालय उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी दि. १९.९.०७ प्रमाणे माहिती देण्यांत आलेली आहे.

श्री रामसागर पुंडलीक पिल्लेवार ८३, हिंदुस्थान कॅालनी वर्धा रोड, नागपूर यांनी आजपर्यंत केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्यांस खालील प्रमाणे अर्ज सादर केले आहे. त्याची माहिती खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | अर्ज सादर केल्याचा दिनांक | अर्जदाराला पाठविल्याचे जा.क्रं.व दिनांक |
|---|---|---|
| १. | दि.२.६.२००७ | जा.क्रं.८७४/०७ दि. २८.६.२००७ |
| २. | दि. १८.८.२००७ | जा.क्रं.१६६५/०७ दि. १५.९.२००७ |
| ३. | दि. २२.८.२००७ | जा.क्रं.१६६५/०७ दि. १५.९.२००७ |
| ४. | दि. २२.११.२००७ | जा.क्रं.२२८२/२००७ दि. २४.१२.२००७ |
| ५. | दि. १५.३.२००८ | जा.क्रं.६३२/०८ दि. ३.५.२००८ |
| ६. | दि. ८.६.२००८ | जा.क्रं.८८५/२००८ दि. १७.६.२००८ |
| ७. | दि. १४.६.२००८ | जा.क्रं.८८४/२००८ दि. १७.६.२००८ |
| ८. | दि. १२.११.२००८ | जा.क्रं. १७४८/२००८ दि. १७.११.२००८ |

वरीलप्रमाणे माहिती पुरविण्यांत आलेली आहे. त्याव्यतिरिक्त मा. पोलीस अधिक्षक भंडारा यांना सुध्दा अर्ज सादर केलेला आहे. त्यांची सुध्दा माहिती पुरविण्यांत आलेली आहे. त्याचप्रमाणे संबंधीत प्रकरण गृहविभाग मंत्रालय, मुंबई, विशेष पोलीस महानिरीक्षक ना.प.नागपूर व पोलीस अधीक्षक भंडारा या कार्यालयात अनेक अर्ज सादर केलेले आहेत. त्या अर्जाचा अहवाल सुध्दा वरिष्ठांना सादर करण्यांत आलेला आहे.

मौजा पवनी येथील न.भु.क्रं. २३८२ क्षेत्रफळ २८५.१ चौरस मिटर प्रकरणी गैरअर्जदार १) भाऊराव देवाजी गजभिये रा. पवनी २) दिनेश भाऊराव गजभिये रा. पवनी ३) दिपकभाई भाईलाल भाई पटेल यांचे विरोधात पवनी पोलीसांनी त्यांना अटक करुन कार्यवाही व्हावी म्हणून सिव्हील प्रकरण असतांनाही अर्ज देत आहे. सदर प्रकरण पुर्ण पणे दिवाणी स्वरुपाचे असून त्यांनी दिवाणी न्यायालयात जावून दाद मागावी असे लेखी पत्र व तोंडी समज देण्यांत आलेली आहे.

तरीही त्यांचे समाधान झालेले नाही व सदर प्रकरणामध्ये दखल पात्र गुन्हा होत नसल्याने पोलीसांनी गुन्हा दाखल केला नाही. व प्रकरणामध्ये यातील गैरअर्जदार प्रमीला

गजभिये सिव्हील केस नं.६७/०७ सिव्हील जज्ज ज्युनिअर डिवीजन पवनी न्यायालयातून अंतरीम स्थगनादेश दि. १४.१२.२००७ मिळवून सदर प्रकरणे हे नमुद न्यायालयात न्याय प्रविष्ठ आहे."

**५.** सदरच्या खुलाशावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जो अर्ज सादर केला आहे त्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना माहिती देण्यात आलेले आहे. व त्यातही अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या संदर्भात दखलपात्र गुन्हा होत नसल्यामुळे गुन्हा दाखल केला नाही व प्रकरणामध्ये गैरअर्जदार प्रमीला गजभिये सिव्हिल केस नं.६७/०७ सिव्हील जज्ज न्युनिअर डिवीजन पवनी न्यायालयातून अंतरीम स्थगनादेश दिनांक १४.१२.२००७ मिळवून सदर प्रकरण हे नमूद न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. मात्र अपीलकर्ता यांचे तक्रारीप्रमाणे पोलीसांनी गुन्हे दाखलच करावेत अशी त्यांची अपेक्षा दिसून येते व त्यासच ते कार्यवाही करत नाहीत असे म्हणतात. मात्र त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हा निष्कर्ष काढावा लागतो. माहितीच्या अधिकारांत कोणत्याही प्रकारणांत कारवाईचे आदेश देता येत नाहीत, हे अपीलकर्ता यांना त्यांच्या इतरही अपीलांच्या निर्णयामध्ये व सुनावणीचे वेळेस सांगितलेले आहे. दिनांक १९.९.२००७ रोजी तत्कालीन पोलीस उपविभागीय अधिकारी यांनी पोलीस अधीक्षक, भंडारा यांना जो अहवाल पाठविला आहे त्या अहवालात सुध्दा अर्जदारास दिवाणी न्यायालयात दावा दाखल करावयाची समज देण्यात आलेली असून सुध्दा ते स्वतः परस्पर तक्रार करीत आहे. या तक्रारीवर गैरअर्जदार भाऊराव देवाजी गजभिये व दिनेश भाऊराव गजभिये यांचेविरुध्द कोणतीही फौजदारी कारवाई उचित नाही असे कळविलेले दिसून येते व त्यावरुन अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २२.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे दिनांक १९.९.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सदरच्या निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

Februuary,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६४३/२००७**

**१) श्री निळकंठ छत्रपतीजी आष्टणकर,**
**मु.पो. अजणसरा, ता.हिंगणघाट, जिल्हा वर्धा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, हिंगणघाट, ता.हिंगणघाट, जि. वर्धा. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
**पंचायत समिती, हिंगणघाट, ता.हिंगणघाट, जिल्हा वर्धा. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२००७ रोजी विस्तार अधिकारी तथा माहिती अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे खालीप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"दि.२०.७.२००७ ला सादर केलेल्या तक्रारी बाबत दि. २२ ऑगष्ट, २००७ रोजी मा. कोल्हे गट विकास अधिकारी यांनी चौकशी केल्याची व कार्यवाहीची माहिती. तसेच दिनांक ३०.७.२००७ ला सादर केलेल्या तक्रारी बाबत चौकशी केली असल्यास किंवा चौकशी न केल्यास चौकशी न केल्याची कारणे व चौकशी कधी करणार याची माहिती."

**३.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांना दोनही मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.१०.२००७ रोजी देण्यात आला असून सुनावणी ही दिनांक १५.१०.२००७ ला घेण्यात आलेली असून आवश्यक दोनही मुद्यांच्या संदर्भात तपशिलात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांच्या इतर अर्जाच्या संदर्भात सुध्दा मुद्या क्रमांक ३ व ४ मध्ये माहिती उपलब्ध

करुन दिलेली दिसून येते व अपीलकर्ता यांची तक्रार ही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात दिसून येते व निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात माहितीच्या अधिकारात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांनी योग्य त्या सक्षम वरिष्ठ अधिका-यांकडे तक्रार करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २३.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे दोनही मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध झालेली आहे. तसेच दिनांक १७.९.२००७ च्या प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांच्या सर्व अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६४६/२००७**

**१) श्री भास्कर मिठूजी डोंगरे,**
**कस्तुरबा वार्ड, गोंदिया(पंचशिल झेंडयाजवळ)**
**क्रिष्णापुरा, पो.ता.जि. गोंदिया-४४१६०१.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सरव्यवस्थापक,**
**दि गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को ऑप.बँक लि.गोंदिया,**
**दुर्गा चौक गोंदिया, ता. जि. गोंदिया.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक,**
**दि गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.गोंदिया,**
**शाखा सिंधी कॅालनी(मोतवानी चेंबर्स) गोंदिया-४४१६०१** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. सदरच्या अर्जाच्या व अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक १४.९.२००७ रोजी माहितीच्या अधिकारा अंतर्गत बँक ही पब्लीक ॲथारिटी नसल्यामुळे सदर ॲक्ट बँकेला लागू होत नाही असे बँकेचे वकीलांनी माहिती दिलेली असल्यामुळे आपण सादर केलेले अपील सदर ॲक्टचे अंतर्गत नामंजूर करण्यात येत आहे, असे कळविलेले दिसून येते.

३. राज्य माहिती आयोगाकडील अपील क्रमांक ५४४/०७,दिनांक १९.१०.२००७ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३.१.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकांना तसेच सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला असून राज्य माहिती आयोगाचा निर्णय रद्द केला आहे. सदरच्या प्रकरणात सुध्दा अपीलकर्ता यांनी माहिती ही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचेकडून मागितलेली असल्यामुळे सदरची बँक ही

सहकारी बँक असल्याने माहितीच्या अधिकाराच्या तरतुदी लागू होणार नाही. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी हया सहकारी बँकेस लागू होत नाही असा मा.उच्च न्यायालयाचा निर्णय असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६४७/२००७**

**१) श्री भास्कर मिळूजी डोंगरे,**
**कस्तुरबा वार्ड, गोंदिया(पंचशिल झेंडयाजवळ)**
**क्रिष्णापुरा, पो.ता.जि. गोंदिया-४४१६०१. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
**श्री समर्थ न्यू शिक्षण संस्था, गोंदिया,**
**द्वारा सालेकसा हायस्कुल सालेकसा, ता.सालेकसा,**
**जि. गोंदिया. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**सालेकसा हायस्कुल सालेकसा,**
**पो.ता.सालेकसा, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

अपीलकर्ता यांनी त्यांचे पत्र दिनांक १०.२.२००९ अन्वये त्यांना अपीलाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांचेकडून संपुर्ण माहिती मिळाली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्याबाबत आयोगास लेखी निवेदन दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक १०.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६४८/२००७**

**१) श्री भास्कर मिळूजी डोंगरे,**
**कस्तुरबा वार्ड, गोंदिया(पंचशिल झेंडयाजवळ)**
**क्रिष्णापुरा, पो.ता.जि. गोंदिया-४४१६०१.** **..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
**मनोरभाई पटेल हायस्कुल चिचगांव पुरगांव,**
**पो. गणखैरा, ता.गोरेगांव, जि. गोंदिया.** **..उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**मनोरभाई पटेल हायस्कुल चिचगांव पुरगांव,**
**पो. गणखैरा, ता.गोरेगांव, जि. गोंदिया.** **..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.४.२००७ रोजी मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"१. Scholorshi distribution Record and cash Book ledger Book record and utilization certificate session २००३ to session २००७ . १.Certified copies of Beedi Scholarship distribution and utilization certificate slip. २. Certificate coies of Savitribai Fule Scholarship from Social Welfare, Z.P.Gondia distribution and utilization certificate. ३. Merit scholarship from S.W.O. Gondia Class-I distribution and utilization cert. ४. Scholarship to B.C.students from S.D.So.Wel.Office Class-I distribution and utilization slip. ५. Scholarship to S.T.students from Tribal Officer Deori distribution slip and utilization cert. ६. S.S.C.Exam fees of xth Class from S.W. Z.P. Gondia to S.C./S.T/N.T.student distribution slip

and utilization certificates. ७. Certified copies of cash book and ledger Book" सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिति उपलब्ध करुन दिलेली नाही व म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नाही त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे दोषी आढळून येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघर केले आहे, असा निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ३.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत मागितलेली माहिती विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) वरीलप्रमाणे माहिती उपलब्ध न करुन दिल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहील, याची नोंद घ्यावी.

३) तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दाखल झालेल्या प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी.

४) सदरच्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६५६/२००७**

**१) श्री ज्ञानेश्वर दहिवले,**
**मु. रुयाळ(नवीन सिंदपुरी), पो. भेंडाळा,**
**ता. पवनी, जिल्हा भंडारा-४४१९१०. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, भंडारा. ..उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत कार्यालय, रुयाळ(नवीन सिंदपुरी) पो. भेंडाळा,**
**ता. पवनी, जिल्हा भंडारा. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, रुयाळ यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"ज्यांच्या जवळ कोणत्याही प्रकारचा भुखंड किंवा जागा नसल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा नसतांनी आपण काही व्यक्त्ींना ग्रामपंचायत कर व विजेचे ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहेत ते नियम व अटी काय आहेत यांची माहिती मिळण्याबाबत. (ii) अर्जदाराजवळ भुखंडाबध्दल दंड, भुखंडाचे पैसे भरल्याची व शासनाची अधिकृत पावती असून सुध्दा व अर्जदाराने ५ वर्षापासून आपल्याकडे ग्रामपंचायत करासंबंधी व विजेच्या ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करुन सुध्दा त्यांची हेटाळणी करण्याच्या कारणाची मुद्येसुद लिखीत माहिती मिळण्याबाबत."

**३.** सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ७.६.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

**४.** अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यावेळेस ते कंत्राटी ग्रामसेवक होते व नवीनच आले होते. त्यामुळे त्यांना अधिनियमाच्या तरतूदींची माहिती नव्हती. त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला आहे, असे त्यांनी आयोगास सांगितले. त्याकरीता त्यांना समज देणे आवश्यक आहे. तसेच माहिती अधिकारी यांचा बोर्ड लावलेला नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, बोर्ड लावलेले आहेत. तरी सुध्दा लावलेले नसतील तर माहिती अधिकारी यांचा बोर्ड लावणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे परंतु, माहिती अधिकारी यांचा बोर्ड लावलेला नसल्यामुळे हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत बोर्ड लावण्यात यावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६५५/२००७**

**१) श्री मधुकर देवराव वरखडे,**
**मु. खरकाडा, पो. भगवानपूर,**
**ता. भिवापूर, जिल्हा नागपूर. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**उमरेड. ता.उमरेड, जिल्हा नागपूर. ..उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**भिवापूर, ता. भिवापूर, जिल्हा नागपूर. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२००७ रोजी तहसिलदार, भिवापूर यांचेकडे जन माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"मौजा खरकाडा प.ह.नं.४० मधील सर्व्हे नं.१०५ जुना नवीन १८,१९,८०,१७५ चा सन १२-१४ बंदोबस्त मिल व नकाशा. (ii) सन ५३-५४ अधिकार अभिलेख व नकाशा. (iii) सन १९९३-१४ पासून वारसान फेर फार पत्रकांची ६ क ची नोंद."

**३.** विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले होते असे द्वितीय अपील मेमो मध्ये म्हटलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाची प्रत आयोगाच्या कार्यालयात दाखल केली नाही. परंतु प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २६.६.२००७ ला सादर केले आहे, असे उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार, भिवापूर यांना दिलेल्या पत्रावरुन दिसून येते. व अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.६.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते व सदरच्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे.

**४.** प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता रुपये ४८/- चा भरणा करावा असे कळविलेले आहे. परंतु त्याबाबतचे पत्र नाही. माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये नायब नाझर यांनी तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा शेरा सदरच्या अर्जावर दिलेला आहे. परंतु सदरच्या अर्जाची नोंद आढळून येत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी म्हटलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती विना मुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२००७ च्या अर्जात मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४/२००८**

**१) श्री प्रकाश मुकूंदराव पंत,**
**डी-१, संजय अपार्टमेंट, २७४ धरमपेठ विस्तार,**
**शिवाजीनगर, नागपूर-४४००१०. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(नि.)**
**औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा, ता.सावनेर,**
**जिल्हा नागपूर-४४११०२. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता(नि.)प्रशासन,**
**औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा, ता. सावनेर,**
**जिल्हा नागपूर-४४११०२. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १.८.२००७ रोजी माहिती अधिकारी मुख्य महाव्यवस्थापक, औ.वि.केंद्र, खापरखेडा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

"सन २००४ ते २००५ ते २००६. सन २००४ साली कार्यालयाने एक झाडाच्या फांद्या तोडण्यास रेट १३.०० रुपये दिला. सन २००५ साली एका झाडाच्या फांद्या तोडण्याचा रेट ३६० रुपये दिला. एवढा रेट कसा आला त्याची सविस्तर कारणे व माहिती द्यावी. (२) सन २००४ व २००५ च्या झाडाच्या फांद्या तोडण्याचे अंदाजपत्रक इस्टीमेट प्रती साक्षांकित करुन द्याव्या.(३) रुपये ३६०/- रेट झाडे तोडण्याचा असल्यास त्याबाबत रितसर वनविभागाची व तहसिलदाराची परवानगी प्रत पूरवावी. (४) रुपये ३६०/- रेटने कोणत्या जातीच्या झाडाच्या फांध्या तोडल्या त्यांची नांवे कळवावी."

**३.** सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ९.८.२००७ रोजी पत्र क्रमांक मुमव्य(निसंवसु)/माहितीचाअधिकार/३४-०७/६०० प्रमाणे अपीलकर्ता यांना टपाल खर्च रुपये २५/-, दस्तऐवज खर्च रुपये ३८/- असे एकुण रुपये ६३/- चा भरणा करावा व माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र राज्य विज निर्मिती केंद्र मर्या.औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा जावक नोंद वही दिनांक ९.८.२००७ च्या पृष्ठाची छायांकित प्रत पुरावा म्हणून दाखल केली आहे. त्यामध्ये ६०० क्रमांकावर अपीलकर्ता यांना पत्र पाठविले आहे. त्याबध्दल रुपये ५ चा खर्चाची नोंद केलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना मुदतीत कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ते पत्र त्यांना मिळालेले नाही. व त्यामुळे त्यांनी दिनांक ११.९.२००७ रोजी प्रथम अपील, अपीलीय अधिकारी व महाव्यवस्थापक यांचेकडे केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २१.९.२००७ रोजी आपण अर्जात नमूद केल्याप्रमाणे अर्जासह जोडपत्र(परिशिष्ट) जोडलेले नसल्यामुळे आपणास कोणती माहिती हवी आहे, याचा अर्थ बोध होत नाही. त्यामुळे संदर्भीय अर्ज परत पाठविण्यात येत आहे, असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्याकरीता जावक नोंदवही दिनांक २४.९.२००७ च्या पृ्ष्ठाची छायांकित प्रत दाखल केली आहे.

**४.** असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपील मेमो मध्ये मात्र त्यांनी माहितीचा तपशिल दिलेला आहे. व माहिती उपलब्ध झाली नाही, असे आयोगापुढे युक्तीवादात सांगितले.

**५.** जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना कळविलेल्या खर्चाच्या संदर्भात त्यांनी भरणा केलेला नाही. तसेच प्रथम अपील मेमो मध्ये कोणत्याही प्रकारचे माहितीचे विवरण नव्हते व सोबत कोणतेही परिशिष्ट जोडलेले नसल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय देणे शक्य नव्हते व त्यामुळे यांना विहित मुदतीत तसे कळविण्यात आलेले आहे.

**६.** यावरुन अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात विहित मुदतीत कार्यवाही झालेली आहे व विहित मुदतीत प्रथम अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे, असा निष्कर्ष काढावा लागतो. मागितलेल्या माहितीच्या संदर्भात मुद्या क्रमांक १ ची माहिती ही कारणे

अशी असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. मात्र मुद्या क्रं. २,३,४ च्या संदर्भामध्ये जी कागदपत्रे किंवा अभिलेखे असतील त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र, अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहितीचा खर्च भरणा करावा हे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करणे आवश्यक राहील.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १.८.२००७ च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये दिनांक ९.८.२००७ रोजी अतिरक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले असल्यामुळे सदरच्या खर्चाचा भरणा अपीलकर्ता यांनी केल्यावरच त्यांना ७ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५/२००८**

**१) श्री गोसाई कचरुजी नगराळे,**
**नेहरुनगर वार्ड क्रं.४,**
**डी.आर.सी.रोड-४, चंद्रपूर, ता.जि.चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**चंद्रपूर. ता.जि. चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचे पत्र दिनांक ३.२.२००९ अन्वये "आपणाकडे अपील अर्ज सादर केला त्या अनुषंगाने मा.अपील अधिकारी चंद्रपूर व जन माहिती अधिकारी, चंद्रपूर यांनी मला कार्यालयात बोलावून समस्याचे निरसन करुन समस्या सोडविली असल्यामुळे मला आता अपीलावर कुठलाही आक्षेप राहीला नसल्यामुळे मी माझे अपील क्रं.५/२००८ परत घेत आहे." असे आयोगास लेखी सादर केली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६६५/२००७**

**१) श्री डॉ. राजेश माणिकरावजी नाईक,**
**शिवाजी नगर, गणेश मंदीराजवळ, चिटणविसपुरा,**
**महाल, नागपूर-४४००३२.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष**
**वाणिज्य महाविद्यालय ट्रस्ट, यवतमाळ,**
**C/o कला आणि वाणित्य महाविद्यालय, शिवजीनगर,**
**यवतमाळ-४४५००१.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ,**
**शिवाजीनगर, यवतमाळ-४४५००१.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. सदरच्या प्रकरणामध्ये अपील क्रमांक १९८४/२००७, दिनांक १६.९.२००८ रोजी आयोगाने निर्णय दिलेला आहे. व आज सुनावणीस असलेले अपील हे सारखेच असल्यामुळे एकदा निर्णय दिल्यानंतर पुन्हा त्याच प्रकरणात निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) सदरच्या अपील प्रकरणामध्ये यापुर्वी अपील क्रं.१९८४/२००७ मध्ये दिनांक १६.९.२००८ रोजी निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

Februuary,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६६१/२००७**

**१) श्री कृष्णकुमार हिरालालजी डागा,**
**अरमाईन एक्सपोर्ट (इंडीया) लिमीटेड,**
**बिसेसर हाऊस, सिव्हील लाईन, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,**
**नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१२.२००७रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे पावर ऑफ अटर्नी म्हणून श्री मेहरा हजर आहेत. माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली नाहीत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२००७ रोजी माहिती अधिकारी श्री राजेश वासनिक, महानगरपालिका यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"That what action has been taken/initiated by the corporation in respect of its notice dated ०७.०२.२००२ vide Notice २/EPS/Zone No.१/issued to Kala Holding Pvt.Ltd.and others under section ४२३ of corporation Act for non-compliance of order under section २८६(२) of corporation Act.

(२) Supply of entire information/Documents on record, regarding action taken by the corporation in respect of the above said notice.

(३) That if no action has been initiated bay the corporation, than you are requested to supply the names & designation of the officers who have failed to perform their duties." सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.१०.२००७ रोजी

प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या माध्यमातून सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**२.** अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, राजेश वासनिक या नांवाचे कोणीही सेवेत अधिकारी नव्हते व सदरच्या अर्जामध्ये अतिक्रमणाच्या संदर्भात माहिती मागितलेली असल्यामुळे सदरचा अर्ज हा दिनांक १८.९.२००७ रोजी अतिक्रमण शाखेकडे उपलब्ध झाला व त्यानंतर संबंधीत झोनकडून माहिती मागविण्याचा प्रयत्न केला. त्या संदर्भात दिनांक १.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी सहाय्यक आयुक्त झोन क्रमांक-२ यांना पाठविलेल्या अर्जाची प्रत सुध्दा अग्रषित केलेली आहे. यावरुन माहिती देण्याचे टाळाटाळ करण्यात आली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. परंतु प्रथम अपीलाच्या माध्यमातून सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील नस्ती नंदलाल चौकशी समितीकडे दाखल करण्यात आलेली होती. व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु असे असले तरी प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली नाही व निर्णय देण्यात आलेला नाही. अन्यथा त्याच वेळेस अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या संदर्भातील संपुर्ण कल्पना देता आली असती व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे. व त्याकरीता त्यांना ताकीद देणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी यापुढे प्रथम अपीलाची सुनावणी घेवून सार्वजनिक प्राधिकरणाच्या स्तरावरच माहिती उपलब्ध होईल, अशा प्रकारचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**३.** परंतु, आज माहिती उपलब्ध आहे व ती माहिती दिनांक १३.२.२००९ रोजी श्री कृष्णकुमार हिरालालजी डागा यांना स्पीड पोस्टाने पाठविलेली आहे असा पुरावा दाखल करण्यात आलेला आहे. परंतु सदरची माहिती अजूनपर्यंत त्यांना मिळाली नाही, असे अपीलकर्ता यांनी सांगितले. असे असले तरी व्यक्तीशः आज माहिती उपलब्ध करुन देता येईल असे जन

माहिती अधिकारी यांनी सांगितल्यामुळे सदरचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)  अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १३.९.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यावर माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी व अपीलकर्ता यांनी पोच द्यावी.

२)  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६६९/२००७**

**१) श्री ओमप्रकाश रामरतन शिरपुरीया**
**ॐ निकेतन, अलंकार टॉकीजसमोर,**
**आरमोरी रोड, ब्रम्हपुरी-४४१२०६,**
**जिल्हा चंद्रपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक,**
**नागपूर. — उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा, चंद्रपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००७रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा, चंद्रपूर यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : (१) "शासनाच्या पूर्व मंजूरी प्रति (२) मासिक वेतन वंचना निराकरण बाबत (३) विलंबित वार्षिक वेतनवाढी प्रदान बाबत (४) अविधीवत न्यायप्रविष्ठ प्रकरणे शासनाकडे परत मागविलेल्या पत्राची प्रत. वरील तपशिलाप्रमाणे वर्णन- (१) मी संरक्षीत लोकसेवकास कार्यरत असताना मार्च ९९ मध्ये स्थानबध्द करण्याकरीता देण्यात आलेल्या शासनाच्या पूर्वमंजूरीची प्रत. (२) शासन परिपत्रक क्रमांक-इएनक्यु५११०६/प्र.क्रं.९९/पोल-२ मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि. २२ डिसेंबर, २००६ मधील नमूद प्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता

१९७२(सन १९७४ चे २) च्या कलम १९७(१) मधील तरतुदी नुसार, शासनाचे मत्स्यवर्धक विकास यंत्रणा, गडचिरोली अंतर्गत शासकिय कामे पार पाडताना राबविण्यात येणा-या शासन योजना अंतर्गत अधिकारी. मत्स्यविभाग कार्यालय गडचिरोलींना न्यायप्रविष्ठ करण्याकरीता देण्यात आलेली शासनाची पूर्वमंजूरी प्रत. (३) संबंधीत न्यायप्रविष्ठ प्रकरणी न्यायालयीन उपस्थिनुषंगाने विलंबीत माझे मासिक वेतन वंचना निराकरण व प्रदान बाबत अवलंब कार्यवाही व मंजूरीची प्रत. (४) कार्यकालीन वार्षिक वेतनवाढी १ जून २००५ ते दि. १ जून, २००६ व दि. १ जून २००६ ला देय विलंबामुळे होणारी आर्थिक नुकसान टाळण्याकरीता वार्षिक वेतनवाढ प्रदानबाबत अविलंब कार्यवाही मंजूरीची प्रत. (५) संरक्षीत लोकसेवकाविरुध्द त्यांच्या कार्यालयीन कामकाजासंबंधात शासनाची पूर्वमंजूरी न घेता न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्याची कार्यवाही फौजदारी प्रक्रिया संहितेतील उपरोक्त कलम १९७(१) मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्यामुळे संबंधित सर्व प्रकरणे शासनाकडे परत मागविलेल्या वा परत मागविण्याच्या पत्राची प्रत."

**३.** अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने त्यांना दिनांक २७.९.२००७ रोजी ३ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले नाही व राज्य माहिती आयोगाकडे मात्र अपील दाखल केलेले दिसून येते.

**४.** अपीलकर्ता यांना दिनांक २७.९.२००७ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये त्यांना शासनाच्या पुर्व मंजूरीची प्रत उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच त्यांचे मासिक वेतन वंचना निराकरण झालेले नाही व विलंबित वार्षिक वेतन वाढी प्रदान करण्याबाबत त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात ज्या कागदपत्रांच्या, अभिलेखे, टिपण्या इ. स्वरुपात माहिती उपलब्ध असते त्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. व त्याप्रमाणे शासनाच्या पूर्व मंजूरीची प्रत त्यांनी मागितलेली असल्यामुळे त्याबाबत जे पत्र पाठविलेले आहे त्या पत्राची छायांकित प्रत त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यांच्या इतर मागण्यांच्या संदर्भामध्ये माहिती त्यांना उपलब्ध झालेली आहे व उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे त्यांनी योग्य त्या सक्षम अधिका-यांकडे तक्रार करुन

न्याय मागणे संयुक्तिक राहील. मात्र, मुद्या क्रमांक १ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना त्यांच्या दिनांक १७.९.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये शासनाच्या पूर्व मंजूरीच्या संदर्भामध्ये जे पत्र कार्यालयात उपलब्ध असेल त्या पत्राची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६६७/२००७**

**१) श्रीमती गेंदा गोविंदराव सोनटक्के,**
**प्राथमिक आरोग्य केंद्र, अडपल्ली(माल)**
**ता.मुलचेरा, जिल्हा गडचिरोली. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**मुख्य कार्यपालन अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गडचिरोली. ..उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी -**
**१) जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद,गडचिरोली**
**२) संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती,आरमोरी. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, आरमोरी यांचे प्रतिनिधी श्री जे.पी. जांभूळकर, अधीक्षक, हजर आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर असून त्यांनी काहीही कागदपत्रे दाखल केली नाही.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२००९ रोजी माहिती अधिकारी म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितलेली आहे.

**हव्या असलेल्या माहितीचे वर्णन** :"सन १९९५ ते २००० पर्यंतची ANM पदाची ज्येष्ठता सूची कोणत्याही एका वर्षीची अधिकारी यांच्या सहिनिशी ३ प्रती सत्यप्रत. (२) २००० ची ज्येष्ठतासूची LHV बॅचची सत्यप्रत सहिनिशी ३ प्रती (३) व्हि.एम. सोनवाणे LHV हयांची आदेशाची सत्यप्रत M.O. हयांच्या सहिनिशी ३ प्रती. (४) श्रीमती कल्पना रामटेके, LHV धानोरा हयांच्या

आदेशाची सत्यप्रत M.O. हयांच्या सहिनिशी सत्यपत ३ प्रती. (५) श्रीमती सुगंधा गॅनिराम बोरकर, LHV हयांची आदेशाची सत्यप्रत सहिनिशी ३ प्रती."

**३.** विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १६.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या माध्यमातून सुध्दा माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २४.९.२००७ रोजी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती अधिका-यांचा तपशिल जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली असा दिला आहे. व असे असून सुध्दा जिल्हा आरोग्य अधिकारी हे आज गैरहजर आहे. अपीलकर्ता यांनी संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, आरमोरी यांचेकडे दिनांक २८.३.२००७ रोजी माहिती मागितलेली होती. तरीही सदरचे माहिती अधिकारी सुध्दा हजर नसुन त्यांचे प्रतिनिधी हजर झालेले आहे.

**४.** वास्तविक, अपीलकर्ता यांनी ज्या अर्जाची प्रत दाखल केली आहे त्यात जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे. व आयोगाच्या कार्यालयातून नोटीस काढताना सुध्दा जिल्हा आरोगय अधिकारी व संवर्ग विकास अधिकारी यांना नोटीस काढलेली आहे. परंतु, जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. खुलासा दाखल करताना दिनांक २९.३.२००७ च्या अर्जाच्या संदर्भात कार्यालयात माहिती नसल्यामुळे दिनांक २.४.२००७ रोजी संबंधीत अर्जदाराचा अर्ज परत पाठविला. एकुण प्रकरणातून असे दिसून येते की, संपूर्ण माहिती ही, जिल्हा आरोगय अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध आहे व त्यांनी या संदर्भातील माहिती दिनांक ४.५.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयातील संबंधीत माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. परंतु, आज ते गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकूण घेता येत नाही. त्याकरीता त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची

कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक ठरते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून माहिती अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय,गडचिरोली यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत सदरची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय,गडचिरोली हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना करावयाची आहे.

३) वरील प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीसाठी सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना स्वतंत्रपणे, पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६७०/२००७**

**१) श्री यु.एस. नामदेव,**
**०७, कमल केशव प्लाजा**
**सेंट्रल बाजार रोड, रामदासपेठ, नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**परिमंडळ-१, सिताबर्डी, नागपूर. — उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**सिताबर्डी विभाग, नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.२.२००९रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे.

"दिनांक २९.८.२००७ च्या घटनेच्या संदर्भात दिनांक २९.८.२००७ ला पत्रकार उमेश जोशी वर धंतोली पो.स्टे.अंतर्गत पत्रकार परिषद आवारात केलेला प्राणघातक हल्ला यावर पोलीसकडून काय कारवाई करण्यांत आली आणि या प्रकरणावर कोणकोणते आरोपींना अटक करण्यांत आली, त्यांचे संपूर्ण नांव आणि या संपूर्ण प्रकरणावर अर्जदार उमेश जोशी व गैरअर्जदार प्रमोद अग्रवाल, रत्नाकर पखाले तसेच इतर आरोपी यांचे घेतलेली बयाणाची व एफ.आय.आर.ची प्रमाणित प्रत देण्यांत यावी."

**३.** विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु, दिनांक २२.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या

संदर्भामध्ये दिनांक २७.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती दिनांक २३.११.२००७ स्पिड पोस्टाने पाठविलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आले, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

**४.** अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, दिनांक २३.११.२००७ रोजी माहिती विलंबाने उपलब्ध झालेली असून फिर्यादीची प्रत व बयाणाची प्रत उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपीलकर्ता हे सदरच्या प्रकरणात फिर्यादी सुध्दा नाही. असे असले तरी माहिती व्यक्तीशः मागितलेली असल्यामुळे व अपीलकर्ता हे विहित मुदतीच्या कालावधीत जन माहिती अधिकारीयांचेकडे माहिती घेण्यास आलेले नसल्यामुळे माहिती त्यांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देता आली नाही. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केल्यावर अपीलकर्ता अर्जदार यांनी ३० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते. कोणतेही जन माहिती अधिकारी, अपीलकर्ता यांच्या घरी जावून माहिती उपलब्ध करुन देण्याचे अपेक्षित नाही व विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तर त्या प्रकारचा आक्षेप घेणारे पत्र हे जन माहिती अधिकारी यांना देणे आवश्यक असते. परंतु, तशी प्रकारचे आक्षेप घेणारे पत्र अपीलकर्ता यांनी दाखल केले नाही. व त्यामुळे जी माहिती पाठविली आहे ती योग्यरित्या पाठविली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांनी ज्यावेळेस माहिती मागितली, त्यावेळेस गुन्हयाचा तपास सुरु असल्यामुळे बयाणाची प्रत देता येणार नाही याकरीता जे कारण दिलेली आहे ते योग्य आहे व त्यामुळे माहिती देण्याचे टाळाटाळ केली आहे, असा निष्कर्ष काढता येत नाही. असे असले तरी आज सदरच्या गुन्हयाच्या संदर्भामध्ये आरोपपत्र दाखल झालेले असल्यामुळे अपीलकर्ता यांना फिर्यादीची प्रत तसेच बयाणाची प्रत उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची अडचण येण्याचे कारण नाही. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे

अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत फिर्यादीची प्रत तसेच बयाणाची प्रत विना मुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिति अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६७७/२००७**

**१) श्री राधेश्याम परसरामजी काबरा,**
**शिवाजी वार्ड, ब्रम्हपुरी रोड,**
**मु.पो.ता.देसाईगंज-४४१२०७, जि.गडचिरोली. अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**जिल्हा व सत्र न्यायालय,**
**न्यायमंदीर गडचिरोली. ता.जि.गडचिरोली. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**जिल्हा व सत्र न्यायालय,**
**न्यायमंदीर गडचिरोली, ता.जि.गडचिरोली. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२०००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीनेही माहिती अधिकारी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २.८.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) गडचिरोली येथील विशेष (शास.) दिवाणी दावा क्रमांक २/२००० च्या अनुषंगाने खालील मागितलेली माहिती मिळण्याबाबत.

(दोन) ज्या कालावधी संबंधात तो कालावधी : दावा दाखल तारीख २४.७.२०००, दावा निकाल तारीख १८.७.२००७

(तीन) हव्या असलेले माहितीचे वर्णन : (१) आपले (वादीच्या) तक्रार अर्जाप्रमाणे चालू महाल चौकशी पुर्ण करुन मा. जिल्हाधिकारी गडचिरोली यांचेकडे नकाशा दुरुस्ती बाबतचा प्रस्ताव

सादर करण्यात येईल असे दि. ७.११.९८ रोजी प्रतिवादी क्रमांक ५ ने वादीला व इतर ७ अधिका-यांना कळविल्याचे निशानी क्रमांक १३६ प्रमाणे सिध्द होते काय?

(२) वादीने दि. ६.७.९८ चे तक्रार अर्ज Exh.४/४६, Exh. ४/२८ निशानी क्रमांक १३१ देसाईगंज कोर्टातील दावा क्रमांक रे.म.नं.१/९९ (निशानी क्रमांक २२३) व गडचिरोली कोर्टातील दावा क्रमांक २/२००० पूर्वी दिल्याचे सिध्द होते काय?

(३) दि. ७.११.९८ ते दावा दा ाल तारीख २४.७.२००० हया वीस महिन्याच्या कालावधीत निशानी क्रमांक १३६ प्रमाणे नकाशा दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांना सादर झाला असता तर वादीला आर्थीक, शारिरीक व मानसिक त्रास सहन करुन न्यायालयात दावा दाखल करण्याची पाठी आली नसती हे सिध्द होते काय? याची माहिती मिळण्याबाबत.

(४) देसाईगंज कोर्टातील दावा क्रमांक रे.मु.नं. १/९९ व गडचिरोली कोर्टातील दावा क्रमांक २/२००० दाखल करण्यापूर्वी वादीने आपली कैफियत/तक्रार सरकार पक्ष प्रतिवादी क्रमांक २ ते ६ च्या नजरेस आणून दिल्याचे सिध्द होते काय? हयाची माहिती मिळण्याबाबत.

(५) देसाईगंज कोर्टाने सरकार पक्ष प्रतिवादी क्रमांक २ ते ६ यांना वादीच्या तक्रार अर्जावर कोर्टाचा निकाल लागेपावेतो कोणतीच कार्यवाही करु नये असे आदेश दिल्याचे निशानी क्रमांक २२३ प्रमाणे सिध्द होते काय? हयाची माहिती मिळण्याबाबत.

(६) आपण (वादी) मा. कोर्ट विद्यमान व्यवहार न्यायाधीश ता.स्तर देसाईगंज यांचे कोर्टात दि. ३.२.९९ रोजी दावा दाखल केल्यामुळे सदर प्रकरणांत कोर्टाचा निकाल लागेपावेतो आपले प्रकरणात कार्यालयाकडून कोणताच निर्णय देता येत नाही असे प्रस्ताव दि. १.९.९९रोजी निशानी क्रमांक १३८ प्रमाणे प्रतिवादी क्रमांक ५ ने प्रतिवादी क्रमांक ४ ला सादर केल्याचे सिध्द होते काय? हयाची माहिती मिळण्याबाबत.

(७) वादीला देसाईगंज कोर्टात सरकार पक्षाला प्रतिवादी बनविणे शक्य नव्हते तसेच सरकारी पक्ष प्रतिवादी क्रमांक २ ते ६ हयांना प्रतिवादी बनविण्याकरिता वादीला दावा गडचिरोली न्यायालयात दाखल करावा लागला हे सिध्द होते काय? हयाची माहिती मिळण्याबाबत.

(८) दि. २४.७.२००० ला वादीने दावा क्रमांक २/२००० दाखल करतेवेळी कलम ८० दिवाणी प्रक्रिया संहिताची नोटीस न देता दावा ाखल करीत असल्याचे मा. न्यायालयाचे निदर्शनास

आणून दिले परंतु न्यायालयाने दावा खारीज न करता प्रतिवादी क्रमांक २ ते ६ हयांना सुध्दा समनस बजावले तसेच दि. १३.११.२००० ला प्रतिवादी क्रमांक २ ते ६ चे written statement (निशानी क्रमांक ५९) दाखल झाल्यानंतर सुध्दा दावा खारीज करण्यात आला नाही किंवा दावा पुढे चालविण्याची परवानगी नाकारली नाही. हया सर्व परिस्थितीचा विचार करता दि. १८.६.२००७ च्या निशानी क्रमांक २५० च्या परिच्छेद क्रमांक २३ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद आहे की, नक्कीच हा दावा प्रतिवादी क्रमांक २ ते ६ विरुध्द टिकण्यांसारखा किंवा समर्थनीय (tenable) नाही. हयावरुन पीठासीन अधिका-यांनी निशानी क्रमांक ११७,११८,११९ कडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे सिध्द होते काय? हयाची माहिती मिळण्याबाबत.

(९) प्रतिवादींचे तोंडी व लिखीत माहितीवरुनच दावा क्रमांक २/२००० मधील प्रतिवादी क्रमांक २ ते ६ (सरकार पक्ष) यांची कैफियत दि. १३.११.२००० ला निशानी क्रमांक ५९ प्रमाणे श्री व्ही.के. न्यालेवार वकील साहेब यांनी मांडली तसेच री किशन नागदेवे प्रतिवादी क्रमांक १ यांची कैफियत सुध्दा श्री व्ही.के. न्यालेवार यांनीच मांडली, हे सिध्द होते काय?

(१०) निशानी क्रमांक १६९,२२३,२२४ चे उत्तर मा. न्यायालयात दाखल करणारे श्री न्यालेवार निशानी क्रमांक ५९ मध्ये पुढीलप्रमाणे माहिती सादर करतात की, The Civil suit bearing R.C.S. No. १/९९ dated by the plantiff against the defendant No.१ is denied. तरी ही माहिती निशानी क्रमांक १३८ ची दखल घेतल्यास परस्परविरोधी अर्थातच खोटी सिध्द होते काय? हयाची माहिती मिळण्याबाबत.

(११) निशानी क्रमांक ५९ च्या पेज ३ वर असे सुध्दा नमूद आहे की, the land was again measured Surveyar Shri Deshmukh on २५.११.९८ but denied that the copy of the said measurement has not been given to the plaintiff till this date. ही माहिती खोटी सिध्द होते काय.

(१२) निशानी क्रमांक १३६ वरुन दि. २५.६.९८ ला झालेल्या मोजणीची क शिट दि. ३०.१०.९८ प्रतिवादी क्रमांक ५ ने वादीला पाठविल्याचे सिध्द होते काय? हयाची माहिती मिळण्याबाबत.

(१३) निशानी क्रमांक १५३ दि. ३०.१०.९८ ला तयार झाल्याचे सिध्द होते काय?

(१४) दि. २५.११.९८ ची मोजणी (निशानी क्रमांक २१९) वादीच्या तक्रारीवरुन झाली हे सिध्द होते काय?

(१५) वादीची दि. ६.७.९८ ची तक्रार exh ४/२८ निशानी कमांक ) निशानी क्रमांक १५३ तयार होण्यापूर्वी दाखल झाली हे सिध्द होते काय?

(१६) निशानी क्रमांक ५९ च्या परिच्छेद ९ मध्ये असे नमूद आहे की, all the documents filed by the fplaintiff are denied  तरी हे सिध्द झाले काय, हयाची माहिती मिळण्याबाबत.

(१७) दि. २७.२.९८ रोजी झालेल्या मोजणीस (निशानी क्रमांक १५२) प्रतिवादी क्रमांक १ उपस्थित होते तसेच ही मोजणी प्रतिवादी क्रमांक ६ ने केली हे सिध्द होते काय? हयाची माहिती मिळण्याबाबत.

(१८) दि. २७.२.९८ रोजीची मोजणी (निशनी क्रमांक १५२ व दिनांक २५.६.९८ रोजीची मोजणी (निशानी क्रमांक १५३) प्रतिवादी क्रमांक ६ नेच केली हे सिध्द होते काय? हयाची माहिती मिळण्याबाबत.

(१९) वादीच्या निशानी क्रमांक ४ चे वादी ने हजर केलेल्या दस्ताऐवजाची यादी चे २८ ते ३९ ला व ५४ तसेच ६३,६४,६५,६९,७२ ला निशानी क्रमांक काय पउले हयांची माहिती मिळण्याबाबत.

(२०) वादीने प्रतिवादी क्रमांक १ ला दि. १३.५.९८ रोजी नोटीस (निशानी क्रमांक १६०) पाठविले व हयाचे उत्तर प्रतिवादीचे वकील श्री ढोरे यांनी वादीला दि. २५.६.९८ रोजी निशानी exh ४/७२ पाठविल्याचे सिध्द होते काय, हयाची माहिती मिळण्याबाबत.

(२१) प्रतिवादीच्या दि. २९.५.९८ च्या खरेदी खत निशानी क्रमांक २४५ च्या पूर्वी वादीने प्रतिवादीला नोटीस पाठविले हे सिध्द होते काय? सिध्द होत असल्यास नोटीस मिळाल्यानंतर सुध्दा प्रतिवादीने अशी मालकीची/वादग्रस्त जागा खरेदी करण्याचा मनसुबा कां केला हयाचा विचार न्यायालयाने केला आहे काय?

(२२) निशानी क्रमांक ४ वादीने हजर केलेल्या दस्ताऐवजातील यादीतील अनुक्रमांक ७० ला निशानी क्रमांक १५२ व अनुक्रमांक ६२ ला निशानी क्रमांक १५३ पडला हे सत्य आहे काय? तसेच अनुक्रमांक २८ ला निशानी क्रमांक १३१ पडला हे सत्य आहे काय?

(२३) वादीने दि. ८.५.९८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवर निशानी क्रमांक ९५ पोलीस खाते ही कार्यवाही करण्यास असमर्थ असतील तसेच वादीच्या दि. ६.७.९८ च्या तक्रारीवर exh ४/२८ सरकारी पक्ष ही कार्यवाही करण्यास असमर्थ असतील तसेच मा. कोर्ट विद्यमान व्यवहार न्यायाधीश क.स्तर देसाईगंज निशानी क्रमांक २२३ हे सुध्दा सरकारी पक्षावर कार्यवाही करण्यास असमर्थच दिसले. तसेच निशानी क्रमांक २५० प्रमाणे परिच्छेद २० मुद्या क्रमांक ५ सव्हे नकार्ड दुरुस्त करण्याचे आदेश देण्याचे अधिकार दिवाणी न्यायालयाला नाही. परंतु कर्तव्यात हलगर्जीपणा व कसूर करणा-यावर कार्यवाही करण्याचे आदेश देण्याचे अधिकार सुध्दा न्यायालयाला दिसत नाही. ज्या मा.जिल्हाधिका-यांकडे तक्रारी प्रलंबीत आहेत व जिल्हाधिकारी म्हणतात न्यायालयात मामला न्यायप्रविष्ठ असल्यामुळे आम्ही कार्यवाही करु शकत नाही. एकीकउे सरकारी पक्ष साक्ष, उलटतपास व युक्तिवाद करीत नाही मात्र दि. १३.१२.२००१ निशानी क्रमांक ५ च्या आदेशावर मात्र प्रतिवादी क्रमांक १ वर आर्डर नं. २ असतांना हया निर्णयाविरुध्द शासन in the court of additional district judge येथे mise civil appln No. ४/२००२ अपील करतात. सदर अपीलाच्या केसमध्ये दि. १३.६.२००२ ला माझ्‍ याकडून जी कागदपत्रे पेश करण्यात आली त्यांचे निशानी क्रमांक काय आहे हयाची माहिती मिळण्याबाबत." सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

**३.** सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०.८.२००७ रोजी विहित मुदतीत अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये त्रुटी आहेत, या कारणास्तव तसेच दावा क्रमांक ०२/२००० मधील तुम्हास पाहिजे असलेला कागदपत्राच्या प्रमाणित प्रती घेवून स्वतः न्यायालयात येवून अपील दाखल करावे, असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी, जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय

हा दिनांक १.९.२००७ रोजी देण्यात आलेला असून त्यात अपीलकर्ता यांनी अर्जातील त्रुटया ७ दिवसांत निवारण कराव्या किंवा अपील दप्तरी दाखल करावे असे आदेश दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १२.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी त्रुटया दूर केलेल्या नसल्यामुळे अपील हे दप्तरी दाखल करण्यात येत आहे असे आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १७.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांना अपीलाच्या निर्णयाबध्दल पत्र तयार केलेले दिसून येते. परंतु, अर्जासोबत टपाल खर्च दिलेला नसल्यामुळे सदर्हु पत्र अपीलार्थीला पाठविण्यात येवू नये असे आदेश अपीलीय प्राधिकारी यांनी मौखिय आदेश दिले. सदरच्या आदेशावर अधीक्षक यांची दिनांक १८.१०.२००७ रोजीची सही आहे. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

**४.** अपीलकर्ता यांच्या दिनांक २.८.२००७ च्या अर्जास दिनांक १०.८.२००७ रोजी जे उत्तर देण्यात आलेले आहे ते उत्तर स्वयंस्पष्ट नाही. मा. उच्च न्यायालयाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे स्वतंत्र नियम केलेले आहे. परंतु सदरचे स्वतंत्र नियम हे जनतेपर्यंत पोहचले नाही असे यावरुन दिसून येते. तसे जर नसेल तर अधिनियमाच्या कलम ४ प्रमाणे स्वत: सार्वजनिक प्राधिकरणाने कोणती माहिती प्रगट करावयाची आहे, त्याबध्दलची यादी दिलेली आहे व ती जनतेला सार्वजनिक प्राधिकरणाने सर्वसाधारणपणे दर्शनी भागात लावली पाहिजे. तरीही अपीलकर्ता यांना उत्तर देताना कोणत्या नियमाप्रमाणे त्रुटी आहेत, त्या नियमांची सुध्दा माहिती उत्तरात दिलेली नाही व त्यामुळे सर्वसाधारण जे नियम आहे ते नियम जनतेला वर्तमानपत्रामधून किंवा शासनाच्या माध्यमातून उपलब्ध झालेले आहे व त्यामुळे तेच नियम असावे या समजूतीप्रमाणे अर्जदार हे अर्ज किंवा अपीलावर कार्यवाही करीत असतात. दिनांक १०.८.२००७ च्या उत्तरामध्ये स्वयंस्पष्ट असे उत्तर दिलेले असते तर अपीलकर्ता यांना कदाचित पुढील अर्जामध्ये किंवा अपीलामध्ये त्रुटी ठेवण्याचे कोणतेही कारण नव्हते. परंतु, तेही करण्यात आलेले नाही. याबाबतची जबाबदारी अर्थातच, सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखाची आहे.

**५.** प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भात सुध्दा कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता कार्यालयाने सादर केलेल्या त्रुटींवर कार्यालयीन आदेश पारित करणे हे अपेक्षित नाही. व

त्यामुळे अशा प्रकारचे कार्यालयाने आदेश पारित केल्यास त्या बध्दलची माहिती ही अर्जदारास किंवा अपीलकर्त्यास होऊ शकत नाही व ती नैसर्गिक न्यायाच्या तत्वाप्रमाणे सुध्दा नाही.

६. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) किंवा (३) मधील प्रथम अपील किंवा द्वितीय अपील हे अर्धन्यायिक अधिकाराप्रमाणे निर्णय द्यावयाचा असल्यामुळे दोनही पक्षकारांच्या उपस्थितीत सुनावणी घेवून निर्णय देणे अपेक्षित आहे. तशी कार्यपध्दती प्रथम अपीलाच्या बाबतीत पाळण्यात आलेली नाही. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस जिल्हा न्यायालय, गडचिरोली येथील जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनी खुलासा दाखल केला आहे. सदरचा खुलासा हा विस्ताराने दाखल केलेला आहे. सदरच्या खुलाशामध्ये ज्याप्रमाणे नियमांचा उल्लेख केलेला आहे, त्याच नियमांची माहिती ही अर्जदारास सुरुवातीसच देण्यात आली असती तर त्यांना प्रथम अपील किंवा द्वितीय अपील करण्याची आवश्यकता नव्हती असे दिसून येते.

७. अर्जदाराने त्यांच्या अर्जामध्ये जी माहिती मागितलेली आहे ती दिवाणी दाव्यातील निर्णयाच्या संदर्भात विश्लेषण करणारी आहे. अर्थातच, मा. न्यायालयाचा निर्णय कोणत्याही प्रकरणात मान्य नसेल तर त्याकरीता वरिष्ठ न्यायालयामध्ये अपील दाखल करता येते. व त्यामुळेच कोणत्याही न्यायालयीन प्रकरणामधील निर्णयाच्या बाबत अपीलाच्या मुद्यांशिवाय विश्लेषण करुन मागता येत नाही. व त्याकरीता न्यायिक प्रकरणातील कागदपत्रांची माहिती हवी असल्यास मा. उच्च न्यायालयाच्या नियमाप्रमाणे ती अर्थातच न्यायालयाने पुर्वी केलेल्या नियमाप्रमाणे प्रमाणित प्रतीसाठी अर्ज करुन मागितल्यास ती उपलब्ध होऊ शकते व याबाबतचा अपवाद हा माहितीच्या अधिकाराच्या संदर्भात करण्यात आलेला आहे. परंतु, प्रश्न तोच की, या अधिनियमाची माहिती जनतेला नाही ती माहिती हरुन देणे हे त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाची जबाबदारी असते असे नमूद केलेले आहे. व त्यानंतरच अशा प्रकारच्या अपीलाचा निर्णय देणे योग्य राहील.

८. असे असले तरी मुळात अपीलकर्ता यांच्या अर्जातील माहिती सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नसल्यामुळे त्याबाबतचा विचार सुध्दा करता येत नाही. माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे माहिती या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. माहिती या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, दस्तऐवज, कागदपत्रे, टिपण्या, आदेश, परिपत्रके इ. स्वरुपाची जी माहिती उपलब्ध असेल त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असा माहितीचा अधिकारी या व्याख्येच्या संज्ञेत आहे. व त्यामुळे न्यायालयाने किंवा प्रशासनिक निर्णय प्रक्रियेच्या संदर्भातील कारण मिमांसा विचारणे अपेक्षित नाही. अशा प्रकारची कारण मिमांसा ही स्वतंत्रपणे त्या त्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे त्या त्या सक्षम अधिका-यांकडे अपील किंवा तक्रार दाखल करुन न्याय मिळवून घेता येतो व त्यामुळै अपीलकर्ता यांचा अर्ज मुळातच अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २.८.२००७ च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत पुर्नविलोकन अर्ज -**

**पुर्नविलोकन अर्ज क्रं. २/२००९**

**१) श्री ईफ्तेकार अहेमद वहिद सिध्दीकी,**
**रा. २५, सिध्दीकी कॅार्टेज,**
**राजीव गांधी नगर, उस्मानाबाद,**
**ता.जि. उस्मानाबाद.**
**(तत्कालीन पोलीस निरीक्षक चिखलदरा कॅम्प) अर्जदार.**

**(आदेश पारित दिनांक १८.२.२००९)**

**निर्णय**

अर्जदार यांनी दिनांक १२.१२.२००८रोजी अपील क्रमांक ९६३/२००७ मधील आदेश क्रमांक १ मध्ये लादलेल्या शास्तीच्या संदर्भात पुर्नविलोकन अर्ज दाखल केला आहे. सदरच्या पुर्नविलोकन अर्जाची सुनावणी आज दिनांक १८.२.२००९ रोजी घेण्यात आली. अर्जदार हजर आहेत.

**२.** सदरच्या पुर्नविलोकन अर्जामध्ये व दाखल केलेल्या खुलाशामध्ये दिनांक १७.१०.२००० पासून ठाणेदार नव्हते, सेवा निवृत्त असल्याकारणाने तसेच अर्ज मिळाल्यापासून १२ दिवस फक्त कर्तव्यावर आहे. नंतर रजेवर जावून दिनांक ३१.१०.२००६ रोजी सेवा निवृत्त झालो व त्यामुळे सदरच्या अर्जावर माहिती उपलब्ध करुन देण्यास ते स्वत: जबाबदार नव्हते असे त्यांचे म्हणणे आहे. त्याकरीता त्यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

"महोदय, सादर विनंती की, मी पोलीस ठाणे चिखलदरा, जि. अमरावती येथे दिनांक १८.११.२००४ ते ३१.१०.२००६ या कालावधीत पोलीस निरीक्षक या पदावर ठोणेदार चिखलदरा म्हणून नेमणूकीस होतो.

दि. ४.१०. २००६ रोजी हे.कॅा.ब.नं. २४२ खांडवई यांनी रजिस्टर्ड पोस्टाने अर्जदार मुरलीधर दिवारु साखरे रा. धारगांव, यांनी माहितीच्या अधिकार अधिनियमानुसार त्यास ट्रक क्रमांक टीएन-२० टीसीआर ००९५ च्या बिहाली येथे दिनांक १४.२.२००२ रोजी झालेल्या अपघाताची कागदपत्राच्या प्रती मिळणेकामी अर्ज प्राप्त केला. त्यांनी सदर अर्ज माझेसमक्ष सादर केला. मी त्यावर पी.एस.आय. गोसावी यांना हे.कॅा. धोटकर यांच्याकउे रेकॅार्डची पाहणी करुन अर्जदारास माहिती देण्यास सूचना केल्या. त्यावेळी स्टेशन डा. दिवटीवर हे.कॅा.ब.नं. २४२

खांडवई हे होते. त्यांनी सदर अर्ज प्राप्त झाल्याची नोंद स्टे. डायरीला घेतली किंवा कसे हे मला माहिती नाही. परंतु सदर अर्जातील कागदपत्रांची तपासणी पी.एस.आय. गोसावी यांनी कार्यालयात (हे.कॅा.धोटकर यांच्या ताब्यातील रेकार्ड रुममध्ये) केली. घटनेचे कागदपत्रे मिळाले नाहीत, परंतु दिनांक १४.२.२००२ ची स्टेशन डायरी रेकॉर्डमध्ये मिळाली, त्यात सदर घटनेची नोंद होती. त्याची चौकशी तत्कालीन ए.एस.आय.श्री अशोक सोळंके ब.नं. १६६ यांनी केली अशी नोंद आहेत. परंतु त्यांनी चौकशी करुन त्याचा अहवाल पोलीस स्टेशनला सादर केल्याची नोंद नाही. ही माहिती मला पी.एस.आय. गोसावी यांनी दिली. मी त्यांना ए.एस.आय. साळंके हे कुठे बदलून गेले आहेत, त्यांचे नेमणूकीचे ठिकाणची माहिती देण्यास सूचना दिल्या. ए.एस.आय. सोळंके हे पोलिस उपरिरिक्षक या पदावर भरती होऊन सन २००३ मध्ये पोलीस स्टेशन सिताबर्डी नागपूर शहर बदलून गेले व त्यांचा फोन नंबर ९४२३१११९४७ असा आहे. म्हणून पी.एस.आय. गोसावी यांनी मला कळविले.

मी त्यांना फोनद्वारे संपर्क साधून सदर घटनेचे कागदपत्रांबाबत चौकशी केली असता त्यांनी कळविले की, सदर घटनेबाबत रिपोर्ट देणार गोपाल बडगे यांस रिपोर्ट व पंचानाम्याची नक्कल त्याच दिवशी दिली व चौकशीचे मुळ कागदपत्र तत्कालीन ठाणे्दार मयत श्री मिश्रा यांचेकडे अपघात समरी मंजुरीसाठी दिले. मी सोबत आणलेले नाही. अशी माहिती दिल्यानंतर माझेकडे कागदपत्र शोधण्यासाठी दोन पर्याय होते. १. सदर कागदपत्र उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे अपघात समरी मंजुरीकामी गेले किंवा कसे याची चौकशी त्यांचे कार्यालयात करणे, २. पोलीस मॅन्युअल भाग-२ प्रमाणे नाश करण्याची मुदत तीन वर्षे असल्याने ते कागदपत्रे नाश केले की कसे, ही चौकशी करत असताना मी आजारी पडल्यामुळे दिनांक १७.२.२००६ रोजी आजारी रजेवर गेलो व परत येवून ३१.१०.२००६ रोजी सेवानिवृत्त झालो. पोलीस स्टेशनचा चार्ज पी.एस.आय. गोसावीकउे होता.

**<u>सेवा निवृत्तीनंतरचा प्रगती अहवाल</u>**

अर्जदार मुरलीधर साखरे यांनी दिनांक २९.९.२००६ रोजी पाठविलेल्या अर्जानुसार ३० दिवसाच्या मुदतीत त्याने मागितलेली माहिती पोलीस स्टेशन चिखलदरा येथे उपलब्ध नसल्याने

व कागदपत्रांचा शोध घेणे चालू असताना त्याने प्रथम अपील दिनांक ११.११.२००६ चे अर्जानुसार पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण यांचेकडे रजिस्टर पोस्टाने पाठविले, त्याची सुनावणी उपविभागीय पोलीस अधिकारी, धारणी श्री एम.एम. देशमुख(निवृत्त) यांनी केली.

सदर सुनावणी पोलीस चौकशीप्रमाणे घेतलेली असून अर्जदाराचा अर्ज दिनांक १९.९.२००६ मध्ये चौकशीत मी गोळा केल्या माहितीतील स्टेशन डायरीचा उतारा करुन घेतला. तो उतारा व मुळ अर्ज सुनावणीत सामिल करुन पोलीस स्टेशन चिखलदरा येथून त्यांचे जावक क्रमांक ०१/के.म.अहवाल/१०/२००६ दिनांक ६.१२.२००६ अन्वये पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण यांचेकडे पाठवलेले आहेत.

सदर अहवालात त्यांनी नमुद केलेली सदर घटनेची नोंद स्टेशन डायरीला दिनांक १४.२.२००२ रोजी साना नं.११ व ३१ वर एएसआय साळुंके ब.न.ं१६६ व पी.पी.१११० हे चौकशी कामी गेल्याची व परत आल्याची नोंद हे.कॉ.चकरे, ब.नं.१५१९ निवत्त यांनी घेतलेली आहे. त्यांनी चौकशीचा अहवाल पोलीस स्टेशनला दाखल केल्याची नोंद नाही. मुरलीधर साखरे यांस दवाखान्यास पाठविल्याची नोंद नाही. तसेच अपघातासंबंधात पोलीस स्टेशनला कुठल्याही प्रकारच्या गुन्हयाची  नोंद रेकॉर्डला नाही. यामुळे नमूद केलेले कागदपत्रे चिखलदरा येथे उपलब्ध नसल्याने त्यांना देणे शक्य नाही. चौकशी करणारे अमलदार एएसआय सोळंके पो.उप.नि. पदावर २००३ मध्ये बदलून गेले. त्यांचा शोध घेवून कागदपत्र उपलब्ध झाल्यास देता येतील. अर्जदारास तसे कळविण्यास पोलीस अधीक्षक अमरावती यांना कळविले.

उपविभागीय पोलीस अधिकारी धारणी यांनी सुनावणी घेवून देखील अर्जदारास त्यांनी माहिती कळविली नाही व पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण यांना माहिती देण्यास लिहीले.

वरील कारणास्तव अर्जदारास हवी असलेली माहिती मिळाली नाही. म्हणून त्याने द्वितीय अपील मा. राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र नागपूर यांचे समक्ष सादर केले.

सदर द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक २.२.२००८ रोजी झाली असून सुनावणीचे वेळी कार्यरत ठाणेदार चिखलदरा यांनी माझेकडे, तसेच पीएसआय गोसावी, दिलीप धोटकर यांचेकडे दिनांक २९.९.२००६ चे अर्जाबाबत काहीच विचारपूस न करता दिनांक २९.९.२००६ चा

अर्ज दाखल केल्या त्यावेळी मी ठाणेदार होतो. असे ग्राहय धरुन त्याची नोंद रेकॉर्डमध्ये कोठेही घेतलेली नाही. मी चौकशीचे वेळी गोळा केलेले स्टेशन डायरीचे नोंदीचा उतारा घेवून त्याचे प्रतिसह रिपोर्ट सादर केलेला आहे. तसेच दिनांक ११.११.२००६ च्या प्रथम अपीलाबाबतची सुनावणी होऊन देखील प्रतिवादी क्रं. १ पोलीस उपअधीक्षक गृह अमरावती(ग्रामीण) यांनी बंदोबस्ताचे कारण दाखवून तारखेवर हजर राहीले नाहीत व प्रथम सुनावणीचे चौकशीचे कागदपत्रे मा. राज्य माहिती आयुक्त नागपूर यांचे समक्ष सादर केले नाही.

वरील कारणास्तव मा. राज्य माहिती आयुक्त नागपूर यांनी दिनांक २.२.२००८ रोजी :

१. अर्जदाराचे दिनांक २९.९.२००६ चा अर्ज व दिनांक ११.११.२००६ चे प्रथम अपीलाचे अर्जाबाबतची चौकशी.

२. अर्जदारास त्याने मागितलेली माहिती विनामुल्य अदा करण्यास पोलीस अधीक्षम अमरावती ग्रामीण यांना आदेश दिले.

पोलीस अधीक्षक अमरावती (ग्रा) यांनी सदरचे आदेशाची पुर्तता करणेकामी उपविभागीय पोलीस अधिकारी चांदूर रेल्वे श्री वसंत सयाम यांना आदेश दिला असता त्यांनी चौकशी करुन खालीलप्रमाणे अहवाल दिला आहे.

मुद्या क्रं.१ : ठाणेदार चिखलदरा यांना माहिती अधिकारान्वये अर्ज प्राप्त होताच त्यांनी सदरची माहिती प्राप्त करुन अर्जदारास ताबडतोब पुरवणे क्रमप्राप्त होते. तत्कालीन ठाणेदार सिध्दीकी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही किंवा त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांचेकडून करुन घेतली नाही. त्यामुळे अर्जदारास अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील करावे लागले.

अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सदर माहिती ठाणेदार चिखलदरा यांचेकडून मागीतली असता माहिती उपलब्ध न झाल्याने अर्जदारास माहिती पाठविणे शक्य झाले नाही. परिणामी अर्जदारास आयोगाकउे अपील करावे लागले व आयोगाचे चौकशी दरम्यान अपीलीय अधिकारी यांना दोषी ठरविण्यात आले. यामध्ये तत्कालीन ठाणेदार चिखलदरा, पो.नि.श्री सिध्दीकी (सेवा निवृत्त) हे दोषी दिसून येतात.

मुद्या क्रं.२ : अर्जदाराने मागितलेली माहिती पोलीस स्टेशनला उपलब्ध नाही. करीता अर्जदारास पुरविणे शक्य नाही. करीता अहवाल सादर.

खंडण - उपविभागीय पोलीस अधिकारी श्री सयाम यांनी वरील पाठविलेला अहवाल पूर्णपणे खोटा आहे. मा.राज्य माहिती आयुक्त यांनी दिनांक २.२.२००८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार अर्जदाराने मागितलेली माहिती देणे उपविभागीय अधिका-यांस त्यांनी वर दर्शविलेल्या अहवालाप्रमाणे ताबडतोब हस्तगत करुन त्या पुरविणे हे क्रमप्राप्त होते. परंतु त्यानी वर नमूद मुद्या क्रं.२ नुसार अर्जदारास पोलीस स्टेशनला माहिती उपलब्ध नाही म्हणून पुरविता येत नाही,असा अहवाल स्वतः पोलीस अधीक्षक अमरावती (ग्रा)यांचेकडे पाठवून जबाबदारीतून मुक्त झाले. सदर प्रकरण त्यांनी आपल्याकडे दिनांक ५.३.२००८ ते ४.७.२००८ पर्यंत ठेवूनसुध्दा अर्जदारास माहिती पुरवू शकले नाहीत व अर्जदारास सदर अहवालाची माहिती न देता पोलीस अधीक्षक अमरावती यांचेकडे अहवाल पाठवून मा. राज्य माहिती आयुक्त नागपूर यांनी दिनांक २.२.२००८ रोजी दिलेल्या आदेशाचा अवमान केला व उलट दि. २९.९.२००६ चा अर्ज आमचेकडे फक्त १२ दिवस याच कारणास्तव प्रलंबीत असताना आम्हास दोषी ठरवले. अशा प्रकारे चौकशी अधिकारी यांनी दो टप्पी भूमिका घेतली आहे.

श्री सयाम यांनी आपल्या अहवालात ठाणेदोर सिध्दीकी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. किंवा आपले अधिनस्त कर्मचारी यांचेकडून करुन घेतली नाही. असा खोटा उल्लेख केला आहे. मी माझे अधिनस्त अधिकारी पो.उप.नि. श्री गोसावी, हे.कॅा.धोटकर, हे.कॅा.खांडवई यांचे करवी सदर प्रकरणाची चौकशी करुन घेतली. पण श्री सयाम यांनी माझेकडे किंवा माझे वरील अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांचेकडे कोणतीही विचारपूस किंवा बयान वगैरे घेवून चौकशी केली नाही.

अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सदर माहिती ठाणेदार चिखलदरा यांचेकडून मागितली असता माहिती उपलब्ध न झाल्याने अर्जदारास माहिती पाठविणे शक्य झाले नाही व आयोगाने चौकशी दरम्यान अपीलीय अधिकारी यांना दोषी ठरविण्यात आले. यामध्ये तत्कालीन ठाणेदार सिध्दीकी हे दोषी दिसून येतात, असे अहवालात नमूद केले. परंतु श्री सयाम यांनी या प्रकरणी

कोणतीही चौकशी केली नसल्यामुळै त्यांना हे माहिती नाही की मी दिनांक ३१.१०.२००६ रोजी सेवानिवृत्त झालो व अर्जदार यांनीप्रथम अपील ११.११.२००६ रोजी अपीलीय अधिकारी यांचेकडे रजिस्टर पोस्टाने पाठवले. याशिवाय त्या काळी अपीलीय अधिकारी हे कोण होते, त्यांनी केव्हा माहिती मागीतली, याबध्दल त्यांनी अहवालात उल्लेखपण केला नाही व याची त्यांना जाणीवपण नाही. कारण त्यावेळी अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (गृह) अमरावती(ग्रा) हे पद त्यावेळी रिक्त होते. म्हणून सदर अपीलाची सुनावणी उपविभागीय पोली अधिकारी धारणी यांचेकडे देण्यात आली होती. त्यांनी प्रथम सुनावणी करुन त्याचा अहवाल पोलीस अधीक्षक अमरावती यांचेकडे पाठवला व अहवालाची माहिती अर्जदाराकडे दिली नाही आणि पोलीस अधीक्षक यांना अर्जदारास माहिती देण्या कळवले. म्हणून अर्जदाराने द्वितीय अपील केले. ही सर्व हकीकत पोलीस उपविभागीय अधिकारी चांदूर रेल्वे यांनी सदर प्रकरणाची चौकशी न करता खोटा अहवाल पाठविल्यामुळे त्यांना माहिती नाही.

श्री देशमुख यांनी अर्जदारास माहिती दिली नाही व पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण यांना अर्जदारास माहिती देण्यास कळवले. पोलीस अधीक्षक अमरावती यांनी पण अर्जदारास माहिती दिली नाही, म्हणून त्यांचे दोष लपविण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाने मा. राज्य माहिती आयुक्त यांचेसमक्ष दि. २.२.२००८ रोजी झालेली सुनावणीचे वेळेस अर्जदाराच्या दिनांक २९.९.२००६ चे अर्जाप्रमाणे त्याने मागीतलेल्या माहितीची मी केलेली चौकशीबाबत मला विचारपूस करुन अहवाल पाठविला नाही व अर्जदाराने दिनांक ११.११.२००६ रोजी केलेल्या अपीलाचे अर्जाची सुनावणी एस.डी.ओ.पी.ओ. धारणी यांनी घेवून अहवाल पोलीस अधीक्षक अमरावती (ग्रा) यांचेकडे पाठविला. त्यांची माहिती अर्जदाराला दिली नाही हे लपविण्यासाठी मा. आयुक्त यांची सुनावणीच्या वेळी अहवाल सादर केले नाहीत व खोटा अहवाल तयार करुन आम्हास दोषी ठरविण्यात आले आहे.

सदर प्रकरणी मी दिनांक ४.१०.२००६ रोजी अर्ज मिळाल्यानंतर दिनांक १६.१०.२००६ पर्यंत फक्त १२ दिवस शासकीय सेवेत होतो. या कालावधीत अर्जदाराने मागीतलेली माहिती त्यास पुरविण्याकरीता मी व माझे अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांनी रेकॉर्ड शोधून त्यास

देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पोलीस स्टेशनला रेर्कार्ड त्या १२ दिवसाचे कालावधीत मिळून आला नसल्याने अर्जदारास देण्यात आले नाही. अर्जदारास रेकॅार्ड देण्याची मुदत या कायदयाचे कलम ७(१)नुसार विहित मुदत ३० दिवसाची असून ती मुदत दिनांक ३.११.२००६ रोजी संपते व ४.११.२००६ पासून या कायदयाचे कलम २० अनुसार दोषींवर कार्यवाही केली जाते. मी दिनांक १.११.२००६ पासून शासकिय सेवेत नसल्यामुळे जन माहिती अधिकारी नाहीत. करीता हा कायदा लागू होत नाही. एकंदरीत सदर प्रकरणी पोलीस स्टेशनला रेकॅार्ड नसल्यामुळे अर्जदारास मुदतीत माहिती देता आली नाही.

तरी विनंती की, मी या कायदयाचे कलम २० मधील तरतूदीनुसार वाजवी कारणाशिवाय दुष्ट हेतूने, जाणूनबुजून, दिशाभूल किंवा माहिती नष्ट केलेली नाही. मी अर्ज मिळाल्या तारखेपासून १२ दिवस कर्तव्यावर होतो व नंतर रजेवर जाऊन ३१.१०.२००६ रोजी सेवानिवृत्त झालो. मला सेवानिवृत्ती वेतन ४५००/- रुपये मंजूर झालेले आहे. या सर्व बाबींचा विचार होऊन दि. २.२.२००८ चे सुनावणीत दिलेल्या आदेशाबाबत पुनरावलोकन व्हावे अशी विनंती आहे.

बचावासाठी खालील कागदपत्रे सोबत जोडत आहे.

१. दिनांक १७.१०.२००६ पासून आजारी रजेवर असल्याचे मा.आयजीपी साहेब अमरावती यांचे आदेशाची प्रत.

२. निवृत्तीचे आदेशाची प्रत.

३. सेवानिवृत्त वेतनाचे आदेशाची प्रत.

४. दि.१४.२.२००२ रोजीचे स्टेशन डायरीचा उताराचे प्रत.

५. दि.२.२.२००८ ची सुनावणीचे वेळी पोलीस निरीक्षक चिखलधरा यांनी दाखल केले आहे.

६. एसडीपीओ धारणी यांनी अर्जदाराचे दि. ११.११.२००६ चे अर्जाचे घेतलेल्या सुनावणीचा अहवालाची प्रत.

७. द्वितीय अपीलाची सुनावणीतील आदेशावरुन एसडीपीओ चांदूर रेल्वे यांनी केलेल्या चौकशीचे अहवालाची प्रत.

८. हे.कॅा.ब.नं.१५१९ निवृत्त उदयभार चकरे यांचे बयानाचे प्रत.

स्वा/-
आय.ए.डब्यू.सिध्दीकी,
सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक,
रा. उस्मानाबाद."

**३.** वरील खुलाशाच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अमरावती(ग्रामिण) यांनी चौकशी करुन अर्जदाराच्या दिनांक २९.९.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती देण्यास जे अधिकारी जबाबदार असतील त्यांचे विरुध्द चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शास्ती लादणे आवश्यक राहील. अर्जदार यांच्या अर्जाचे अनुषंगाने व दिलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने अपील क्रमांक ९६३/२००७ मधील आदेश क्रमांक १ हा रद्य करणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अर्जदाराचा अर्ज हा अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अर्जदार यांचा पुर्नविलोकन अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत असून पोलीस अधीक्षक अमरावती(ग्रामीण) यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील क्रमांक ९६३/२००७ मधील निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.९.२००६ च्या अर्जाप्रमाणे ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्यास जे अधिकारी जबाबदार असतील त्याबाबतची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे व ती करावी.

२) अपील क्रमांक ९६३/२००७ मधील आदेश क्रमांक १ हा रद्य करण्यात येत आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत अर्जदारास देण्यात यावी.

४) पोलीस अधीक्षक अमरावती(ग्रामीण) यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावे.

**नागपूर**
**दिनांक १८.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील/तक्रर -**

तक्रार क्रं. २०३/२००७
तक्रार क्रं. १३२/२००७
अपील क्रं २१४७/२००७
अपील क्रं २१४८/२००७
अपील क्रं २१४९/२००७

**तक्रार क्रं.२०३/२००७ आणि तक्रार क्रं.१३२/२००७**

श्री अनंतकुमार किसनराव पाटील,
ता.जि. अकोला. ..तक्रारदार

वि रु ध्द

१) जन माहिती अधिकारी,
दि अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अकोला. ..गैरतक्रारदार

**अपील क्रं २१४७/२००७ आणि अपील क्रं २१४८/२०००७**

जन माहिती अधिकारी,
दि अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अकोला. ..अपीलकर्ता

विरुध्द

१) श्री अनंतकुमार किसनराव पाटील (मुळ अपीलकर्ता)
ता.जि. अकोला.
२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सह निबंधक सह.संस्था, अमरावती. ..उत्तरवादी

**अपील क्रं २१४९/२००७**

श्री सुभाष पं. ठाकरे (त्रयस्थपक्ष),
ता.मंगरुळपीर, जि. वाशिम. ..अपीलकर्ता

विरुध्द

१) श्री अनंतकुमार किसनराव पाटील (मुळ अपीलकर्ता),
ता.जि.अकोला
२) जन माहिती अधिकारी,
दि अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अकोला.
३) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, अमरावती. ..उत्तरवादी

**(आदेश पारित दिनांक १८.२.२००९)**

**नि र्ण य**

राज्य माहिती आयोगाकडील दाखल झालेली तक्रार क्रं.२०३/२००७,तक्रार क्रं.१३२/२००७ अपील क्रमांक २१४७/२००७, अपील क्रमांक २१४८/२००७ अपील क्रं. २१४९/२००७ यामध्ये अनुक्रमे

श्री अनंतकुमार किसनराव पाटील हे तक्रारदार असून जन माहिती अधिकारी दि अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला, अपीलकर्ता श्री सुभाष पं. ठाकरे, त्रयस्थ पक्ष हे सुध्दा अपीलकर्ता आहेत. उत्तरवादी म्हणून जन माहिती अधिकारी, दि अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला, श्री अनंतकुमार किसनराव पाटील हे आहेत. श्री अनंतकुमार किसनराव पाटील हे आज हजर नाहीत. अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तर्फे ॲड. श्री सोळंकी हजर आहेत. श्री सुभाष ठाकरे यांचे तर्फे ॲड. श्री आनंद देशपांडे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचे तर्फे प्रतिनिधी हजर आहेत.

२. ॲड.श्री सोळंकी यांनी सदरच्या तक्रारीच्या व अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी दि अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांनी लेखी युक्तीवादातील परिच्छेद ९ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २(एच) अन्वये दिलेल्या शासकिय प्राधिकरण या संज्ञेत बँकेचा समावेश होत नाही, कारण बँकेची नोंदणी ही संविधानाद्वारे, संसदेने केलेल्या अन्य कोणत्याही कायद्याद्वारे किंवा राज्य विधान मंडळाने केलेल्या कन्य कोणत्याही कायद्याद्वारे किंवा समूचित शासनाने काढलेल्या आदेशाद्वारे झालेली नसून ती को-ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट नुसार स्थापन झालेली आहे. बँकेवर शासनाची मालकी नसून त्यांच्याकडून बँकेस भरीव वित्त पुरवठा झालेला नाही. त्याचप्रमाणे बँकेला कोणतेही शासनाद्वारे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष भरीव स्वरुपाचा वित्त पुरवठा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय बँकेस लागू होत नाही,असे आयोगाचे निदर्शनास आणले.

३. तसेच ॲड. श्री सोळंकी व ॲड. श्री देशपांडे यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० प्रमाणे नोंदणी झालेल्या डॉ.पंजाबराव देशमुख सहकारी बँकेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू होत नाही असा निर्णय राज्य माहिती आयोगाकडील अपील क्रमांक ५४४/०७, दिनांक १९.१०.२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिलेला आहे. व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही सुध्दा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० प्रमाणे नोंदणी झालेली असल्यामुळे व शासनाचे कोणत्याही प्रकारचे भरीव स्वरुपाचा वित्त पुरवठा

प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष बँकेस झालेला नसल्यामुळे, असा लेखी युक्तीवाद बँकेतर्फे सांगण्यात आलेला असल्यामुळे सदरच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस सुध्दा सहकारी संस्था म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू होणार नाही असा युक्तीवाद केला आहे. त्यामुळे अपील क्रमांक २१४७/२००७, २१४८/२००७ व २१४९/२००७ हे मंजूर करण्यास पात्र असून तक्रार क्रमांक २०३/२००७ व तक्रार क्रमांक १३२/२००७ हे खारीज करण्यास पात्र आहेत.

**आदेश**

१) तक्रार क्रमांक २०३/२००७ व तक्रार क्रमांक १३२/२००७ च्या संदर्भामध्ये सहकारी बँकेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होत नाही असा मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांचा निर्णय असल्यामुळे सदरच्या तक्रारी खारीज करण्यात येत आहेत.

२) अपील क्रमांक २१४७/२००७, अपील क्रमांक २१४८/२००७ व अपील क्रमांक २१४९/२००७ ही अपीले मंजूर करण्यात येत आहेत.

३) तक्रारदार, अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५४६/२००७**

**१) श्री रामभाऊ राजाराम बोंदरे, ग्रामसेवक**
**मु.ता. रामटेक, जिल्हा नागपूर. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**(पंचायत), जिल्हा परिषद, नागपूर. ..उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी, पंचायत विभाग,**
**जिल्हा परिषद, नागपूर. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१०.२००५ जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"आक्टोंबर ९९ पासून ते फेब्रुवारी २००३ चे न मिळालेले वेतन रोखण्यात आलेले वेतन संबंधाचा आदेशाच्या प्रति मिळण्याबाबत. (२) सेवा पुस्तक भाग-२ पासूनची दुसरी प्रत (डुपलीकेट प्रत) मिळण्याबाबत. ऑक्टोबर ९९ ते फेब्रुवारी २००३ पर्यंतचे वेतन व वेतन रोखण्याचे आदेशाच्या व इतर कागदपत्राच्या प्रति मिळण्याबाबत. सेवा पुस्तक भाग २ पासुनची दुसरी प्रत (अद्यावत नोंदीची) मिळण्याबाबत. आक्टोबर ९९ ते फेब्रुवारी २००३ रोखण्यात आलेले वेतन. दि. १.६.८६ पासुन ते पुढील सेवेतील चे कालावधीची माहिती. (सेवापुस्तक भाग २ पासुनची माहिती)." सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

**३.** विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले आहे, असे नमूद केले आहे. परंतु प्रथम अपीलाची प्रत दाखल केली नाही. प्रथम अपीलाची प्रत दाखल केली आहे ती दिनांक ११.७.२००७ ची आहे. त्यामुळे प्रथम अपील हे विहित मुदतीच्या नंतर दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

**४.** अपीलकर्ता यांनी अर्जात व्यक्तीशः माहिती घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी ३० दिवसांच्या आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तीशः जावून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते. व माहिती न दिल्यास आक्षेप घेणारे पत्र हे पुरावा म्हणून आयोगाकडे दाखल करावयाचे असते, तसे ते केलेले नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार दिनांक १७.११.२००५ व १४.१२.२००५ अन्वये संबंधीतास दस्तऐवज घेवून जाण्याबध्दल व्यक्त्ीगत कळविण्यात आले होते. परंतु, ते माहिती घेण्यासाठी आले नाही, व त्यामुळेच त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

**५.** प्रथम अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी अपील हे दीड वर्षाच्या नंतर दाखल केले आहे, जे अपील ३० दिवसांची मुदत संपल्यानंतर पुन्हा ३० दिवसांच्या आंत दाखल करावयाचे असते व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदीचे कोणतेही पालन केले नाही असे दिसून येते. मात्र, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती त्यांनंतर प्रत्यक्षपणे उपलब्ध करुन दिलेली आहे, असे सांगितले. तसेच यापुर्वी अपीलकर्ता यांनी दाखल केलेले अपील क्रमांक ८३६/२००७ हे आयोगाने दिनांक ५.१.२००८ अन्वये खारीज केलेले आहे, असेही आयोगाचे निदर्शनास आणून दिले. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे हा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२)अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९/२००८**

**१) श्री पंडीत हिरामणजी कंडे,**
**द्वारा कंडे (पटवारी) मु.पो.बोरगांव(मेघे)**
**ता.जि. वर्धा.-४४२००१. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक,**
**आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर. ..उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,**
**आरोग्य सेवा(कुष्ठरोग) चंद्रपूर,**
**ता.जि. चंद्रपूर. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००७(आयोगास प्राप्त दि. २९.१.२००८) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी सदरचे अपीलाचे अनुषंगाने "उपरोक्त विषयान्वये मी माहितीच्या अधिकारा अंतर्गत बहिणीच्या लग्न कार्यास १ लाख रुपयाची मागणी करण्यात आली होती. मला १ लाख रु. दि.२७.९.२००७ ला प्राप्त झाले. माझे समाधान झाले असे समजून अपील मागे घेत आहे," असे त्यांचे पत्र दिनांक २०.२.२००९ अन्वये आयोगास लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक २०.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ११/२००८**

**१) श्री मधुकरराव शामरावजी धोटे,**
**रा.तिरोडा, पो. काकडा, ता.कारंजा, जि.वर्धा.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,**
**वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय, सेवाग्राम रोड वर्धा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"दिनांक १.२.२००७ व दिनांक १२.३.२००७ रोजी कार्यवाही करीता पोलीस अधीक्षक वर्धा यांना पाठविलेला अर्ज दिनांक १.२.२००७ व दिनांक . दिनांक १.२.२००७ व दिनांक १२.३.२००७ रोजी मा. पोलीस अधीक्षक वर्धा यांना अर्जदारांनी दिनांक १.२.२००७ रोजी तरोडा येथे अर्जदाराला झालेल्या मारहाणी बाबत व अर्जदारांच्या पत्नीवर झालेल्या अत्याचारा संदर्भात कार्यवाही आरोपी व कारंजा पोलीसांवर कार्यवाही करण्याबाबत अर्ज दिले होते. त्या अर्जावर मा. पोलीस अधीक्षक, वर्धा यांच्याकडून कोणती चौकशी व कारवाई करण्यात आली. यांची लेखी माहिती व त्या संदर्भात असलेले सर्व चौकशी व कारवाई केल्याचे कागदपत्र अर्जदारास सात दिवसांत वरील पत्यावर पाठवावे." सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी असे नमूद केले आहे.

**३.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७.६.२००७ रोजी आपण मागणी केलेली माहिती आपल्याला पुरविण्याबाबत पोलीस निरीक्षक कारंजा यांना सूचना केलेली आहे.

आपण माहितीच्या दस्तऐवजाकरीता प्रति पेज रुपये २/- प्रमाणे साधे टपाल खर्च रुपये ५/- एवढा, रजिस्टर पोस्टाने रुपये २५/- अशी रोख रक्कम दर्शनी धनाकर्षाद्वारे, बँकेचे धानादेशद्वारे किंवा मनीऑर्डरच्या स्वरुपात पोलीस स्टेशन कारंजा येथे पी.ए.टू सुपरिन्टेन्डेंट ऑफ पोलीस, वर्धा या नांवाने करावा व यासंबंधीताची नियमाप्रमाणे पावती प्राप्त करुन घ्यावी, असे कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक २०.९.२००७ रोजी सुध्दा आपल्या माहितीच्या अधिकारात माहिती मिळण्याबाबतचा अर्ज दिनांक ११.६.२००७ अन्वये मागितलेल्या माहितीचे शुल्क रुपये २५/- प्राप्त झाले त्याप्रमाणे भरलेल्या शुल्काची पावती क्रमांक ५७६५११ दिनांक २४.०९.२००७ सोबत संलग्न आहे. सोबत एकुण ४ पाने माहिती सुध्दा संलग्न आहे असे पोलीस उप अधिक्षक (मुख्या)तथा शासकिय माहिती अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय, वर्धा यांनी कळविलेले दिसून येते. दिनांक ८.८.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यास गेलो असता माहिती घेण्यास नकार दिला असे पोलीस पाटील श्री अ.रा.देवरे वगैरे यांच्या सहया दिसून येतात. श्री प्रमोद तिजारे हे तामिलीकरीता गेले असता अर्जदाराने इंकार केला असे दिनांक १४.८.२००७ ची नोंद दाखल केलेली दिसून येते. व दिनांक २.१०.२००७ रोजी माहिती मिळाली. एम.एस.धोटे अशी सही समक्ष खरे यांची सही दिसून येते. असे असुन सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. त्याचप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिल्याचे पत्र सुध्दा आयोगाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. त्या पत्रामध्ये अपीलकर्त्यांची तक्रार ही खोटी असल्याचे निष्पन्न झाले असे कळविलेले दिसून येते. तसेच जनह माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या प्रकरणामध्ये दोन इसमांनी एकमेकांच्या विरुध्द तक्रार नोंदविलेल्या आहेत व त्याकरीता खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

"सविनय सादर आहे की, पो.स्टे.कारंजा घा.जि.वर्धा येथे दि. १.२.०७ ला १३.५० वा.रमेश रामराव सरोदे, वय ४२ वर्ष यांनी रिपोर्ट दिले की, त्यांचे शेतातील आंब्याचे वाळलेले झाड दिलीप भाऊराव दंडारे यांनी विकत घेतले. ते आंब्याचे झाड फियार्दी व त्यांचेसह ३ इसम तोडण्यांस गेले असता, मधुकर शामराव धोटे रा. तरोडा यांनी त्योचेशी भांडण करुन लोखंडी रॉडने हातावर मारुन जखमी केले, अशी रिपोर्ट दिल्याने स्टे.डा.सा.क्रं. २६/०७ दि. १.२.०७ मध्ये नोंद करुन त्यास वैद्यकिय तपासणी करीता रुग्णालयात पाठविले. वैद्यकिय अहवाला वरुन

व रिपोर्ट वरुन पो.स्टे. कारंजा येथे अप.क्रं.१४/०७ कलम ३२५ भादवी आरोपी मधुकर शामराव धोटे रा. तरोडा यांचे विरुध्द नोंद करण्यांत आला. त्यामध्ये आरोपी मधुकर शामराव धोटे यास अटक करुन त्यांचे विरुध्द दोषारोप पत्र क्रमांक २१/०७ दि. २८.२.०७ अन्वये तयार करुन मा. ज्युडिशियल कोर्ट, प्रथम श्रेणी कारंजा यांचे कोर्टात कि.केस क्रं.१६/०७ दि. २८.२.०७ अन्वये न्याय प्रविष्ठ करण्यांत आले.

अर्जदार मधुकर शामराव धोटे रा. तरोडा हे पो.स्टे.कारंजा येथे दिनांक १.२.०७ चे १६.०० वा. आले. व त्याने पो.स्टे.ला तोंडी रिपोर्ट दिले की, गैरअर्जदार अरविंद बापूराव नेहारे अधिक ३ लोकांनी शेतातील वाळलेले आंब्याचे झाड तोडण्यांत आले असतांना गैरअर्जदारांनी माझे पत्नीचे ब्लाऊज फाडले व मारपीठ केली. अशी रिपोर्ट दिली. त्यावरुन स्टे.डा.सा.क्रं.२८/०७ वेळ १६.०० वा. नोंद करुन अर्जदार यास वैद्यकिय तपासणी करीता ग्रामीण रुग्णालय कारंजा येथे पाठविले. त्यानंतर सदर अर्जदाराने टंकलेखित केलेली लेखी रिपोर्ट आणली. ज्यामध्ये अरविंद बापूराव नेहारे, दिलीप भाऊराव दंडारे अधिक २ अनोळखी इसम यांनी त्यांची पत्नी सौ. संगिता हिची बेईज्जत करुन मारहाण केल्याची तक्रार केली. ती रिपोर्ट स्टे.डा.सा.क्रं.३१/०८ वेळ १६.३० वा. नोंद करण्यांत आली व दि. ३.२.०७ ला पो.स्टे. कारंजा येथे अप.क्रं.१५/०७ कलम ३५४, ३२३, ३४ भादवी आरोपी अरविंद बापूराव नेहारे, दिलीप भाऊराव दंडारे, व कारंजा येथील २ इसम यांचे विरुध्दांत नोंद करण्यात आली. सदर प्रकरणात आरोपी विरुध्द पुरावा द्वेष बुध्दी खोटी तक्रार दिल्याचे निष्पन्न झाल्याने ब फायनल क्रमांक १/०७ दि. २८.४.०७ अन्वये तयार करण्यांत आला व मंजूरीस कोर्टात सादर करण्यांत आला आहे.

अर्जदार याने दि. १.२.०७ व १२.३.०७ रोजी मा.पोलीस अधीक्षक, वर्धा यांचेकडे लेखी अर्ज सादर केला की, सदर घडलेल्या प्रकरणाबाबत गैरअर्जदार यांचे विरुध्द काय कार्यवाही केली याबाबत अर्ज सादर केले होते. ते अर्ज उपविभागीय पोलीस अधिकारी आर्वी यांचेकडे चौकशी करीता पाठविण्यांत आले. सदर अर्जासंबंधीचा चौकशी अहवाल मा. पोलीस अधीक्षक, वर्धा यांना सादर करण्यांत आला.

अर्जदार याने माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत जनमाहिती अधिकारी समजून मा. पोलीस अधीक्षक, वर्धा यांचेकडे अर्ज केला की, दि. १.२.०७ व १२.३.०७ ला दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही केली याबाबतचे कागदपत्र दि. ११.६.०७ चे अर्जाअन्वये मागितली. परंतू मा. पोलीस अधीक्षक यांनी सदरचा अर्ज कक्ष-२०/माहिती अधिकार/१५५/०७, दि. २७.६.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी, पोलीस निरीक्षक कारंजा यांचेकडे पाठविला. तसेच याच पत्रानुसार अर्जदार यास रक्कम भरण्याबाबत कळविण्यांत आले. त्यावर अर्जदार हा मा. पोलीस अधीक्षक, वर्धा यांचेकडील त्यास प्राप्त झालेले पत्र घेवून तारीख १०.७.०७ ला पो.स्टे. कारंजा येथे गेला असता, पोलीस निरीक्षक कारंजा यांना पत्र दाखविले असता त्यांनी पैसे भरण्यास सांगितले. त्यावर अर्जदार यांनी पैसे न भरता निघून गेले. याबाबतची नोंद पो.स्टे.डा.सा.क्रं.१५/०७ वेळ १०.४५ वा. घेण्यांत आली आहे. त्यानंतर अर्जदार याने दि. १३.७.०७ ला अर्जदार यांनी मा. पोलीस अधीक्षक, वर्धा व मा.राज्य माहिती आयुक्त, सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडे ठाणेदार कारंजा व पोलीस हवालदार प्रमोद तिजारे यांचे विरुध्दांत अश्लील शिवीगाळ केल्याबाबत अर्ज सादर केले. सदरचा अर्ज त्यांनी अतिशयोक्ती करुन वरीष्ठांना सादर केल्याचे निष्पन्न झाले. तसेच अर्जदार यास पुन्हा रक्कम भरण्याबाबतचे पत्र मा. पोलीस अधीक्षक, वर्धा यांनी दिनांक ८.८.०७ ला पो.स्टे.कारंजा मार्फत अर्जदारास देण्यास पाठथ्वले. त्यावरुन दि. १४.८.२००७ ला पो.हवा.प्रमोद तिजारे ब.नं. ७०६ हे सदरची प्रत अर्जदार यास तामील करण्यास गेले असतांना सदर पोहवा यांनी आपले सोबत ज्ञानेश्वर धोटे, दिलीप दंडारे, बालमुकूंद विठठलराव धरमढोक यास घेवून गेले असता, अर्जदार यांनी पत्र घेण्यास नकार दिला. त्याबाबत पोहवा यांनी स्टे.डा.सा.क्रं.३०/०७ वेळ १८.४५ वा. नोंद करण्यांत आली आहे.

अर्जदार याने अपीलीय अधिकारी समजून मा. पोलीस अधीक्षक वर्धा यांना माहिती अधिकारा अंतर्गत अपील अर्ज दि. १.९.०७ ला सादर केला. सदरचा अर्ज पोलीस अधीक्षक कार्यालयात दि. ११.९.०७ ला प्राप्त झाला. मा. पोलीस अधीक्षक वर्धा यांनी त्यांचे पत्र क्रं.कक्ष-२०/माहिती अधिकार/२००/०७ दिनांक १२.९.०७ अन्वये प्रथम अपील अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी आर्वी यांचेकडे चौकशी व माहिती देण्यास पाठविला व अर्जदार यांना सुध्दा त्याच पत्राद्वारे सूचना देवून रक्कम भरण्यास कळविण्यांत आले. परंतु अर्जदार हा उपविभागीय

पोलीस अधिकारी, आर्वी यांचेकडे पैसे भरण्यास न येता ते मा. पोलीस अधीक्षक कार्यालयात दि. २४.९.०७ लावून माहितीचे शुल्क रु. २५/- पावती क्रमांक ५७६५१११ दि. २४.९.०७ अन्वये रक्कम जमा केली. त्यावरुन मा. पोलीस अधीक्षक वर्धा यांचे पत्र क्रमांक कक्ष-२०/माअ/१५५-२००/०७ दि. २८.९.०७ अन्वये अर्जदाराचे अर्जावर काय कार्यवाही केली. त्याचे प्रथम खबरीच्या ४ प्रती पो.स्टे. कारंजा यांचे मार्फतीने पाठविले. सदरची माहिती ठाणेदार कारंजा यांनी त्यांना दि. २.१०.०७ दिल्याबाबत पोचपावती सोबत जोडली आहे. यानंतरही अर्जदार यांना सदर प्रती व्यतिरिक्त इतर कोणते कागदपत्रे पाहिजे असल्यास त्यांनी तसे अर्ज केल्यास आम्ही देण्यास तयार आहोत."

**४.** यावरुन अपीलकर्ता यांना त्यांच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु तरी सुध्दा पुन्हा एकवेळ अपीलकर्ता यांना सदरच्या प्रकरणातील संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ११.६.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने दिलेली तक्रार दिनांक १.२.२००७ व १२.२.२००७ च्या तक्रारीवर झालेल्या संपुर्ण कार्यवाहीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३/२००८**

**अपील क्रमांक १३/२००८**

**१) श्री किशोर सुंदरलाल खुराणा,**
**नाचनगांव रोड, पुलगांव,**
**ता. देवळी, जिल्हा वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपविभागीय पोलीस अधिकारी, पुलगांव,**
**चिंतामणी नगरी, पंचधारा रोड, पुलगांव,**
**ता.देवळी, जिल्हा वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार,**
**पोलीस स्टेशन, पुलगांव ता.देवळी, जिल्हा वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.२.२००९ रोजी घेण्यात आली. .अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती हे हजर नसून त्यांचे प्रतिनिधी म्हणून पी.एस.आय. हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर नसून त्यांचे वतीने पी.एस.आय. यांना कागदपत्रे दाखल केलेली दिसून येते. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपील क्रमांक १३/२००८ मध्ये दिनांक ६.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार, पोलीस स्टेशन पुलगांव यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"दि.१९.७.२००५ ला मी दिलेल्या रिपोर्ट बाबत जी रिपोर्ट आपल्याकडे उपलब्ध आहे. वरील रिपोर्टवर आजपर्यंत चौकशी कां करण्यात आली नाही. माझ्या रिपोर्टनुसार गैरअर्जदार राजू माणिकराव रोकडे वर कोणत्या कायदयाखाली कलमाखाली गुन्हा दाखल होऊ शकतो. गुन्हा दाखल होतो किंवा नाही. अदखलपात्र गुन्हा होत असल्यास आपण आजपर्यंत मला अदखलपात्रांची समज कां दिली नाही. माझे रिपोर्टवर आपण कोणती चोकशी केली. मी रिपोर्ट देवून २ वर्ष झाले, परंतु चौकशी कां करण्यात आली नाही."

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

**३.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १५.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे आदेश दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

**४.** अपीलकर्ता यांनी लेखी युक्तीवाद व प्रतिज्ञापत्र सादर केले आहे ते खालीलप्रमाणे.

"मी प्रतिज्ञालेख करणार शपथेवर सांगतो की, मी ठाणेदार साहेब पोलीस स्टेशन, पुलगांव येथे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मी दिलेल्या दिनांक १९.७.२००५ च्या रिपोर्टच्या चौकशी बाबत दिनांक ६.१०.२००७ ला माहिती मागितली होती. परंतु मला पोलीस स्टेशन माहिती अधिकारी यांनी एक महिना होऊनही कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिली नाही. मी पाठविलेले माहिती अधिकाराचे जोडपत्र अ माझे जवळ आहे व त्याची पोस्टाची रसिद सोबत जोडीत आहे.

त्यानंतर मी दिनांक १५.११.२००७ रोजी पुन्हा अपील अधिकारी साहेब, पोलीस स्टेशन पुलगांव येथे अपील केली व दिनांक १९.७.२००५ ला रिपोर्टच्या चौकशी बाबत विचारणा केली. परंतु तेथुनही मला कोणतीच माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. मी वारंवार माहिती करीता माहितीचा अधिकार पाठविला परंतु मला कोणतीच माहिती देऊ शकले नाही.

त्यांनतर पुन्हा मी दि. १०.१.२००८ रोजी श्री विनोद काटक, माहिती अधिकारी, अपीलीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पुलगांव यांना अपील करुन माझे रिपोर्ट बाबत चौकशीची माहिती मागितली परंतु त्यांनी सुध्दा माझ्या अर्जाचा कोणताही विचार केला नाही व मला कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. मी पाठविलेल्या माहिती अधिकाराची पोचपावती व पोस्टाची रसिद माझे जवळ आहे.

मला कोणतीही माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे मी मा. माहिती आयुक्त अधिकारी, नागपूर व अमरावती विभाग, रवि भवन, सिव्हील लाईन, नागपूर येथे दिनांक ३.१.२००८ रोजी

अपीले दाखल केली. परंतु मला तेथूनही कोणतीही माहिति उपलब्ध झाली नाही. त्यामुळे मला नाईलाजास्तव राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर येथे अपील दाखल करावी लागली.

मी माझे माहिती अधिकारा मध्ये दि. १९.७.२००५ ला मी दिलेल्या रिपोर्टवर आज पर्यंत चौकशी कां करण्यात आली नाही. माझे रिपोर्टवर गैरअर्जदार राजू माणिकराव रोकडेवर कोणत्या कलमाखाली गुन्हा दाखल होऊ शकतो. त्यांचेवर गुन्हा दाखल होते किंवा नाही. मी रिपोर्ट देऊन २ वर्ष झाले परंतु चौकशी कां करण्यात आली नाही. हा गुन्हा दखलपात्र आहे किंवा अदखलपात्र आहे. दखलपात्र असल्यास गुन्हा कां दाखल करण्यात आला नाही. अदखलपात्र असल्यास मला अदखलपात्राची समज कां देण्यात आली नाही. मी दिलेल्या रिपोर्टवर कोणती चौकशी केली. केली असल्यास केव्हा केली. कोणत्या तारखेला सुरु केली. कोणत्या तारखेला संपविली. माझे बयाण का घेण्यात आले नाही. त्याचे कारण काय.

मी दिलेल्या रिपोर्ट नंतर राजू माणिकराव रोकडे रा.भिडी यांनी दिनांक १३.८.२००५ रोजी माझे विरुध्द खोटी रिपोर्ट दाखल केली. त्या तक्रारीवर माझेवर कलम ३८४,५०६,४६१,४६८,४६७,५०६ भा.द.वि. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला त्याचा अपराध नंबर २४४/०५ हा आहे. आपण माझ्यावर कोणत्या कायदयाखाली माझी रिपोर्ट अगोदर असतांनी सुध्दा माझ्या रिपोर्टवर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही व राजू माणिकराव रोकडे यांनी दिलेल्या रिपोर्टवर माझ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. जर आपण माझ् रिपोर्टवर चौकशी केली असती तर माझ्यावर रोकडेची रिपोर्टचा गुन्हा दाखल झाला असता I का. त्याचे रिपोर्टवर त्वरीत गुन्हा दाखल केला व चौकशी त्वरीत केली याचे कारण काय. त्याची रिपोर्ट चौकशी मध्ये कां ठेवण्यात आली नाही. माझी रिपोर्ट त्याच्या अगोदर असतांनी सुध्दा माझे रिपोर्टवर चौकशी कां करण्यात आली नाही. मी दिलेली लेखी रिपोर्ट दिनांक १९.७.२००५ रोजीच्या द्वारे माझ्या मते मला माहित झाल्याप्रमाणे आरोपी राजू माणिकराव रोकडे यांच्यावर कलम ३७९,४२०,४०६ भा.द.वि.प्रमाणे आरोपीवर गुन्हा नोंद होतो. माझे म्हणणे खरे आहे किंवा खोटे. त्याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. माझे रिपोर्टवर त्यांचेवर कारवाई होऊ शकत नाही. आपण त्याला वाचवित आहे हे सिध्द होते. आपण कलम २१८ भा.द.वि. अंतर्गत गुन्हयास पात्र नाही

का. तसेच मी रिपोर्ट मध्ये टाकलेले साक्षदार यांचे बयाण घेतले काय. त्यांना सुध्दा तुम्ही नोटीस पाठविला का?

सदर माहिती अधिकारामध्ये वरील संपूर्ण माहिती मी विचारलेली आहे. परंतु मला कोणतीही माहिती न देता, माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायदयाची अवमानना केली आहे. मी सदर प्रकरणात पाठविलेल्या अधिकाराच्या प्रतिलीपी, पोस्टाची रसिद, पोचपावती सोबत जोडल्या आहे. करिता माहिती आयोगास विनंती करण्यात येते की, मी हे प्रतिज्ञालेख करीत आहे. करीता माझी अपील मान्य करुन खर्चासह मंजूर करण्यात यावी, ही विनंती."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक १९.७.२००५ रोजी अर्जाची प्रत दाखल केली आहे व त्या अर्जाच्या प्रतीवर पोलीस स्टेशन मध्ये स्विकृती तसेच इतर शेरे मारण्यात आलेले दिसून येते व त्यावरुन सदरचा अर्ज हा पोलीस स्टेशन मध्ये दाखल झालेला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही याकरीता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**५.** अपील क्रमांक १४/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २३.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार, पोलीस स्टेशन पुलगांव यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"अपराध क्रं.२९/०६ कलम ४२०,४६५,४६८,४७१,३४ भा.द.वि.चे बाबत.(शासन विरुध्द किशोर खुराणा +२). वरील अपराध क्रमांक बाबत. या घटनेबाबत कोणी कोणी आपल्या पोलीस स्टेशन मध्ये रिपोर्ट दाखल केली. मी, मुकूंदलाल निहालचंद खुलराणा तसेच महेश अहिराव अटर्णी कोर्ट पुलगांव यांनी आपल्या पोलीस स्टेशन मध्ये वरील अपराधाच्या घटनेबाबत लेखी सूचना दिली होती काय. दिली असल्यास केंव्हा दिली. कोणत्या तारखेला दिली. किती वाजता दिली. त्याची नोंद आपण स्टेशन डायरी मध्ये घेतली काय?."

६. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक १०.१२.२००७ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ३०.११.२००७ रोजी माहिती पुरविण्यात आलेली आहे, असे पोलीस निरीक्षक पुलगांव यांचे पत्रावरुन दिसून येते. तसेच दिनांक ३.११.२००७ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. दिनांक ३०.१२.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. ती अपूर्ण आहे असे अपीलकर्ता यांनी लेखी दिलेले दिसून येते. त्याकरीता राज्य माहिती आयोगाकडे प्रतिज्ञालेख सुध्दा दाखल केला आहे तो खालीलप्रमाणे आहे.

"मी सदर प्रकरणात माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपराध क्रं.२९/०६ कलम ४२०, ४६५, ४६८,४७१+३४ भा.द.वि.(शासन विरुध्द किशोर खुराणा + २) यामध्ये मा. ठाणेदार साहेब, पोलीस स्टेशन पुलगांव यांना दि. २३.९.२००७ रोजी माहिती अधिकारा नुसार माहिती मागितली होती. परंतु पुलगांव पोलीस माहिती अधिकारी यांनी २ महिने होऊनही मला कोणतीच माहित दिली नाही.

त्यानंतर मी पुन्हा दिनांक १५.११.२००७ रोजी अपील अधिकारी साहेब पोलीस स्टेशन पुलगांव येथे माहिती अधिकारानुसार कलम अंतर्गत जोडपत्र ब यामध्ये माहिती मागितली. त्यानुसार मला अपील अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. मी जे माहिती अधिकारामध्ये विचारले होते त्याची कोणतीही माहिती दिली नाही. मी पाठविलेले दि. १५.११.२००७ रोजीचे माहिती अधिकाराची माहिती मी रजिस्टर पोस्टाने पाठविली होती. त्याची रसिद व पोचपावती मी जोडलेली आहे.

त्यानंतर सदर प्रकरणात व माहिती बाबत मी श्री विनोद काटक, माहिती अधिकाराचे अपीलीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पुलगांव येथे माहिती बाबत दि. १०.१२.२००७ रोजी अपील केली. परंतु तेथूनही मला कोणतीही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. मी पाठविलेले माहिती अधिकार हे पोस्टाने रजिस्टर करुन पाठविले त्याची पोचपावती व रसिद माझे जवळ आहे.

त्यानंतर मी दिनांक ३.१.२००८ रोजी मा. माहिती आयुक्त अधिकारी, नागपूर व अमरावती विभाग, रवि भवन, नागपूर येथे माहिती न दिल्यामुळे अपील दाखल केली. परंतु त्यामध्ये ही मला कोणतीही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे मला राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर येथे अपील दाखल करावी लागली.

मी सदर माहिती अधिकारा मध्ये जी मला माहिती हवी होती ती कोणतीच माहिती मला मिळालेली नाही. त्यामध्ये मी माझे किंवा मुकूंद खुराणा यांचे पोलीस बयाण किंवा इतर बयाण घेतले आहे काय. घेतले असल्यास ते बयाण कधी घेतले व कोणी घेतले. बयाण घेतले असल्यास त्याची प्रत आरोपीला दिली होती काय. किंवा जोडली आहे काय. तसेच आपण ज्या रिपोर्टच्या आधारावर मला व माझे काका नामे मुकूंदलाल खुराणा यांना आरोपी बनविले, मग महेश रामदत्ता अहिरराव याला कोणाच्या रिपोर्टवर आरोपी बनविले. त्याने स्वतः महेश अहिरराव यांनी रिपोर्ट दिली, त्यावर त्याला आरोपी बनविण्यात आले काय. त्या रिपोर्टमध्ये महेश अहिरराव यांनी कबुल केले की, सर्व दोष स्वतः त्याचाच आहे, त्यामध्ये बल्लु ऊर्फ किशोर खुराणा व मुकूंदलाल खुराणा यांचा कोणताच दोष नाही. तरी पण मला व माझे काकांना आरोपी का बनविण्यात आले.

जी रिपोर्ट महेश अहिरराव यांनी दिली ती दि. २१.१.२००७ रोजी दिली ती रिपोर्ट त्याने स्वतःच्या अक्षराने लिहीलेली आहे. त्या आधारे माझे व माझे काकांचे कलम १६९ सि.आर.पी.सी.नुसार कोर्टामध्ये डिस्चार्ज (पुराव्या अभावी) कोणताही पुरावान मिळाल्यामुळे डिस्चार्ज का केले नाही. किंवा होत नाही का. तसेच माझे व माझे काकांचे बयाण दि. ४.२.२००६ चे जी बयाणाची कॅापी मला दिली आहे ते बयाण श्री झिंगरे साहेब, यांनी खोटे तयार केले आहे व जर मी किंवा माझे काकांनी बयाण दिले असते तर त्या बयाणावर माझी व काकांची स्वाक्षरी असती परंतु तसे त्यामध्ये काहीच नाही. तसेच आमची जमानत विदयमान उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथून दि. २.२.२००६ रोजी झाली होती. तर आम्ही त्यांच्याकडे कशाला व कोणत्या कारणांनी येवू. तसेच आम्हाला लेखी समंस बयाणासाठी यावे म्हणून दिले नाही. तसेच दि. १८.२.२००६ रोजी विदयमान उच्च न्यायालयाने तेव्हा असा आदेश पारित केला होता की, आमची जमानत मंजूर झाली आहे तसेच मी व माझे काका यांना पहिली

हाजरी दिनांक ७.२.२००६ रोजी दिली होती तशी नोंद माझे डायरी मध्ये आहे. तसेच आमचे जे बयाण घेतले आहे ते त्यांनी आपले मनाने लिहून घेतले आहे, ते संपूर्ण खोटे आहे.

तसेच मी, माझे काकांनी व महेश अहीरराव यांनी जी रिपोर्ट पोलीस स्टेशनला दाखल केली होती त्या रिपोर्टवर कोणतीही कारवाई न करता आपण श्री वाकडे सहायक अधीक्षक, पुलगांव यांचे रिपोर्टवर अप.क्रं.२९/०६ कसे दाख्ल करण्यात आले.

मी सदर केस प्रकरणात पाठविलेल्या माहिती अधिकाराच्या प्रतिलीपी, पोस्टाची रसिद, पोचपावती, सोबत जोडल्या आहेत. करिता माहिती आयोगास विनंती करण्यात येते की, वरील दिलेले प्रतिज्ञालेख हे माझे मतानुसार सत्य व बरोबर आहे. करिता ते मान्य करुन माझी अपील खर्चासह मंजूर करण्यात यावी, ही विनंती."

**७.** यावरुन असे दिसून येते की, त्यांना माहिती मिळाली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे विरुध्द त्यांनी तक्रार दाखल केली, त्या तक्रारीचे संदर्भात त्यांना संपूर्ण कागदपत्र उपलब्ध करुन दिलेले आहे. व त्यामुळे त्यांच्या संपूर्ण प्रश्नांची उत्तरे त्या कागदपत्रामधून मिळू शकते. व त्याकरीता सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३/२००८ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.१०.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक वर्धा यांनी स्वतंत्रपणे करावयाची आहे.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४/२००८ मध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे ते खारीज करण्यात येत आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत पोलीस अधीक्षक, जिल्हा वर्धा यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८/२००७**

**१) श्री सुरेंद्र पुंडलीकराव रेवतकर,**
**C/o बी.डी. जोसपू, १७/३ कॅनल रोड,**
**गिरीपेठ, नागपूर. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त,**
**सिताबर्डी विभाग, नागपूर शहर. ..उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार,**
**पोलीस स्टेशन सिताबर्डी, ता.जि.नागपूर. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहे. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००७ रोजी पोलीस ठोणेदार, पोलीस स्टेशन, सिताबर्डी नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"दिनांक ३०.७.२००७ ते १२.११.२००७ पर्यंत माझ्या पत्नीने सोन्याचे दागिने तसेच मी खरेदी केलेले पुष्कळ सामान व शिलाई मशीन आणि सहा महिन्याच्या गर्भाचे भ्रुणहत्या केली. त्याकरीता १४ रिपोर्ट करुन त्यावर काय झाले व कां कारवाई करण्यात आली नाही यांचे सविस्त दयावे." सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

**३.** विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक मंडळ पोलीस ठाणेदार साहेब, पोलीस स्टेशन सिताबर्डी, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**४.** अपीलकर्ता यांनी ठाणेदार, पोलीस स्टेशन सिताबर्डी यांचेकडे जन माहिती अधिकारी म्हणून अर्ज केलेला असल्यामुळे व त्यांना दिनांक ३०.१.२००९ रोजी सुनावणीची आयोगाकडून नोटीस काढलेली असली तरी आज हजर नसल्यामुळे त्यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.

**५.** अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे व व्यक्तीशः माहिती घेणार असे जेव्हा नमूद केले जाते त्यावेळेस ३० दिवसांचे आंत माहिती घेण्याकरीता अपीलकर्ता अर्जदार यांनी स्वतः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते. व दिली नसल्यास तसे आक्षेप घेणारे पत्र देवून ते पुरावा म्हणून दाखल करणे आवश्यक आहे. तसा पुरावा दाखल केलेला नाही. तसेच अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.७.२००७ ते १२.११.२००७ पर्यंत पोलीस स्टेशन मध्ये रिपोर्ट दाखल केला आहे. परंतु त्या रिपोर्टची कोणत्याही प्रकारची निश्चित तारीख दिलेली नाही. मागितलेली माहिती मोघम आहे. परंतु त्याबाबतही जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले दिसून येत नाही. व अपीलकर्ता यांनी सुध्दा व्यक्तीशः जावून त्याबाबतचे स्पष्टीकरण दिलेले नाही.

**६.** प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा दाखल केला आहे तो खालीलप्रमाणे आहे.

"अर्जदार यांने दिनांक १४.२.२००७ रोजी या कार्यालयात प्रथम अपिलीय अधिकारी संचालक मंडळ पोलीस ठोणेदार साहेब पोलीस स्टेशन सिताबर्डी नागपूर यांचे नावाचे सदरचा अपील अर्ज दाखल केला आम्ही जनमाहीती अधिकारी असून प्रथम अपिली अधिकारी हे मा. पोलीस उप आयुक्त परी क्रं.१ नागपूर शहर यांना शासनानी संबोधीत केले आहे. अर्जदार यांने दिलेल्या अर्जा मधील माहीती पोलीस स्टेशन सिताबर्डीसी संबंधीत होती. तसेच अर्जदार माहिती स्वतः घेवून जाणार किंवा टपाल पोस्टद्वारे पाहीजे याबाबत अर्जामध्ये कोणताही उल्लेख नाही. अर्जदार यांने या कार्यालयाच्या नावाचे माहीती मिळविण्याकरीता कारावयाचा अर्जाचा नमुना मध्ये अर्ज देणे आवश्यक होते. तसेच पोलीस स्टेशन जन माहीती अधिकारी नसून शासनाने

आम्हाला जन माहीती अधिकारी व मा. पोलीस उप आयुक्त परी.क्रं.१ नागपूर शहर यांना प्रथम अपिली अधिकारी म्हणून कार्यरत केले आहे. सदर अर्जदार याने कशाद्वारे त्याला माहिती हवी होती ते लिहीलेले नाही त्यामुळे त्यास माहिती दिली गेली नसल्याचे आढळून येते.

अर्जदार याने केलेली अपील निकाली काढण्यास्तव विनंती सादर आहे. करीता सदर अपील अर्ज अहवाल सादर आहे."

**७.** द्वितीय अपील मेमो मध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी १४ रिपोर्टच्या संदर्भात निश्चित तारीखा दिलेल्या नाहीत. अपीलकर्ता यांना माहिती हवी असल्यास त्यांनी दिलेल्या रिपोर्टच्या संबंधामध्ये निश्चितपणे तारखांचे वर्णन करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिलेल्या १४ रिपोर्टच्या संदर्भामध्ये निश्चित तारखा व निश्चित कार्यालय हे कळविल्यास त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती विना मुल्य उपलब्ध करुन घेण्यात यावी व तशी पोच द्यावी.

२. जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार हे आज सुनावणीस हजर नसल्यामुळे त्यांना समज देण्यात येत असून उप पोलीस आयुक्त यांनी दखल घेणे आवश्यक आहे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

Februuary,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५७९/२००७**

**१) श्री बाबन जयराम अतकर,**
**रा. तांदळी खु. ता.पातूर, जिल्हा अकोला. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,**
**अकोला. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**उपविभागीय पोलीस अधिकारी, बाळापूर,**
**ता. बाळापूर, जिल्हा अकोला. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"माझा दि. २५.४.२००५ ला आपले कार्यालयास केलेल्या अर्जानुसार दि. ६.१०.२००५ ला मे.एस.डी.पी.ओ. बाळापूर यांनी माझा जबाब व रेकार्ड घेवून चौकशी केली असता त्यावरील कार्यवाही बाबत माहिती मिळणे. माझे दिनांक २९.११.२००४, १५.२.२००५ पो.अ.कार्यालय अकोला व २८.८.२००५ चे अर्जावरील कार्यवाही बाबत माहिती मिळणे."

**३.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.९.२००७ रोजी उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक ११.१०.२००७ रोजी पुन्हा विशेष पोलीस महानिरीक्षक यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाचे अनुषंगाने दिनांक १७.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांना समक्ष बोलाविले होते. त्यांनी त्यावेळेस माहिती शतप्रतिशत असल्याचे दर्शवून माहिती घेण्यास नकार दिला. पुन्हा दिनांक २३.२.२००७ अन्वये मुळ प्रत ठाणेदार, पातूर यांचे मार्फतीने अदा करण्यास

पाठविली होती. त्याबाबतची छायांकित प्रत दाखल केलेली दिसून येते. व त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन मिळालेली माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी आहे, असे नमूद करुन द्वितीय अपील दिनांक १५.१.२००६ चे पूर्वीच दाखल केलेले दिसून येते.

**४.** अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००७ रोजी माहितीचा अर्ज सादर केल्याच्या पुर्वीच दिनांक १५.१.२००६ रोजी पोलीसांकडे जबाब दिला आहे व त्यामध्ये "वरील दोनही प्रकरणे पातूर कोर्टात आजही चालु आहेत. मी दिलेली तक्रार गैरसमजूतीने दिलेली होती. आता माझा गैरसमज दूर झाल्याने माझ्या तक्रार अर्जाची चौकशी न करता फाईल करण्यात यावी," असे लेखी दिलेले असल्यामुळे वारंवार त्याच घटनेच्या संदर्भात माहिती मागणे हे अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर आहे. वास्तविक पुर्वीच त्यांच्या दिनांक ३.९.२००७ च्या अर्जास याप्रमाणे उत्तर देणे आवश्यक होते. व त्याचवेळेस विषय संपविणे आवश्यक होते, असे लेखी दिलेले असून सुध्दा दिनांक १८.१२.२००७ रोजी सुध्दा अपीलकर्ता हे त्यांच्या गैरसमजूतीने दिलेल्या अर्जाच्या संदर्भात पुन्हा माहिती मागत आहे. माहिती उपलब्ध झाली नाही असे आयोगाकडे दाखवून आयोगाची दिशाभूल करीत आहे, असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

Februuary,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २४५८/२००७**

**१) श्री संजय सखाराम गि-हे,**
**मु.पो. देऊळगांव माळी,**
**ता. मेहकर, जिल्हा बुलढाणा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी, मेहकर**
**ता. मेहकर, जिल्हा बुलढाणा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**तहसिलदार, मेहकर, जिल्हा बुलढाणा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. श्री किशोर के. देशमुख हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, मेहकर श्री बी.डी. भारती हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री जे.एस. इंगळे हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००५ रोजी तहसिलदार, मेहकर यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"मी खालील सही करणार विनंती पुर्वक अर्ज करतो की, उपविभागीय अधिकारी मेहकर यांच्या कार्यालयातील पत्र क्रं.वशि/शि/८९७/०५ दि. २६.९.२००५ च्या पत्रानुसार माझ्या वडीलाची जमीन शेत ५०/१ एच १९६७ सालापासून माझे वडीलांचे मालकी हक्कानुसार आजतागायत ती जमीन माझ्या वडीलांची सखाराम लक्ष्मण गि-हे यांचीच आहे. वडीलांनी शासकीय नियमानुसार शेतसारा भरलेला असतांना माझ्या वडीलांनी दुय्यम निबंधक कार्यालयात कोणतीही नशापाणी न करता आमली पदार्थाचे सेवन न करता १९६७ पासून कोणत्याही प्रकारचा खरेर्दी खत व गहाणखत यांचा व्यवहार केलेला नसतांना शासकिय धोरणानुसार दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदी झाल्यानंतर शासकिय रेकॉर्ड बनल्यानंतर ते सांभाळण्याची योग्य ठेवण्याची जबाबदारी

शासनाची असतांना १९७० पुर्वी व नंतर आपल्या विभागीय कार्यालयातून झालेल्या खरेदी विक्रीच्या वव्हाराचे रेकॉर्ड शासनाने जतन करुन ठेवले असतांना आपल्या विभागातील सर्व खातेदारांचे रेकॉर्ड ज्याप्रमाणे आपल्याच कार्यालयात कायम असते त्याचप्रमाणे मुलभूतहकानुसार माझ्या वडीलांची मालकी हक्क असलेल्याजमीनीबाबत शे.स.नं.५०/१ चे सर्व शासकिय दस्तावेज सखाराम लक्ष्मण गि-हे हयांचे २००५ पर्यंत देण्यात यावे. त्यांचा मी मुलगा असल्यामुळे माझ्या नावाने रेकार्ड करण्यासाठी मला आपल्या कडील जमीनीचे(वडीलोपार्जित जमीनीचे) सातबारा गांव नमूना ८ अ व हक्क नोंदणी चे सर्व दस्तऐवज देण्यात यावे.

वरील संदर्भीय विषयानुसार संबंधीतांना तात्काळ कार्यवाहीसाठी सविनय सादर, शासकिय दरानुसार सदर शुल्कांची रक्कम अर्थसंकल्पिय लेखशिर्षक क्रं. ००७० इतर प्रशासनिक सेवा ६०, इतर सेवा ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार अध्यादेश २००२(००७०-०१६-१) नुसार जमा करण्यास तयार आहे. करिता संदर्भातील कलम ६(२) नुसार वाढीव शुल्काबाबत मार्गदर्शन करण्यात यावे."

**३.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.२.२००६ रोजी अभिलेखापाल यांना माहिती अधिकारी यांनी, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश दिलेले दिसून येते. तसेच दिनांक ३.२.२००६ रोजी तलाठी, नागझरी बु. यांना सुध्दा शेत सव्हे नं.५१/१ चे आपणाकडील असलेले सर्व उपलब्ध रेकार्ड घेवून न चुकता दिनांक ४.२.२००६ रोजी उपस्थित राहावे असे कळविलेले दिसून येते. दिनांक १५.२.२००६ रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या खर्चाकरीता रुपये १३५/- भरावे, असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २२.२.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी रुपये १३५/- चा भरणा केलेला दिसून येतो. परंतु, माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २१.३.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

**४.** अपीलकर्ता यांच्या दिनांक ८.३.२००६ च्या अर्जाप्रमाणे दिनांक २२.३.२००६ रोजी सुध्दा फेरफारच्या संदर्भामध्ये "आपणास आवश्यकता वाटल्यास आपण फेरफार क्रं.१६६ चे विरोधात सक्षम कोर्टात न्याय मागू शकता." असे कळविलेले दिसून येते. व त्यावर "माहिती घेण्यास

नकार दिला" असा शेरा दिसून येतो. (त्यानंतर दिनांक १५.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे, ती घेवून जावी, असे कळविलेले दिसून येते.) त्यावर अर्जातील मागणी नुसार तसेच उपविभागीय कार्यालयातील अपील नं.१७/०६ च्या माहितीच्या तपशिलानुसार सदर नकला नाहीत. त्यामुळे माझा आक्षेप कायम ठेवून आज दिनांक १५.६.२००७ रोजी सदर नकला स्विकारत आहे, असे लेखी दिलेले दिसून येते. तसेच सदरचा आक्षेप नामंजूर करण्यात आलेला आहे, असे आदेश पारित केलेले दिसून येते. तत्पुर्वी दिनांक २.६.२००७ रोजी रुपये ४५/- चा भरणा केलेला दिसून येतो.

**५.** मुद्या क्रमांक ५ च्या संदर्भामध्ये माहिती मुदतीत नसेल तर विलंबाची कारणे व त्याबाबतचा खुलासा तहसिलदार यांनी खालीलप्रमाणे दाखल केलेला दिसून येतो.

"मुद्या क्रमांक ५ :- माहिती मुदतीत दिली नसेल तर विलंबाची कारणे व त्याबाबत खुलासा.

अर्जदाराने दिनांक १२.१२.२००५ रोजी अर्ज दिला. सदर्हु नागझरी बु. सर्व्हे नं.५०/१ चे १९७० ते २००५ पर्यंतचे फेर फार नकला, गांव नमुना ७/१२, हक्क नोंदणी तसेच तलाठी नागझरी बु. हयांचे कडील नकला, गांव नमूना ७/१२ फेर फार नकल हया सर्व नकला दिनांक ८.२.२००६ रोजी तयार असून अर्जदाराने सदर नकलाचा भरणा, नक्कल फी दिनांक २२.२.२००६ ला भरला त्यावेळी त्यांना नकला दिल्या असता त्यांनी सदर नकला घेण्यास नकार दिला. तदनंतर दिनांक २२.३.२००६ रोजी त्यांना पुन्हा पत्र देऊन नकला घेऊन जाण्याबाबत सूचित केले, त्यावेळेस त्यांनी नकला घेण्यांस नकार दिला.

शेवटी दिनांक ८.२.२००६ रोजी तयार असलेल्या नकला अर्जदार यांनी दिनांक १५.६.२००७ रोजी स्विकारल्यात. थोडक्यात मुदतीत नकला तयार असून अर्जदार यांनी नकला नेल्या नाहीत. दिनांक १२.१२.२००५ रोजी अर्जदाराने दिलेल्या अर्जाप्रमाणे नकला दिनांक ८.२.२००६ ला तयार असून त्या नकला अर्जदाराने दिनांक १५.६.२००७ ला घेतल्यात. त्यात कार्यालयाचा दोष नसून अर्जदाराचा दोष आहे. त्यामुळे नकला देण्यांस विलंब झाला असे म्हणता येणार नाही.

टीप :- अर्जदाराने नकला न घेण्याचे कारण अर्जदाराचे म्हणणे असे होते की, अर्जदाराचे वडील सखाराम लक्ष्मण गि-हे यांचे नांवाने मौजे नागझरी बु. ता. मेहकर येथे स.नं.५०/१ मध्ये शेतजमीन होती व त्या नकला १९६७ ते २००५ या कालावधीच्या सखाराम लक्ष्मण गि-हे यांचेच नांवाने देण्याचे करावे असा त्यांचा आग्रह होता. परंतु त्यांना सूचित करुन मागितलेल्या नकला ज्या स्थितीत आहेत(ज्यांच्या नांवाने नकला आहेत)त्या घेणे आपणांस क्रमप्राप्त असून त्यांनी जाणुनबूजून नकला घेण्यांस टाळाटाळ करुन शेवटी सदर नकला स्विकारल्या."

६. उपविभागीय अधिकारी यांनी सुध्दा सदरच्या बाबतीत अहवाल दाखल केला आहे, तो खालीलप्रमाणे आहे.

"अपीलार्थी श्री संजय सखाराम गि-हे रा. देऊळगांवमाळी यांनी तहसिलदार मेहकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत भरुन घेतलेले १३५ रु. शुल्क दिनांक २३.२.२००६ नूसार चलान द्वारे भरणा करुनही माहिती न दिल्यावरुन अपील दाखल केले. अपील दाखल करताच या कार्यालयाचे पत्र क्रं.कावि/शिरस्तेदार/३६३/२००६ दिनांक २९.३.२००६ नुसार तहसिलदार मेहकर यांनी त्यांचे पत्र क्रं.कावि/माअ/९२/२००६ दिनांक २३.२.२००६ रोजी अर्जदारास पत्र देऊन १३५ रु.ची चलान भरणा करुन घेऊनही माहिती उपलब्ध करुन दिली नाही याबाबत कारणे दाखल नोटीस दिली व त्याची एक प्रत अर्जदारास तहसिलदार मेहकर यांचे मार्फत दिली. तहसिल कार्यालयास सदर पोहोच दिल्याबाबत त्याची पोच सूध्दा घेण्यात आली आहे. तदनंतर या कार्यालयाकडून तहसिलदार मेहकर यांना १०.४.२००६ पूर्वी अर्जदारास नकला देणे बाबत पुन्हा कळविण्यात आले सदर नक्कल १०.४.२००६ पूर्वी न दिल्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्रं.वशि/शि./४०४/२००६ दिनांक २.५.२००६ रोजी तहसिलदार मेहकर यांना तिन दिवसाच्या आंत नकला देणे बाबत कळविण्यात आले त्याची एक प्रत अर्जदारास देऊन दिनांक १०.५.२००६ रोजी हजर राहाण्यास सूचित केले. नंतर अर्जदारास १७.५.२००६ ला बोलविण्यात आले. तहसिलदार यांचे कडून नकला तयार असल्या बाबत सांगीतल्या वरुन अर्जदारास १७.५.२००६ ला नकला घेऊन जाण्या बाबत सूचित करण्यात आले. अर्जदाराने दिनांक १६.५.२००६ रोजी या कार्यालयाचे पत्र क्रं.वशि/शि/४०४/२००६ दिनांक २.५.२००६ नुसार

नक्कल मिळणे बाबत विनंती केली. तहसिलदार मेहकर यांना अनेक वेळा पत्र देऊन अर्जदारास नकला देणे बाबत कळवूनही अर्जदारास नक्कल न दिल्यामुळे या कार्यालयाकडून दिलेल्या पत्राकडे दुर्लक्ष केल्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्रं.वशि/शि./४३९/२००६ दिनांक १०.५.२००६नुसार तिन दिवसाचे आंत अर्जदारास मागितलेल्या नकला देण्यात याव्यात अथवा संबंधीत लिपीकाचे एक वर्षाचे वेतन वाढ रोखण्याबाबतचे प्रस्ताव वि. जिल्हाधिकारी बुलढाणा यांना सादर करण्यात येईल असे पत्र तहसिलदार मेहकर यांना दिले. व त्याची एक प्रत री मि-हे यांना देऊन त्यांना १५.५.२००६ पर्यंत नकला घेऊन जाण्याबाबत कळविण्यात आले. त्यानंतर दिनांक २१.६.२००६ ला आदेश पारित करण्यात आला व अर्जदारास रेकॉर्ड मध्ये आपण दिलेल्यो अर्जानुसार जशा नकला असतील तशाच मिळतील हे सांगण्यात आले. परंतु तहसिल कार्यालयात तयार असलेल्या नकला अर्जदाराने नेल्या नाहीत म्हणून मानवतावादी दृष्टीकोन ठेऊन तहसिलदार मेहकर यांना आदेश देऊन अर्जदारास विनाविलंब नकला देण्याबाबत कळविण्यात आले. आदेशाची प्रत अर्जदारास देण्यात यावी. संबधीत गावच्या तलाठयाजवळ परत देण्यात आली. संबधीत तलाठयाजवळ आदेशाची प्रत २३.६.२००६ रोजीच देण्यात आली होती.

इतकेच नव्हे तर तहसिलदार मेहकर यांचे पत्र क्रं.कावि/माअ/ /०६ दिनांक २२.३.२००६ नुसार अर्जदारास नकला घेऊन जाण्यास सूचविले असता अर्जदाराने नकला घेण्यास नकार दिला. त्यानंतर तहसिलदार मेहकर यांचे पत्र क्रं.मा.अ.२००५ दिनांक १५.२.२००६ नुसार अर्जदारास नकला घेऊन जाण्या बाबत कळविले असून त्याची पोच पुध्दा घेण्यात आलेली आहे. या कार्यालयाचे आदेश दिनांक २१.६.२००६ चे आदेशानुसार अर्जदारास दिनांक १५.६.२००७ रोजीच नकला दिल्या व त्यावर अर्जदाराची पोच सुध्दा घेण्यात आलेली आहे."

**७.** दिनांक २.५.२००६ रोजी तहसिलदार, मेहकर यांना जे पत्र दिलेले दिसून येते त्यावरुन अपीलकर्ता यांना नकला उपलब्ध करुन दिलेल्या नव्हत्या असेच दिसून येते. दिनांक २६.५.२००६ रोजी अपीलकर्ता यांना नकला घेवून जाण्याकरीता दिनांक ४.६.२००६ रोजी हजर

राहाण्याकरीता कळविलेले दिसून येते. दिनांक २१.७.२००७ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो, व त्यात नकला विनाविलंब देण्यात याव्या, असे आदेश दिलेले दिसून येते.

८. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक ४.६.२००६ रोजी रविवारी नकला घेण्यास बोलाविले होते. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२००६ रोजी तहसिलदार, मेहकर यांचेकडे नकला मिळण्यासाठी अर्ज केला होता व त्या अर्जाप्रमाणे उपविभागीय अधिकारी यांनी, तहसिलदार यांना नकला उपलब्ध करुन देण्यात याव्या, असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे वकील यांचे म्हणणे असे आहे की, सदरच्या दिलेल्या तारखा हया चुकीच्या आहेत. तसेच सक्षम प्राधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांना दिनांक १८.५.२००७ रोजी दिलेल्या अर्जामध्ये लिहीलेला रोजनामा हा खोडून टाकण्यात आला व नंतर तारखांबध्दल विचारणा केली असता त्यांनी टाळाटाळ केली, अशा प्रकारची तक्रार केलेली दिसून येते.

९. या संपूर्ण पत्रव्यवहारानंतर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनाक १७.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. संपूर्ण पत्रव्यवहाराच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची अडचण नव्हती असे जन माहिती अधिकारी यांचेकडून सांगण्यात आले. अपीलकर्ता यांचा आग्रह हा त्यांच्या वडीलांच्या नांवाच्या नकला मिळण्याच्या संदर्भात माहिती पाहिजे असा होता व म्हणून हा विलंब झाला आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा परिच्छेद ८ मध्ये श्री सखाराम लक्ष्मण गि-हे यांच्या नांवाचा शेत सर्व्हे नं.५०/१, क्षेत्रफळ ६ एकर ०९ गुंठे, आ.रु. ५.०० चा १९७० ते २००५ चा ७/१२ व ८ अ, हक्क नोंदणी, फेरफारच्या नकला मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली दिसून येते. असे असले तरी त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांचे वकील श्री किशोर देशमुख यांनी स्वत: सर्व्हे नंबर ५०/१ आकार रुपये ५.०० श्री सखाराम लक्ष्मण गि-हे यांच्या संबंधात असलेल्या जमिनीच्या अभिलेखाची सन १९७० ते २००५ पर्यंतचे निरीक्षण करुन त्यांना हवी असलेली माहिती उपलब्ध

करुन घ्यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांचे वकील श्री किशोर देशमुख यांचे माध्यमातून अभिलेखागारात शेत सर्व्हे नं.५०/१ क्षेत्रफळ ६ एकर ०९ गुंठे, आ.रु.५.०० श्री सखाराम लक्ष्मण गि-हे यांच्या संदर्भातील सर्व शेत जमिनीचे अभिलेख्यांचे निरीक्षण हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत, कार्यालयीन वेळेत करुन आवश्यक असलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती, विनामुल्य प्राप्त करुन घ्याव्या.

२) त्याकरीता अपीलकर्ता यांचे वकील यांनी जन माहिती अधिकारी यांना कार्यालयीन वेळेतील वेळ कळवून त्या वेळेस उपस्थित राहून सदरच्या अभिलेख्यांचे निरीक्षण करुन त्यातील आवश्यक माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घेण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३०/२००८**

**१) श्री शोभाताई मारोती बुरडे,**
**रा. टिळक वार्ड, मोहाडी, ता.मोहाडी,**
**जिल्हा भंडारा -४४१९०९** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, मोहाडी,**
**ता. मोहाडी, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**ग्राम विकास अधिकारी,**
**ग्राम पंचायत मोहाडी, ता.मोहाडी,**
**जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२००९, ३०.८.२००९ व ३.९.२००७ च्या तारखा असलेल्या अर्जांच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"ग्रामसभेची प्रोसिडींग १५ ऑगष्ट, २००७. १५ ऑगष्ट, २००७ रोजी झालेल्या ग्रामसभेची प्रोसिडींगची माहिती मिळण्याबाबत व प्रोसिडींग नुसार कोणकोणते कामे करण्यात आले यानुसार माहिती दयावी." विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३०.१०.२००७ रोजी खंड विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.११.२००७ रोजी देण्यात आला असून माहिती तात्काळ पुरविण्यात यावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो, व त्याबाबतची प्रतिलीपी खंड विकास अधिकारी तसेच अपीलकर्ता

यांना दिलेली दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

**३.** अपीलकर्ता यांच्या दिनांक ३०.८.२००७ च्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, दिनांक २७.८.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयातील लिपिकांनी अर्ज घेतला नव्हता व दिनांक ३.९.२००७ रोजी अपीलकर्ता अर्जदार आल्यावर त्या दिवशी तो अर्ज घेण्यात आला आहे. मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये दिनांक १.१०.२००७ रोजी म्हणजेच विहित मुदतीत माहितीच्या संदर्भामध्ये रुपये १६/- भरणा करण्यास सांगितले. परंतु पत्र घेतले नाही, असा श्री रामदास डेकाटे यांचा शेरा दिसतो.

**४.** प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुध्दा दिनांक १७.११.२००७ रोजी ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत मोहाडी यांनी खंड विकास अधिकारी यांना, अपीलकर्ता अर्जदार यांना ६.११.२००७ ला पत्र तामिल केले परंतु त्यांनी ते घेण्यास नकार दिला. दिनांक ५.११.२००७ ला सुध्दा रुपये १६/- फी भरुन माहिती ग्राम पंचायत कार्यालयात येवून घेवून जावी, असे पत्र दिलेले दिसून येते. व त्यावर माहिती पत्र घेवून गेले असता पत्र घेण्यास नकार दिनांक ६.११.२००७ श्री रामदास डेकाटे, असा शेरा दिसून येतो. नोट शिट तथा टिपणी यातून अपीलाच्या संदर्भामध्ये सुध्दा टिपणी केलेली दिसून येते.

**५.** जन माहिती अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन व दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता अतिरिक्त खर्चाची मागणी करण्यात आलेली होती. परंतु, सदरचे पत्र घेण्यास त्यांनी नकार दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता अर्जदार व्यक्तीशः माहिती घेणार असे नमूद करतात तेंव्हा त्यांनी स्वतः जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी जाणे आवश्यक असते. व त्यावेळेस माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यास त्या प्रकारची हरकत घेणारे पत्र पुरावा म्हणून दाखल करणे आवश्यक असते. परंतु, अपीलकर्ता यांनी अशा प्रकारचे कोणतेही पत्र दाखल केलेले नाही. उलट, अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा, याबध्दलचे गट विकास अधिकारी यांचे दोन पत्रे दिसून येतात. तसेच रजिस्टर पोस्टाने पाठविलेली माहिती

सुध्दा अपीलकर्ता यांनी घेतली नाही याबध्दलचा पुरावा सुध्दा दाखल केला आहे. व यावरुन अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता आहे असे दिसून येत नाही. अपीलकर्ता यांना माहिती हवी असल्यास त्यांनी माहितीची फी चालनद्वारे किंवा ग्राम पंचायतकडे रुपये १६/- भरुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक ३०.८.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक ६.११.२००७ च्या पत्राप्रमाणे रुपये १६/- माहितीचा अतिरिक्त खर्च म्हणून भरणा करावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २४.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३२/२००८**

**१) श्री प्रकाश अरुण इंगळे,**
**प्लॉट नं. ९६, सहकार नगर, खामला रोड,**
**नागपूर-२५.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति उपायुक्त-१,**
**महानगरपालिका, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विद्युत)**
**महानगरपालिका, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.६.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता (विद्युतविभाग), महानगरपालिका यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येतो. सदरची माहिती व्यक्त्ीशः घेणार असे नमूद केले आहे.

"दि हितवाद या पेपरमध्ये आलेल्या निविदा व sn-७ बध्दल तसेच पथदीवे देखभाल व रखरखाव या कार्याबध्दल माहिती. जानेवारी २००३ ते आजपर्यंत.

Tender notice published in, The Hitwada English daily newspaper on dated २८.६.२००७ of Electrical Department. Copy of it enclosed herewith.

(१) How many light are their Out of scope of maintains of Vibrant What they are called as.

(२) (a) How many streetlights are there in Nagpur city till date.

(b) How many lights are in scope of executing agency i.e. Vibrant Infotech limited after awarding the contract. Give the non burning sheet

of each zone (Weekly report) from January ०३ to till date. (c)How many new feetings are added till date. (d) How many lights are taken over by NMC after awarding the contract to the Vibrant infotech from NIT, MSRDC etc. till date.

(३) a) Give the list of Guarantee period lights after January ०३

(b) Give the non burning status of guarantee period lights. (c) Erection date of the same (d) Handing over date as per work order. (e) How many lights are handed over to Vibrant. (f) What was the reason behind refusing to take over only १८०० guarantee period lights and who was the contractor of those lights.

(४) Whose responsibility to rectify the non burning light of Guarantee period.

(५) If the Guarantee period was over than why the lights were not handed over to Vibrant. Who was responsible Why they should not be penalized either the contractor of the executing agency for the negligence of work. If they penalize what are the penalties. If not, who should be kept responsible and what action will have been taken over by the department.

(६) What is the necessity to float the tender if their Vibrant Infotech is working as per condition. All the street light maintenance is given to them on B.O.T. basis. And responsibility of guarantee period (new erection) up to १ year is with the contractor.

(७) What action has been taken on concern contractor for the non burning lights of Guarantee Period in Last three years. Give detail of all correspondence to them."

**३.** उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.१०.२००७ रोजी देण्यात आला असून मुद्येनिहाय माहिती न देता टॅब्युलर फार्ममध्ये माहिती दिली असेही अपीलार्थी यांनी सांगितले. विभागाने एक महिन्याचे आंत मुद्येनिहाय माहिती तयार करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते व अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यानंतरही अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

**४.** द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांचा मुद्दा क्रमांक २ (बी) व (सी), मुद्दा क्रमांक ३ (ई) व मुद्दा क्रमांक ७ प्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही व तीनही मुद्यांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी जो खुलास केलेला आहे तो खुलासा अपीलकर्ता यांना मान्य आहे, असे दिसून येते. तरी सुध्दा ज्या मुद्यांच्या संदर्भामध्ये स्पष्ट उत्तर दिले नसेल त्या मुद्यांच्या संदर्भात स्पष्टपणे उत्तर देणे हे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भात ज्या मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, त्याबाबतचे उत्तर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २४.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

Februuary,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३८/२००८**
**अपील क्रमांक ३९/२००८**
**अपील क्रमांक ४०/२००८**

**<u>अपील क्रमांक ३८/२००८</u>**

**१) श्री लिलाधर डाखोरे,**
**कस्तुरबानगर, जरीपटका, नागपूर-१४. — अपीलकर्ता क्रं.१**

**वि रु ध्द**

**१) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,**
**महानगरपालिका, नागपूर. — उत्तरवादी**

**२) जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक(स्लम)**
**महानगर पालिका, नागपूर. — उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक ३९/२००८ व अपील क्रमांक ३०/२००८</u>**

**२) श्री राजेश इमानुएल कुजूर,**
**प्लॉट क्रं.२८२, कस्तुरबानगर, जरीपटका,**
**नागपूर-४४००१४ — अपीलकर्ता क्रं.२**

**१) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,**
**महानगरपालिका, नागपूर.**

**२) जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक,**
**महानगरपालिका, नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा विकासयंत्री,**
**महानगरपालिका, नागपूर. — उत्तरवादी.**

**(आदेश पारित दिनांक २५.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

दोन अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २५.२.२००९ रोजी घेण्यात आली. दोनही अपीलकर्ते गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. **अपील क्रमांक ३८/२००८** मध्ये अपीलकर्ता क्रमांक-१ यांनी दिनांक ३.८.२००७ रोजी खालीलप्रमाणे माहिती सूचना अधिकारी, सहाय्यक आयुक्त यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(a) श्री जी.आर. चव्हाण को किस घर के लिये स्लम सर्टिफिकेट दिया गया है. एस घर के चारों और की (पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण) भौगोलिक परिस्थिती की जानकारी है. (चतुसिमा) (b) श्री जी.आर. चव्हाण द्वारा स्लम सर्टिफिकेट पाने के लिये दिये गये आवेदन पत्र की प्रति मुझे प्रदान की जाये. (c) श्री जी.आर. चव्हाण को किस आधार पर स्लम सर्टिफिकेट दिया गया है. (d) श्री जी. आर. चव्हाण द्वारा स्लम सर्टिफिकेट पाने के लिये दिये गये आवेदन पत्र के साथ लगाये गये सहपत्रो (संलग्नो) की प्रति मुझे प्रदान की जाये. "सदरची माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २८.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.९.२००७ रोजी देण्यात आला असून दिनांक २८.८.२००७ ला माहिती देण्यात आली या कारणास्तव सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता आज गैरहजर आहेत. व उपलब्ध झालेली माहिती ही कशा प्रकारे चुकीची व दिशाभूल करणारी व अपूर्ण आहे याबाबत कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण दिलेले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

५. **अपील क्रमांक ३९/२००८** मध्ये अपीलकर्ता क्रमांक-२ यांनी दिनांक १४.९.२००७ रोजी स्थावर अधिकारी सहाय्यक आयुक्त यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"मुझे निम्नलिखील जानकारी एवं कागजातों की प्रति प्रदान की जाये. (१) प्लॉट नं. २६१ कस्तुरबानगर जरीपटका नागपूर १४ एवं प्लॉट नं. ८९० बुध्दनगर नागपूर १७ इन दोनो प्लॉटों में स्थित घर के मकान मालिक कौन है. (२) प्लॉट नं. २८१, २८३ कस्तुरबानगर जरीपटका नागपूर १४ एवं प्लॉट नं. ८९० बुध्दनगर इतर तीनों प्लॉटों का एवं इनमें घरों का क्षेत्रफल कितना है. (३) प्लॉट नं. २८१, कस्तुरबानगर एवं प्लॉट नं. ८९० बुध्दनगर क घरों का पुनर्मुल्यांकन कब किया गया है. एस नोटीस की प्रति मुझे प्रदान की जाये. (४) प्लॉट नं. २८१ एवं २८३ कस्तुरबानगर नागपूर १४ के घरों का १ एप्रिल १९९२ से अब तक हर वर्ष कितना कर टॅक्स भरा गया है. इन सभी कर पावती की प्रति मुझे प्रदान की जाये. (५) प्लॉट नं. ८९० बुध्दनगर, नागपूर १७ के घर का १ एप्रिल, १९९० से अब तक हर वर्ष कितना कर टॅक्स भरा गया है. इन सभी कर पावती की प्रति मुझे प्रदान की जाये. (६) उपरोक्त तीनों प्लॉटों में स्थित पक्के मकान का निर्माण कार्य कब किया गया है." सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

६. अपीलकर्ता यांना दिनांक १४.९.२००७ रोजी मागितलेल्या माहितीकरीता स्पष्टीकरण विचारलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी स्पष्टीकरण दिलेले नसून दिनांक २०.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १५.१०.२००७ रोजी देण्यात आलेला असून प्रथम अपीलाच्या सुनावणीस दिनांक ११.१०.२००७ रोजी प्लॉट क्रमांक २८३ च्या क्षेत्रफळाची माहिती दिली नाही, तसेच घरटॅक्स भरल्याबाबत अपूर्ण माहिती दिली असल्याचे अपीलकर्ता यांनी सांगितले व त्यानुसार दिनांक ११.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमो मध्ये "सूचना अधिकारी द्वारा जानबूजकर समय पर (३० दिन की समय सिमा) जानकारी प्रदान न करना, सूचना अधिकारी द्वारा जानबूजकर अधूरी एवँ

गलत जानकारी प्रदान करना, प्रथम अपीलीय अधिकारी द्वारा दोषी होने के बावजूद सूचना अधिकारी को सूचना अधिकार अधिनियम, २००५ के तहत दंड न करना," असे कारण दिलेले आहे. परंतु, आज अपीलकर्ता हजर नसल्यामुळे त्याबाबतचे स्पष्टीकरण त्यांनी दिलेले नाही. व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

७. **अपील क्रमांक ४०/२००८** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००७ रोजी सूचना अधिकारी, लोककर्म विभाग (P.W.D.) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. "प्लॉट नं. १२४१ बुध्दनगर नागपूर १७ के संबंध में मुझे निम्नलिखित जानकारी प्रदान की जाये. (१) इस प्लॉट पर किसका मालिकी हक है. (२) इस प्लॉट का एवं इसमें बने घर का क्षेत्रफल कितना है (३) एस प्लॉट का एवं इसमें बने घर का क्षेत्रल कितना है. (४) इस घर का निर्माण कार्य कब किया गया है."सदरची माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमूद केले आहे.

८. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.१०.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २८.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.११.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांना दिनांक २९.१०.२००७ रोजी माहिती ही ना.सू.प्र. कडून घ्यावी असे पत्र दिलेले असल्यामुळे तसेच अपीलार्थीने प्लॉट धारकाचे नांव व मनपा घर क्रमांक दिल्यास माहिती देता येईल. तसेच अपीलार्थीने घर क्रमांक ५९५ + ५९५ /अ, वार्ड क्रमांक ५६ श्री हिरामण पखीडे व श्यामराव पखीडे अशी माहिती दिली. या माहितीच्या आधारे अपीलार्थीस माहिती देण्यासाठी विकासयंत्री तथा माहिती अधिकारी यांना १५ दिवसांची मुदत देवून पुढील सुनावणी दिनांक ५.११.२००७ रोजी ठेवण्यात आली. दिनांक ५.११.२००७ रोजी माहिती मिळाली असे अपीलार्थी यांनी मान्य केलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते.

९. द्वितीय अपील मेमोमध्ये "सूचना अधिकारी द्वारा जानबूजकर समय पर (३० दिन की समय सिमा) जानकारी प्रदान न करना, सूचना अधिकारी द्वारा जानबूजकर अधूरी एवँ गलत

जानकारी प्रदान करना, प्रथम अपीलीय अधिकारी द्वारा दोषी होने के बावजूद सूचना अधिकारी को सूचना अधिकार अधिनियम, २००५ के तहत दंड न करना," असे कारण दिलेले आहे. परंतु, आज अपीलकर्ता हजर नसल्यामुळे त्याबाबतचे स्पष्टीकरण त्यांनी दिलेले नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती मिळाली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३८/२००८, अपील क्रमांक ३९/२००८ व अपील क्रमांक ४०/२००८ मध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे तीनही अपीले खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २५.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

Februuary,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५७४ /२००७**

**१) श्री सुरेंद्र पुंडलीकराव रेवतकर,**
**C/o बी.डी. जोसफ, १७/३ कॅनल रोड,**
**गिरीपेठ, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**मातृ सेवा संघ, सुतिकागृह, सिताबर्डी, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी ,**
**मातृ सेवा संघ, सुतिकागृह, सिताबर्डी, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.९.२००७ रोजी मातृ सेवा संघ, सिताबर्डी, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"सौ. कविता सुरेंद्रराव रेवतकर वय २३ वर्ष C/o बी.डी. जोसफ १७/३ कॅनल रोड, गिरीपेठ नागपूर (१) प्रेगनन्सी असल्याबाबतचे १ मार्च २००७ पासून तर २६ सप्टेंबर, २००७ पर्यंत प्रत्येक महिन्याची तारखेनुसार व वार नुसार रिपोर्ट देण्यात यावा. १ मार्च २००७ ते २६ सप्टेंबर, २००७ पर्यंत डॉक्टरांनी दिलेली ट्रिटमेंटची १ मार्च, २००७ पासून २६ सप्टेंबर, २००७ पर्यंतचे डिटेल देवून कार्ड नं. १२३ नुसार वार्ड वरील रेकार्ड देण्यात यावा."

सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारचे माहितीच्या संबंधात मातृसेवा संघ यांनी कळविलेले नाही. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक २७.१०.२००७ रोजी पुन्हा संचालक मंडळ, मातृ सेवा संघ यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे उत्तर दिलेले नाही. मात्र अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय

अपील दाखल केल्यानंतर खुलासा जो दाखल केलेला आहे, त्या खुलाशामध्ये अर्जदाराने दिनांक ९.६.२००८ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, नागपूर यांनाही अर्ज केला, त्यावर जिल्हा शल्य चिकित्सक, नागपूर यांनी चौकशी केलेली आहे. अर्जदाराच्या अर्जाची प्रत सुध्दा जोडलेली आहे. दिनांक १.३.२००७ ते २६.९.२००७ पर्यंत सौ. कविता रेवतकर हिच्यावर केलेल्या उपचाराची संपूर्ण माहिती कलम ७(क) माहितीच्या अधिकाराचा कायदा २००५ अन्वये देता येत नाही. ही वैयक्तिक उपचाराची माहिती असल्याने व्यवस्थापन ही माहिती देऊ शकत नाही. सदर माहिती देता येत नाही असे अर्जदारास दिनांक ५.१०.२००७ रोजी आधीच कळविले आहे. मुळ अर्ज दिनांक ५.१०.२००७ रोजी फेटाळण्यात आलेला आहे.पी.एन.डी.टी. नुसार अशी माहिती देता येत नाही. माहिती गोपनिय असल्याने दिल्या जावू शकत नाही असे अर्जदारास सुध्दा कळविले आहे. अध्यक्ष, मातृ सेवा संघ, सिताबर्डी, नागपूर यांनी राज्य माहिती आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

"सौ. कविता सुरेंद्र रेवतकर या गरोदर असल्यामुळे आमच्या सुतिकागृहामध्ये तपासणी करीता पहीली नोंद १७.४.२००७ ते १७.७.२००७ पर्यंत येत होत्या. या दरम्यान सौ. रेवतकर यांना सोनोग्राफी करण्यास सूचित केले. याप्रमाणे दिनांक २७.७.२००७ ला सोनोग्राफीचा रिपोर्ट मिळाला. या रिपोर्टमध्ये सौ. रेवतकर यांना १८ आठवडे व ५ दिवसाची गर्भवती असल्याचे आढळले आणि त्यांना दोन अपत्ये असल्याचे दिसून आले. (ट्वीन प्रेगनेन्सी) त्यांचे पोटात वारंवार दुखत असल्याची तक्रार असल्यामुळे व सोनोग्राफीच्या रिपोर्टचा धाक तिला बसल्यामुळे तिने स्वत:हून गर्भपात करण्यास विनंती केली असेल व गर्भपाताची औषधोपचार झाल्यावर तिचा गर्भपात २.०८.०७ ला सकाळी ६.५० ते ७ पर्यंत झाल्याची रेकॉर्ड मध्ये नोंद आहे. गर्भपात झाल्यानंतर सौ. कविता रेवतकर यांची प्रकृती चांगली होती परंतु दोन दिवस डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले व नंतर त्यांना दिनांक ०४.०८.०८ ला सुटी देण्यात आली," असा खुलासा केलेला दिसून येतो.

३. अपीलकर्ता यांनी सौ. कविता सुरेंद्र रेवतकर यांची माहिती मागितलेली असल्यामुळे व ती माहिती पी.एन.डी.टी. नियमानुसार देता येत नाही असे मातृ सेवा संघाचे अधीक्षक यांनी सांगितल्यामुळे श्री रेवतकर यांचा, सौ. रेवतकर यांच्या सुतिकागृहात दाखल होण्याकरीता

संमती होती काय, असे विचारले असता त्यांनी त्याबाबत श्री रेवतकर यांची संमती घेतलेली नव्हती असे सांगितले. यावरुन सौ. रेवतकर यांचा गर्भपात करण्याकरीता संमती कोणाची घेतली हा प्रश्न उपस्थित होतो. व त्यामुळेच सौ. कविता सुरेंद्र रेवतकर हया श्री सुरेंद्र रेवतकर यांच्या पेक्षा वेगळया व्यक्ती ठरतात. व अधिनियमाचे कलम २(१)(एन) प्रमाणे त्रयस्थ पक्ष ठरतात. त्रयस्थ पक्षाची माहिती मागतांना अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे त्रयस्थ पक्षाची संमती आहे किंवा नाही, अशी प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी सुरु करावयाची असते. परंतु, त्यांनी ती केलेली नाही. मात्र अधिनियमाचे कलम १९(४) प्रमाणे सदरची माहिती त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे आयोगास त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकुण घेणे बंधनकारक आहे. व त्याप्रमाणे मागील तारखेस त्रयस्थ पक्ष म्हणून सौ. कविता सुरेंद्र रेवतकर यांना नोटीस काढून त्यांचे म्हणणे ऐकुण घेण्याकरीता आज आयोगापुढे बोलाविण्यात आले आहे. त्याप्रमाणे सौ. कविता सुरेंद्र रेवतकर यांनी माझे कोणत्याही प्रकारचे दवाखान्यातले कागदपत्र माझ्या पतीला देवू नये व कोणतीही माहिती देवू नये, असे लेखी आयोगाकडे दिलेले आहे. व त्यामुळेच पी.एन.डी.टी. नियमानुसार सदरची माहिती श्री रेवतकर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २६.९.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २५.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**